म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय नाटक
दा क्र १०३६
IRBK-0101036

# तोरण



लेखक–
द० का० भिंगार्डे.

IRBK-0101036
IRBK-0101036

१०३४
Thana

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे,
तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार
प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

१०३४

श्री उमामहेशाय नमः ।

शिव सेवा मंडळाकरतां मुद्दाम लिहिलेलें

# स्वराज्य तोरण.


लेखक,

श्रीयुत दत्तात्रय काशिनाथ भिंगार्डे.

संगीत शिवपुंडाई, संगीत प्रेमयज्ञ, संगीत भक्तकाज,

महालक्ष्मी, प्रणयलीला, स्वराज्य प्रतिज्ञा

सती सावित्री, ऋद्धिसिद्धि,

इत्यादि नाटकांचे कर्ते.



IRBK-0101036



१० डिसेंबर १९३१.


किंमत बारा आणे.

प्रकाशकः—

**सुंदरराव रघुनाथ तळवडेकर,**
न्यू भटवाडी, गिरगांव,
मुंबई, नं. ४.

( सर्व हक्क लेखकानें स्वाधीन ठेविले आहेत. )

मुद्रकः—

**पांडुरंग आत्माराम देशपांडे,**
श्रीपाद प्रिंटिंग प्रेस, ऑपेरा हाऊस
ट्रॅम टर्मिनस, मुंबई, नं. ४.

# प्रस्तावना.

अपरिचिताची परिचिताशीं ओळख करून देणें योग्य आहे, परंतु परिचिताचाच परिचय करून देण्याचा प्रसंग माझ्यावर आला आहे. शिव सेवा मंडळ, माझे मित्र श्रीयुत दत्तात्रय काशीनाथ भिंगार्डे व 'स्वराज्य तोरण' नाटक यांचा प्रथम परिचय योग्य अशा नैसर्गिक रीतीनेंच सन १९२२ सालीं मुंबापुरस्थ प्रेक्षकांशीं झालेला आहे. सन १९१९ सालीं श्री. दादा भिंगार्डे, श्री. सुंदरराव तळवडेकर, श्री. नागनाथ वा. पै, श्री. ज. ना. तेंडुलकर, श्री. न. वि. बागाव, वगैरेंनी 'शिव सेवा मंडळ' या नांवाची एक संस्था स्थापन केली, व मंडळाच्या उद्देशानुरूप श्री. दादा भिंगार्डे यांनीं 'स्वराज्य तोरण' हें शिवकालीन नाटक लिहून रंगभूमीवर आणलें. त्या नाटकाचे प्रयोग आज दहा वर्षे होत आहेत. "स्वराज्य तोरण" पुस्तक रूपानें अद्यापपर्यंत वाचकांच्या हातीं पडलें नव्हतें, पण उशीरानें कां होईना तें आज प्रकाशित होत आहे, व मुंबईतीलच नव्हे तर सर्व महाराष्ट्रांतील वाचक वर्गाशीं त्यांचा परिचय करून देण्याचें काम माझ्यावर आलें आहे, हा योगायोगच म्हणावयाचा!

हें 'स्वराज्य तोरण' अफझुलखानाचा वध या ऐतिहासिक आख्यानावर रचलें आहे. ऐतिहासिक नाटक म्हणजे निर्भेळ इतिहास नव्हे; परंतु त्याच्या दर्शनानें प्रेक्षकांच्या अंतःकरणांत राष्ट्रीयत्वाची जागृति व्हावयास पाहिजे. याकरतां मूळ कथानकांत थोडाबहुत फरक करणें, नवीन काल्पनिक पात्रें व प्रसंग घालणें अगदीं अपरिहार्य असतें. मात्र ऐतिहासिक व्यक्तींचीं स्वभावचित्रें रंगवितांना त्यांना कमीपणा न येईल, किंवा कालांतराचा दोष न घडेल, एवढी खबरदारी लेखकानें घेणें अगदीं जरूर असतें.

शिवाजी महाराज स्वराज्य स्थापन करीत असतां अफझुलखानाची स्वारी हें एक मोठेंच अरिष्ट त्यांच्यावर आलें. महाराज राजकारणाच्या आखाड्यांत ज्याप्रमाणें अवरंगजेबाला हार गेले नाहींत, त्याप्रमाणेच मर्दुमकीच्या लढाईतही ते अफझुलखानाला चीत केल्यावांचून राहिले नाहींत. अशा कथानकांत लेखकाच्या कल्पनाशक्तीला स्वैरसंचार करायला केवढातरी वाव आहे. धर्माभिमान, देशाभिमान, शौर्य, स्वार्थत्याग त्याप्रमाणेंच देशद्रोह, विश्वासघात, फितुरी, दगलबाजी, स्वामिद्रोह इत्यादि सद्गुण दुर्गुणांचीं चित्रें नाचवायला या कथानकांत कितीतरी अवसर आहे.

" स्वराज्य तोरण " नाटकाच्या कथानकाची उभारणी तत्कालीन महाराष्ट्रीय राजकारणांतील तीन प्रमुख गोष्टींवर केली आहे. विजापूर दरबार व विजापूर दरबारनें शिवाजी महाराजांवर पाठविलेले सरदार; जावळीचें कारस्थान आणि शिवाजी महाराजांचें राजकारण. अफझुलखान व त्यांचा पंडित कृष्णाजी भास्कर यांच्याद्वारें विजापुर दरबारांतील मराठे व मुसलमान मुत्सद्यांची चुरस आणि झुंझारराव घाडगे या पात्रांच्याद्वारें तत्कालीन मराठे सरदारांची स्वामिभक्ति यांचें दिग्दर्शन केलें आहे. जावळीचा राजा चंद्रराव मोरे यांचा खुन झाल्यावर शिवाजी महाराजांनीं जावळींतील बंदोबस्त केला होता तरी मोऱ्यांची मुलगी मोकळी होती, शिवाजी महाराजांनीं शिक्षा केलेला खंडूजी खोपडे, महाराजांचा सूड घेण्याच्या भावनेनें तिला मिळून जावळीकरांना चिथावतो. जावळीकर आपल्या बलाबलाचा विचार करून शिवाजी महाराजांना जमीनदोस्त करायचा निराळाच बेत करून खानाच्या भेटीसाठीं उभारलेल्या मंडपाखालीं भुयार खणून मंडप उडवून दगा करण्याचा डाव करतात. शिवाजी महाराजांची प्रबल शत्रूला तोंड देण्याची गनिमी पद्धति, तानाजीचा उत्साह आणि मातोश्री जिजाबाईसाहेबांची देशभक्ति व अपत्यस्नेह यांचें हृदयस्पर्शी दर्शन मार्मिक रीतीनें रंगवलें आहे. नेताजीचा शत्रूच्या अंतरंगांत शिरण्याची कर्तबगारी, विजापूरच्या सरदारांची महाराजांना जिवंत पकडण्याची अहमहमिका, नेताजीचें महाराजांसारखें वेषांतर वगैरे प्रसंगांनीं शक्य तेवढा विनोद साधण्याचा लेखकानें प्रयत्न केला आहे.

श्री. दादा भिगार्डे यांनीं कवीला जो अधिकार वाङ्मय शासनानें दिला आहे, त्याचा योग्य उपयोग करून नाटकांतील पात्रें व प्रसंग यांची चितारणी केली आहे. खंडूजी खोपडे यांच्यासारखे देशद्रोही फितुर प्रत्येक देशांत सर्वकाळीं पहावयास सांपडतात. स्वामिभक्तीच्या खुळया कल्पनें कित्येक राष्ट्रघातकी पुरुष परकीयांचें दास्यत्व पत्करून स्वजनांच्या राष्ट्रकार्यांत विघ्नें उत्पन्न करतात हें आपण दररोज पहातच आहोंत. अशा महाशयांची कशी वाट लागते हें शिवाजी महाराज व त्याचे सहाय्यकारी यांच्या पात्रांकरवीं नाटककारानें कुशलतेनं दाखविलें आहेत.

श्री. दादांनीं अशा प्रकारच्या स्फूर्तिदायक कथानकावर आणखी नाट्यकृति निर्माण करून शिव सेवा मंडळाकडून शिवचरित्रावर प्रकाश पाडावा अशी मित्रत्वाची सूचना करून ही परिचय प्रस्तावना पुरी करतों.

**य. ना. टिपणीस.**

म. प्रे. सं.( ठाणे, वाचनालय शाखा.
प्र. क्र. ७०३६ नों. दि. ..........
वि. .......... क्र. ..........
नाटक

## निवेदन.

सन १९२० सालीं दत्तजयंतीच्या दिवशीं शिव सेवा मंडळानें नवीन शिवकालीन नाटक बसविण्याचें श्री. सुंदरराव तळवडेकर यांच्या सूचनेवरून प्रतापगडचें युद्ध अथवा अफझुलखानाचा वध या प्रसंगावर नाटक लिहिण्याची आज्ञा केली. त्या आज्ञेला अनुसरून मी नाटक लिहिण्याचा प्रयत्न केला. नाटक लिहितांना व संविधानक जुळवितांना श्री. तळवडेकर, श्री. नागनाथ वा. पै, श्री. ज. ना. तेंडुलकर, श्री. न. वि. बागाव, वगैरे मंडळींची मला फार मदत झाली.

शिवसेवा मंडळानें नाटकाच्या रुजावटीसाठीं विजापूरशाही पगड्या-कपडे इत्यादि शक्य तो खर्च करून आणि नाटक अत्यंत मेहनतीनें बसवून यशस्वीपणें रंगभूमीवर आणून मला उपकृत केलें आहे. नाटक बसविण्याच्या कामीं माझे मित्र नागनाथ पै, जयवंतराव तेंडुलकर व कै. दत्तोपंत गोडबोले यांनीं शिकस्तीची मेहनत घेतली. शिवसेवा मंडळांतील सभासदांनीं नाटकांतील निरनिराळ्या प्रसंगांचीं छायाचित्रें देऊन पुस्तकाला शोभा आणली. त्याबद्दल मी या सर्व मित्रांचा आभारी आहें. वेळोवेळीं लागणाऱ्या नाटकाच्या अनेक प्रती लिहून व पुस्तक छपाईच्या वेळीं मुद्रितें तपासून माझे मित्र श्री. द. गों. पर्वते यांनीं अमोल मदत केली.

पुस्तक प्रसिद्धीचें सर्व श्रेय माझे मित्र श्रीपाद प्रेसचे मालक श्री. पां. आ. देशपांडे, श्री. सुंदरराव तळवडेकर यांचें आहे. आज दहा वर्षें मागें पडलेलें माझें नाटक या मित्रांच्या उत्साहामुळें आज वाचकांच्या पुढें येत आहे. छायाचित्रें घेण्याच्या कामीं मुंबईतील सुप्रसिद्ध फोटोग्राफर रेक्स स्टुडियोचे मालक श्री. अनंतराव राजाध्यक्ष यांनीं मित्रभावानें वेळीं अवेळीं मेहनत घेऊन पुस्तकाचें सौंदर्य वाढविण्यास मदत केली. प्रसिद्ध ब्लॉक मेकर्स नेरॉय कंपनी यांनीं विशेष मेहनत घेऊन ब्लॉक्स करून दिले. या कामीं मला श्री. जगन्नाथ गोपाळ ताम्हनकर यांचें अमोल सहाय्य झालें.

या सर्व मित्रांनीं उभारलेल्या उपकृति मंदिरावर, महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध ऐतिहासिक नाटककार गु. अप्पासाहेब टिपणीस यांनीं आजारी असतांनाही शिष्यप्रेमानें

प्रस्तावना लिहून कळस चढविला. या सर्व मित्रांच्या उपकारांची फेड तर अशक्यच आहे; पण त्यांचें वर्णन करायलासुद्धां माझी नूतन लेखणी असमर्थ आहे. असो.

या मित्रांना आपल्या लोभाच्या सावलींत माझ्याकडून अशीच सेवा करून घेण्याची विनंति करून माझी ही अल्पशी कृति सहृदय रसिकांच्या सेवेला सादर करतों.

मुंबई, १०-१२-१९३१. द. का. भिंगार्डे.

---

## प्रकाशकाचे दोन शब्द.

मित्रवर्य श्री. दादा भिंगार्डे यांनीं मंडळाच्या विनंतीला मान देऊन मंडळाला "स्वराज्य तोरण" नाटक लिहून दिलें. श्री. दादाचें हें नाटक या पूर्वींच आम्हीं प्रसिद्ध करावयास पाहिजे होतें; परंतु सांपत्तिक गैरसोईमुळें तें करतां आलें नाहीं. आजही तीच अडचण आहे तथापि मंडळानें पुस्तक प्रकाशनाचें कार्य अंगावर घेण्याचें ठरवून पुस्तक प्रसिद्ध करण्याचा उशीरा कां होईना पण आज सुयोग आला याबद्दल आनंद होत आहे. पुस्तक प्रकाशनाच्या कामीं श्रीपाद प्रेसचे मालक श्री. पांडुरंग आत्माराम देशपांडे यांचें सहाय्य महत्वाचें आहे. रेक्स स्टुडियोचे मालक मुंबईचे प्रसिद्ध फोटोग्राफर श्री. अनंतराव राजाध्यक्ष; नेरॉय कंपनी, श्री. ताम्हनकर यांचें आम्हांला उत्तम सहाय्य झालें. या सर्वांचे शिव सेवा मंडळ आभारी आहे.

मंडळाच्या गुरुस्थानीं असलेले प्रसिद्ध नाटककार श्री. आप्पासाहेब टिपणीस यांनीं पुस्तकाला परिचय प्रस्तावना लिहून आपला शुभाशिर्वाद देऊन आम्हांला उत्तेजन दिलें याबद्दल श्री. आप्पांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत.

महाराष्ट्रीय रसिकांनीं आजपर्यंत मंडळाला सहानुभूतीपूर्ण उदार आश्रय दिलाच आहे. त्याच सहानुभूतीच्या आशेनें आज हें पुस्तक मी मंडळाच्या वतीनें सहृदय रसिकांच्या चरणीं सादर करीत आहें.

शिव सेवा मंडळ—मुंबई.<br>
ता. १० डिसेंबर १९३१

सुंदरराव रघुनाथ तळवडेकर.

---

ॐ

श्रीउमामहेशाय नमः ।

# स्वराज्य-तोरण.

## अंक पहिला.

### प्रवेश पहिला.

(जावळी-मोऱ्यांचा दिवाणखाना. संताजी सचिंत उभा आहे. मोहना प्रवेश करते.)

**मोहना:**—कां, संताजी ! असा विचार कसला करतो आहेस ? आणि तूं असा उद्विग्न कां ! काम फसलं वाटतं ? झुंजारराव काय म्हणतात ? ते येत नाहीं म्हणतात ! अरे तूं असा गप्प कां ? बोल, त्यांचा जबाब कसाही असला तरी ही मोहना त्याची पर्वा करीत नाहीं. बाबांच्या खुनामुळं खवळलेल्या या वाघिणीला कुणी कसंही डिंवचलं तरी त्याची मला पर्वा नाहीं. या मोहनेला सूडाशिवाय दुसरं कांहींच दिसत नाहीं. मग बोल, येताहेत कीं नाहींत ते ?

**संताजी:**—ताईसाहेब, जरा दमानं घ्या. झुंझाररावाला कशाला बोलावलात ? आपल्या या आवेशावरून कांहींतरी भयंकर प्रकार होणार असं दिसतं !

**मोहना:**—त्याच्याशीं तुला काय करायचं आहे ? संताजी, अलीकडे तूं माझ्याबद्दल साशंक दिसतोस. संताजी, तूं बाबांचा इमानी नोकर ना ? आपल्या धन्याच्या खुनाबद्दल सूड घ्यावा असं आजपर्यंत तुला वाटत होतं ना ? माझी नोकरी इमानानं करण्याचं तूं मला वचन दिलंस ना ? मग असा साशंक कां ? प्रत्येक वेळीं चौकशी कां ?

**संताजी**:—ताईसाहेब, मी ज्या इमानानं धनीसाहेबांशीं वागलों, त्याच इमानानं आपल्याशीं वागतों. आपण शूर व पराक्रमी आहांत, पण बुद्धि कोती आहे. तशांत आपलं मन शांत नाहीं. आपल्या हातून कांहींतरी विपरीत घडून मूळ सूडाची कल्पना बिघडूं नये म्हणून—

**मोहना**:—सूडाची कल्पना बिघडेल म्हणूनच तूं चौकशी करतोस, होय ना ? दुसरी कसली भीति किंवा निराशा यामुळं तुझं मन कचरत नाहींना ? संताजी, मला मदत करायला अझूनही तूं तयार आहेस ना ? तुझ्या इमानावर विश्वास ठेवून मी माझीं कारस्थानं तुला सांगतें, हें तुला ठाऊक आहे ना ?

**संताजी**:—तसं असतं तर मी चौकशी कशाला केली असती. मानाजी-रावांचे पाय या घरांत शिरल्यापासून प्रकार कांहीं निराळेच दिसूं लागले आहेत. आपण आपलीं कारस्थानं मला नीटशीं सांगत नाहीं; तरीपण मी त्याचा विषाद मानीत नाहीं. माझी एवढीच इच्छा कीं, आपला घात न होतां धनीसाहेबांच्या खुनाबद्दल पुरता सूड घेतला जावा. ताईसाहेब, ओघाला आलंच म्हणून बोलतों, मला केवळ पगारी नोकर समजूं नका. पगारा पुरतंच धन्याचं काम करायचं अशी दानत या संताजीची नाहीं. मी आपल्याकड नोकरीला राहिलों तेव्हांच मी आपलं सर्वस्व मोऱ्यांना अर्पण केलं आहे, हें जाणून माझ्याशीं वागत चला. हा देह उभा आहे तोंपर्यंत मोऱ्यांकरतां वाटेल तें करायचं, हा माझा बाणा आहे.

**मोहना**:—पण हें मी जाणून का नाहीं ! मानाजीरावांच्या आधीन मी कशी होईन ! पण आपलं काम होईपर्यंत त्याच्या कलानं घेतें एवढंच. आतां झुंझाररावांबद्दल म्हणशील तर त्यांना कटांत घेण्याकरतां किंवा त्यांचा घात करण्याकरतां नाहीं बोलावलं.

**संताजी**:—तर कशाला ?

**मोहना**:—संताजी, विजापूर दरबारांत आपली दाद लागत नाहीं, याला कारण-कारण हे भोसले. या भोसल्यांचं आणि आमचं पिढ्यान् पिढ्या वांकडं आहे. झुंझारराव भोसल्यांच्या प्रभावळींत शिरल्यामुळं त्यांनीं माझ्या प्रेमाचा धिःकार केला; त्यांचा थोडा नक्षा उतरला पाहिजे. शिवाय या मोहिमेंत त्यांना इथं राहूं दिलं तर आपलं कार्य साधणार नाहीं; म्हणून त्यांना इथून हुसकावून लावण्याचा माझा बेत आहे. मग येताहेतना झुंझारराव ?

**संताजी**:—होय ताईसाहेब.

**मोहना**:—आतां झुंझारराव आले कीं, मानाजीरावाला वैषम्य वाटेल असंच मी करणार. झुंझारराव आणि मानाजी जिवाचे दोस्त झाले आहेत, पण आतां तेच एकमेकांचे जीव घेणारे कट्टे वैरी मी करणार. झुंझारराव आल्यावर मानाजी येईल; त्याला थोडा वेळ दरवाजावर अडवून धर. अशीं परस्पर कोंबडीं झुंजवल्याशिवाय आपला कार्यभाग साधणार नाहीं. जा. झुंझारराव आले कीं त्यांना आंत पाठव. ( संताजी जाऊं लागतो, ) पण हो, तुझा संशय दूर झालाना ? संताजी, तूं बाबांचा कलिजा होतास हें मी कशी बरं विसरेन!

**संताजी**:—ताईसाहेब, मी आपल्याबद्दल संशय घेणं कधींच शक्य नाहीं. ( स्वगत ) चंद्ररावाची मुलगी ही ! आधींच चंद्रराव म्हणजे कारस्थानाचा पुतळा. त्याची मुलगी कारस्थानी झाल्याशिवाय कशी राहील ? ( जातो ).

**मोहना**:—संताजी आमचा इमानी नोकर. बिचाऱ्याला मोऱ्यांच्या सेवे-शिवाय कांहीं दिसत नाहीं, म्हणूनच मी याला कारस्थानांत घेतला; पण मानाजी इथं आल्यापासून याच्याकडे जरा दुर्लक्ष झाल्याबरोबर यालाही मत्सरानं पछाडलं. संताजीची महत्वाकांक्षा, धन्याची सेवा–केवळ परकार्यचना तें; पण त्यालासुद्धां मध्यें दुसरा खपला नाहीं. मग त्या मानाजीची स्थिति काय बरें होईल ? मानाजीची महत्त्वाकांक्षा फार नाजुक आणि आत्मसुखाची आहे. झुंझाररावांना माझ्याशीं एकांतांत बोलतांना पाहून त्याला काय बरं वाटेल? मित्र म्हणून त्याला वैषम्य वाटणार नाहीं ? नाहीं कां, तें तर वाटलंच पाहिजे. कारण कांता मोह हा असा आहे कीं, तो जगांतील सर्व नातीं चटसारीं झुगारून प्राण्याला पागल बनवतो. इथं झुंझारराव आणि मानाजी कट्टे शत्रू झालेच पाहिजेत. झुंझारराव! भोंसल्यांच्या प्रभावळींत शिरून माझ्या दिव्य प्रेमाचा धिःकार केलात ! आजप-र्यंत माझ्या हृदयसिंहासनावर एकवेळ माझ्या प्रेमानं आपल्याला बसवल्यामुळं तुमच्याकड–तुमच्या धिःकाराकड, केवळ स्त्रियांच्या मृदुल स्वभावाला अनुसरून मी दुर्लक्ष केलं होतं; आणि आपण इकड न येतां तर अजूनही केलं असतं; पण बाबांच्या खुनामुळं आणि आदिलशाहीच्या बेपर्वाईमुळं माझ्या कोमल मना-चाही खून होऊन तें पैशाचिक–निष्ठूर–राक्षसी आणि खूनशी झालं आहे. सूडाच्या मार्गांत येणारी प्रत्येक व्यक्ती–प्रत्येक कारस्थान मी जमिनदोस्त करणार. झुंझारराव ! आपल्याला दुखवूं नये असं मला अजूनही वाटतं, पण काय करुं ! आपल्याला सोडून माझं कार्य पार पडणार नाहीं. झुंझारराव !

**संताजी**:—( प्रवेश करून ) आले आहेत ताईसाहेब.

**मोहना**:—दे त्यांना आंत पाठवून, आणि तूं दरवाजा सोडूं नकोस. (संताजी जातो.)

**झुंझारराव**:—( प्रवेश करून ) हें काय ! इथं कुणीच नाहीं कसं ?

**मोहना**:—अगबाई ! कुणी नाहीं कां ? मी आहें ना ! झुंझारराव, बसा. या आसनावर बसा. मानाजीराव आतां येतील. बसा. उभे कां ? मोऱ्यांचा आदरसत्कार तर घ्या.

**झुंझारराव**:—मोऱ्यांचा आदरसत्कार घ्यायला मी कांहीं मोऱ्यांचा पाहुणा नाहीं. मोहनाबाई, माझ्या सत्काराची जरूरी नाहीं आणि मला तो नकोही.

**मोहना**:—तें ठीकच आहे. पण मला तो केला पाहिजेना. आपण कामाला आलांत पण ठरल्या वेळेच्या पूर्वीं आलांत; त्याअर्थी आमच्यावरील आपला रोष जाऊन, या कामाच्या निमित्तानं—( लाजते ).

**झुंझारराव**:—कामाच्या निमित्तानं काय ? मोहनाबाई, आपल्या बोलण्याचा अर्थ मी समजलों नाहीं. आणि मी लवकर आलों ? निरोपाच्या मानानं मी अर्धा घंटा उशीरांच आलों.

**मोहना**:—मग त्यांत काय बिघडलं ? आमच्यावर रोष तर नाहींना आतां. भोंसल्यांच्या डोळ्यांत सलणारं कुसळ आतां निघालं आहे. भोंसल्यांचे प्रतिस्पर्धी या घरांतून नाहींसे झाले आतां कांहीं हें घर आपल्याला शत्रुगृह भासायला नको. म्हणून म्हणत्यें, या आसनावर बसा—

**झुंझारराव**:—नाहीं. मला या आसनावर बसतां येत नाहीं.

**मोहना**:—तें कां ?

**झुंझारराव**:—मी आपल्या वडिलांच्या विनंतीचा-आपल्या प्रेमाचा धिःकार केल्यामुळं. मी इथं बसणं योग्य नाहीं, इतकंच नव्हे तर मी इथं येणंही इष्ट नाहीं; पण स्वामिकार्य म्हणून मला इथं येणं भाग पडलं.

**मोहना**:—एकूण आमच्या विषयींचं वैर आपल्या मनांत अजून आहे तर !

**झुंझारराव**:—मोऱ्यांचं आणि माझं वैर कधीं नव्हतं आणि नाहीं. माझं स्वतःचं म्हणाल, तर कुणाशींच वैर नाहीं.

**मोहना**:—तुमचं नसेल, पण तुमच्या भोंसल्यांचं आहेना !

**झुंझारराव**:—मोहनाबाई, मोरे भोंसल्यांच्या वैराचा पाढा माझ्यापुढं वाचून काय उपयोग ? आणि मी कोण त्याचा जाब देणार ! कृपा करा आणि मसलतीची वेळ सांगा. मी आतां जातों.

**मोहना**:—मोरे भोंसल्यांच्या वादामुळं आपलं आमच्याशीं वैर; नाहींतर आपण बाबांच्या विनंतीचा अव्हेर केला नसतात. भोंसल्यांचे अभिमानी म्हणूनच आमचं घर आपल्याला शत्रुगृह वाटतं ना ?

**झुंझारराव**:—आपली मागणी नाकारली, त्याचं कारण भोंसल्यांचा अभिमान नसून स्वाभिमान आहे. मोहनाबाई, मोरे घोरपड्यांशीं इतर मराठ्यांचं वैर कां हें आपल्याला माहित नाहीं असं दिसतं. मोरे घोरपड्यांशीं एकट्या भोंसल्यांचंच वैर नाहीं; तर कित्येक मराठे कुळांचं आहे. याला कारण तुम्हां पिढीजात जहागिरदारांनां नवीन कुळांचा उत्कर्ष सहन होत नाहीं, हेंच. विजापूर दरबारांत भोंसले शिरेपर्यंत आपल्या वडिलांसारख्या पिढीजात मानकऱ्यांनीं इतर मराठ्यानां वर डोकं काढूं दिलं नाहीं. उगाच भोंसल्यांच्या नांवानं खडे कां फोडतां !

**मोहना**:—असेल तसंही असेल कदाचित्, पण आपल्याला मानाला चढवून दरबारांत आपला दर्जा वाढवायला बाबा तयार होते. आपल्या उत्कर्षाआड बाबा कधींच आले नाहींत, हें सुद्धां विसरतां कामा नये.

**झुंझारराव**:—कबूल ! तुमच्या बाबांचंही मला सहाय्य झालं असेल.

**मोहना**:—असेल कां ? तें तर झालंच.

**झुंझारराव**:—पण तें केव्हां ? मला भोंसल्यांनीं जवळ केल्यानंतर. माझा उत्कर्ष थांबवणं अशक्य वाटलं तेव्हां. भोंसल्यांचा अभिमान मराठ्यांनां कां असूं नये ? भोंसले स्वपराक्रमानं पुढं आले; आणि इतरांना त्यांनीं पुढं आणलं. त्यांनीं स्वार्थाकरतां दरबारची हांजी हांजी करून दुसऱ्यांच्या घरादारांवर गाढवांचे नांगर फिरविले नाहींत.

**मोहना**:—पण आतां तें सर्व नाहींसं झालं. बाबांच्या बरोबर मोऱ्यांचं नांव-मोऱ्यांचा वंश कालांत गडप झाला. आतां माझं लग्न झालं म्हणजे मीसुद्धां मोऱ्यांच्या नांवाच्या कलंकातून मोकळी होईन. मोऱ्यांनां त्यांच्या कर्माचं फळ मिळालं. मोऱ्यांचा राग माझ्यावर-एका निराधार मुलीवर काढणं आपल्याला शोभत नाहीं. म्हणून म्हणतें रागरोष सोडा आणि या आसनावर बसा. या आसनावर बसून मला पावन करा. आपण अपमान केला आहे बाबांचा. माझा

नाहीं. आणि माझा केला असतात तरी मी थोडीच मनावर घेणार होतें. बसाना या आसनावर! असं उभं किती वेळ रहायचं तें!

**झुंझारराव**:—माझ्या बसण्यानं आपल्याला आनंद होत असेल तर बसायला माझी ना नाहीं. पण एका अटीवर.

**मोहना**:—अशी कोणती अट? सांगा तरी.

**झुंझारराव**:—मागील गोष्टी काढून भोंसले किंवा इतर मराठे यांची निंदा करतां कामा नये.

**मोहना**:—कबूल! आतां तरी बसाल ना? (झुंझारराव बसतो. मानाजी येतो)

**मानाजी**:—(स्वगत) हें काय मी पहातों! झुंझार मोहनेचा एकांत! आणि म्हणून मला मज्जाव! मोहने वचन देऊन या झुंझारशीं एकांत! आतां मात्र तूं चंद्ररावाची मुलगी शोभतेस खरी! हीं पराक्रमी व सुस्वरूप माणसं दुसऱ्याच्या सुखांत अशी माती कालवतात!

**झुंझारराव**:—मानाजीराव कसे अझून आले नाहींत? आणि मला कशाला इतक्या लौकर बोलावलं?

**मोहना**:—अर्ध्या घंट्यांत येतील. आपल्याला मानाजीरावांनीं नाहीं बोलावलं. (लाजते.)

**झुंझारराव**:—तर मग कुणी? तुम्ही? तें कशाला?

**मानाजी**:—(स्वगत) हें काय मी ऐकतों, मोहनेनं याला बोलावलं. मी नाहीं अशी संधी साधून या चोराची भेट व्हावी म्हणून मसलतीची बैठक इथंच करण्याचा हिचा घांट. समजलों. (पुढें येतो.)

**झुंझारराव**:—हे पहा आलेच मानाजीराव.

**मानाजी**:—काय झुंझारराव! आज काय बेत आहे? आज मसलतीच्या वेळेपूर्वींच हजर!

**झुंझारराव**:—ही संवय मला नाहीं. खानाच्या मागं गोंड घोळणारा मराठा हा झुंझार नाहीं.

**मानाजी**:—खानाच्या मागं गोंड घोळणारे आपण नाहीं; इतकंच नव्हे तर सात्त्विक वृत्तीचे आणि बाणेदार वीर आपण असाल असाच माझा समज होता; आणि म्हणूनच आपण भोंसल्यांच्या प्रभावळींत असूनसुद्धां प्रथम मी आपल्या मदतीला आलों आणि आपल्याशीं स्नेह केला.



**मोहना:**—मी पाठवला. मग आपलं काय म्हणणं आहे ? ( पान ७. )

**झुंझारराव**:-मग तो समज आतांच कां बदलूं पहातो? मानाजीराव, केवळ तुमच्या नांवानं या मोहनाबाईनीं निरोप पाठविला म्हणूनच मी मोऱ्यांच्या घरची पायरी चढलों.

**मानाजी**:-माझ्या नांवानं निरोप? आणि तो —

**मोहना**:—मी पाठवला. मग आपलं काय म्हणणं आहे?

**मानाजी**:-माझं तोंडच बंद केलंस, आतां म्हणणं काय असणार! पण मोहने लक्षांत ठेव, हा मानाजी आहे!

**मोहना**:—आणि ही मोहना आहे हें आपणही विसरूं नये.

**मानाजी**:—मान हानी सहन करणं हें मानाजीचं ब्रीद नाहीं. मोहने माझ्या नांवानं तूं याला कां आणि कशाला बोलावलास?

**मोहना**:—मानाजीराव, हा आवेश जरा आवरता घ्या. मोऱ्यांची मोहना असल्या आवेशाला भीक घालीत नसते. माझ्या घरीं कुणालाही बोलवायला माझी मी मालकीण आहें. मोहना परवशता कधींच मान्य करणार नाहीं. अहो! बापाच्या खुनानंतर शिवाजीसारख्याला जिनं झुलवलं, ती असले कैक मानाजी डोलवील आणि वेळ पडली तर लोळवील. मानाजीचा राग-मानाजीचं-वैर ही मोहना कस्पटासमान मानते. मानाजीराव वैराचा धाक तुम्ही कुणाला घालतां? मला!

**मानाजी**:—( स्वगत ) अरेरे! कोण हा अपमान! आणि तोसुद्धां माझ्या हितशत्रूपुढं. मोऱ्यांची मोहना परवशता मान्य करणार नाहीं. आपल्या भावी पतीचीसुद्धां पर्वा नाहीं आं! ठीक आहे. पुढं पाहतां येईल. (उघड) झुंझारराव, आपण माझे मित्र म्हणवतांना?

**झुंझारराव**:—मानाजीराव, नुसता मित्र म्हणवणारा मी मित्र नाहीं. मी आपला खरा खरा मित्र आहे. पण—

**मानाजी**:—सांगा. झुंझारराव आपला पण सांगा. आपलं हृद्गत् तरी कळूं द्या.

**झुंझारराव**:—माझं हृद्गत् शुद्ध व निष्पाप आहे. पण तुम्हीं मात्र तें निराळ्या दृष्टीनं-संशयानं-मत्सरानं पहातां.

**मानाजी**:—नाहीं! झुंझारराव तसं नाहीं. ही वस्तुस्थिति पाहिली, या मोहनेचं-नको तें नांवसुद्धां नको. हिचं हें बोलणं ऐकून कुणाही त्रयस्थाला काय वाटेल?

**झुंझारराव**:—पण हें आहे तरी काय? आणि ही वस्तुस्थिति कसली?

**मोहना**:—झुंझारराव, तुम्ही यांच्या नादीं काय लागतां. असले वेडपीर जगाच्या अंतापर्यंत अशीच पिरपिर करीत रहायचे. संशयी माणसाला कधींतरी स्वास्थ्य मिळेल का! झुंझारराव, आपल्याला विनाकारण त्रास दिला, याबद्दल मला क्षमा करा आणि अशीच कधीं कधीं पायधूळ झाडाल तर मी आपल्याला धन्य समजेन.

**मानाजी**:—(स्वगत) आणि माझ्या प्रेमाची धूळधाण केलीस म्हणून मी तुला माझा वैरी समजेन.

**झुंझारराव**:—पण हें आहे तरी काय? आपली क्षमा, यांचा त्रागा यावरून मी समजूं तरी काय?

**मोहना**:—आणि तें समजावूनही समजणार नाहीं. आतां इथं जास्त वेळ रहाल तर आपल्यालासुद्धां वेड लागायची पाळी येईल.

**झुंझारराव**:—ठीक आहे. मानाजीराव येतों मी आतां. (जातो.)

**मानाजी**:—या बरं. काय पण मित्र! हरामखोर चोरासारखा मागं वळून पहातो आहे. झुंझार जा. इथं पायधूळ झाडून माझ्या प्रेमाची धूळधाण केलीस खरी, पण गांठ या मानाजीशीं आहे. तुझा पुरी धूळधाण न करीन तर नांवाचा मानाजीच नाहीं.

**मोहना**:—माझं काम झालं. आज मला खरा खरा आनंद झाला. आज मी स्वर्गात आहें कीं मृत्यूलोकीं आहें, याचंही भान नाहींसं झालं. अहाहा! झुंझारराव!

**मानाजी**:—(स्वगत) समज. तूं आपल्याला खूब धन्य समज. हिचं काम झालं. ही स्वर्गात आहे कीं मृत्यूलोकीं आहे, याचंही भान नाहींसं झालं अं! पण लक्षांत ठेव, या आनंदाची राख फांसून जखीण बनवून हा मानाजी तुला स्मशानांत बसवील. (उघड) मोहने!

**मोहना**:—काय मेली कटकट तरी. काय म्हणतां?

**मानाजी**:—माझी कटकट! मोहने, केवळ तुझ्याकरतां मी काय केलं आणि काय करणार आहें. हें तुला माहित आहेना?

**मोहना**:—पण कांहीं केलंत नाहीं, असं मी तरी कुठं म्हटलं? पण तेवढ्या-वरून मी कांहीं आपली गुलाम होऊं इच्छित नाहीं. असा त्रागा करायला झालं काय?

**मानाजीः**—झालं काय! मोहने, माझ्या सात्विकतेची कसोटी पाहूं नकोस. माझ्या मनोवृत्तीला खूनशी करूं नकोस. सरळ वृत्तीला मत्सरानं घेरलं कीं, ती आपला शांतपणा टाकून, खूनशी बनून पेटूं लागते, आणि त्या पेटलेल्या खाईंत कुणाचीही रक्षा करायला मागं पुढं पहात नाहीं.

**मोहनाः**—खरं म्हणाल तर माझीसुद्धां हीच स्थिति झाली आहे. असुरी महत्वाकांक्षेचीं-खूनशी वृत्तीचींच माणसं पाहून, मला आनंद होतो. माझ्या बाबांच्या खुनाबद्दल सूड घेण्याकरतां मी मनाची नैसर्गिक कोमलता टाकून, तें वज्रापेक्षांही कठोर बनवून, जगाला माझ्याकड कोणत्या दृष्टीनं पहायला लावणार, हें तुम्हीं जाणतां अहांतना? मग तुमच्या आसुरी वृत्तीची भीति मला कां वाटेल?

**मानाजीः**—ठीक आहे! माझ्या मदतीशिवाय तुझं कारस्थान कसं तडीला जातं, तें मी पहातों. मोहने, केवळ तुझ्या प्राप्तीकरतां मी स्वदेशाशीं द्रोह करायला तयार झालों. महाराष्ट्राच्या मानेला विजापुरकरांची तात लावून, शिवाजीला जिवंत धरून, तुझ्या हस्तें विजापुरकरांना अर्पण करायला तयार झालों; आणि तूं माझ्याशीं अशी बेइमान होत्येस? हो! खुशाल हो! तुला मी सुख लाभूं देणार नाहीं. मोहने, माझ्या मत्सराग्नींत प्रथम तुझ्या सुखाची होळी करतों. तुझ्या जाराला—

**मोहनाः**—मानाजी—

**मानाजीः**—झुंझारला नाहींसा करतों. त्यानंच तुला माझ्याकड पाठ फिरवायला लावलं.

**मोहनाः**—त्यांत त्यांचा काय दोष?

**मानाजीः**—दोष कुणाचाही असो. माझ्या सुखाची होळी करायला कारण झाला, हाच त्याचा दोष. त्याला नाहींसा हा केलाच पाहिजे.

**मोहनाः**—पण त्यांना माझ्या प्रेमाची कल्पनाही नाहीं.

**मानाजीः**—बरोबर आहे. आपल्या प्रेमाची कल्पना कुणाला येणार आहे? मोहने, बस्स झाला आपला हा संबंध. मी येतों आतां. (जातो.)

**मोहनाः**—हें सावज हातचं घालवतां कामा नये. मानाजीराव खरंच रागावले आहेत का? माझा नाद ते सोडतील का? झुंझाररावांचा घात—

(मानाजी परत येतो.)

**मानाजी**—मोहने, मी जाऊं ना ? तुझं मन खरंच बदललं आहे का ? बोल ! मोहने बोल !

**मोहनाः**—माझं मन बदललं नाहीं; पण झुंझारराव समोर आहेत तोंपर्यंत माझ्या पूर्व प्रेमाची स्मृति मला त्यांच्याकडे पहायला लावते त्याला मी काय करूं ! झुंझाररावांना माझ्या प्रेमाची पर्वा नाहीं, हें मी जाणतें. माझ्यावर ते प्रेम करणार नाहींत, हेंसुद्धां मला कळतं; पण त्यांना पाहिल्यापासून माझं मन मात्र त्यांच्याकड वेधलं आहे. त्याला मी काय करूं !

**मानाजीः**—असंच केवळ असेल तर त्याला नाहींसा करतों. पुन्हां तो तुझ्या दृष्टीस पडणार नाहीं, असं करतों.

**मोहनाः**—अगबाई, त्यांना नाहींसे करून तर आपलं कार्य मुळींच साधणार नाहीं.

**मानाजीः**—कां साधणार नाहीं ! त्याच्यावांचून आदिलशाहीचं घोडं थोडंच अडणार आहे !

**मोहनाः**—मानाजीराव, आज आदिलशाहीच्या सैन्यांत झुंझाररावांच्या पक्षाचं अर्धं अधिक सैन्य आहे. त्यांचा घात झाला तर सैन्य बिथरून सैन्यांत फूट पडेल. सैन्यांत फूट न होतां-ते मारले न जातां जर माझ्या दृष्टिआड होतील—

**मानाजीः**—पण तें व्हावं कसं ? मोहने अशा डावपेंचांनीं मला अडवूं नकोस. मी सरळ वृत्तीचा-शिपाईबाण्याचा माणूस आहें.

**मोहनाः**—मानाजीराव, आतां ही सरळ वृत्ति आणि शिपाईबाणा टाकून मुत्सद्दी-कारस्थानीबाणा आणला पाहिजे. हें पहा, झुंझाररावांवर फितुरीचा आरोप शाबित करून त्याला विजापूर दाखवा.

**मानाजीः**—पण त्याला आधार ?

**मोहनाः**—आधार मी देतें. अफझुलखानानं संभाजीराजाला मारलं आहेना ? अर्थात् शहाजीचा खानावर दंश असणारच. खानाविरुद्ध शिवाजीला मदत करायला त्यानं झुंझाररावाला पाठवला आहे, असं तुम्हीं खानाला पटवलंत तर—

**मानाजीः**—तर काय होईल ?

**मोहनाः**—तुमच्या मनासारखं होईल. आणि माझं कारस्थान यशस्वी होईल. जा. या पावलीं खानाकड जा.

ना ६०८ 9-7-32

**मानाजी**:—हो! ही युक्ति ठीक आहे. तुझ्या ह्या मंत्रानं खानाला मारून झुंझारला विजापूर दाखवतों. मी येतों आतां. पण मोहने—

**मोहना**:—जा. एकदम वाई गांठा. ( मानाजी जातो ) झुंझारराव, नाइलाज म्हणून मी आपल्याशीं अशी कठोर वागतें. माझं प्रेम आपलं रक्षण करील; पण कष्ट चुकवूं शकणार नाहीं. अहाहा ! झुंझारराव किती शांत व गंभीर आपण. आपल्यावरून हे प्राण ओंवाळून टाकावे, असं मला वाटतं. ( जाते. )

---

## प्रवेश दुसरा.

( जंगल रस्ता—दाऊद येतो व टेहेळणी करतो. )

**दाऊदखान**:—शिवाजीला पकडायचा खानानं दरबारांत विडा उचलला, तेव्हां त्याचा केवढा गौरव झाला. त्याच वेळेला या दाऊदखानानं, आपणही पराक्रमाचा एखादा खडा टाकून पहावा, असा निश्चय करून स्वारींत सामील झालों. खान नाकेबंदी करून वाईस बसला. मी जावळीच्या नाक्यावर डोळे मिटून बोक्यासारखा आज नऊ महिने टपून बसलों आहें. डोंगरी उंदरांचा राजा शिवाजी तर नाहींच, पण त्याच्या कळपांतल्या एखाद्या पाजव्या उंदराचा वासही लागत नाहीं. काय करावं ! हा लेकाचा जमिनीखालून सारी दख्खन फिरतो. आतां प्रतापगडावर तर चार घटकांनीं वाईस दिसतो. हा खानाच्या हातीं लागणं कठीण आहे, आणि खानालाही एका साईनं तसंच सांगितलं आहे. पण मला शिवाजी सांपडेल असं आज एका साईनं सांगितलं आहे. तो झुंझारकडे येत असतो. त्याला त्यानं फितूर केला आहे. ( शिवाजीच्या वेषांत नेताजी येतो. )

**नेताजी**:—कोण म्हणतो फितूर ? झुंझाररावांना फितूर मी केले ?

**दाऊद**:—(घाबरतो.) या अल्ला ! मी-मी ना-नाहीं. मानाजीराव म्हणतात.

**नेताजी**:—मानाजीराव ? हा कोण मानाजीराव ? कुठला मानाजीराव ?

**दाऊद**:—मानाजी कोण ? कुठला ? अरे वः ! हा तर शिवाजी. या अल्ला !

अब तो रहेम करना ! शाबास दाऊदखान ! दाऊदखान आतां वजीर होणार ! यंरे तखदीर !

**नेताजी**:—दाऊदखान, तूं शिवाजीचा कैदी आहेस. मुकाट्यानें स्वाधीन हो.

**दाऊद**:—हं ! अरे तुला पकडण्यासाठीं मी आज नऊ महिने टपून बसलों आहें. तुला पकडून विजापुरला नेणार आणि वजीरी मिळवणार. तेव्हां मस्ती न करतां, मला त्रास न देतां स्वाधीन झालास तर तुला सोडून देण्याची मो शिफारस करीन. मस्ती केलीस तर कदाचित् नाहक मरशील. बोल तुला कोणती अट पसंत आहे ?

**नेताजी**:—तुझ्या अटी पसंत करायची मला जरूर नाहीं. मीच तुला या वाईचा सुभेदार करीन.

**दाऊद**:—का मुंडी मुरगळशील ? फितूर व्हायला मी मराठा नाहीं. मला मोठेपणा पाहिजे, पण तो विजापुरांत. आणि मला तो खास मिळणार.

**नेताजी**:—मी मराठा आहें. लढून तुला चीत करून कैद करतों.

**दाऊद**:—अस्सं ! मी मुसलमान आहें. मीसुद्धां चीत करूनच कैद केला असता, पण तूं शहाजीराजांचा मुलगा ! आणि राजे तर माझे जानी दोस्त. असा मला पेंच आहे.

**नेताजी**:—मग हा स्वारीचा खटाटोप कां ? आणि इकड येण्याची दगदग कां केलीत ?

**दाऊद**:—मी आलों तुला पकडायला. पण ही स्वारी आहे अफझुलखानाची. तो मात्र वेळ पडल्यास तुला ठारही करायला चुकायचा नाहीं. कारण तो राजांचा शत्रू आहे. म्हणून तुला एकटा गांठून, सामोपचारानं तुझी समजूत घालून तुझ्या केंसालाही धक्का न लागतां, परस्पर विजापुरास नेऊन राजांच्या हवालीं करण्याचा माझा आणि घाटग्यांचा बेत आहे. म्हणून तर आम्ही दोघे वाईपासून लांब या जावळींत बसलों आहोंत; आणि राजांचा आम्हांला तसा सल्लाही आहे. ( स्वगत ) कशी नामी जबान सुचली. आतां शिवाजी वळलाच पाहिजे. (उघड) मग काय ?

**नेताजी**:—दाऊदखान, मला तुम्ही ओळखीत नाहीं असं दिसतं.

**दाऊद**:—वः ! ओळखला, म्हणून तर मनचा मनसुबा सांगितला. तुला मी कसा ओळखणार नाहीं. तूं राजांचा-माझ्या दोस्तांचा लडका.

**नेताजी**:—पण माझा तडाका तुला माहित नाहीं असं दिसतं.

**दाऊद**:—तुझ्या तडाक्यानं आदिलशाही तडकली म्हणून तर ही स्वारीची तडफ.

**नेताजी**:—दाऊदखान, मला तुझी तरफदारी नको. तूं माझ्या स्वाधीन हो.

**दाऊद**:—( स्वगत ) लेकाचा दम तर जोराचा दिसतो. याला पकडणं कठीण दिसतंय; पण दम सोडतां नये. ( उघड ) शिवाजी, अझून विचार कर, लढायला मी कमी नाहीं; पण कमजास्त झालं तर राजांचा ठपका येईल म्हणून जरा डरतों.

**नेताजी**:—तुझी तशी इच्छाच असेल तर लढाई न करतां माझा कैदी हो.

**दाऊद**:—छे! तें होणार नाहीं. मी–मी लढायला तयार–हो–पण नाहीं.

**नेताजी**:—मी तुझ्या मुसक्या बांधून गडावर नेणार. ( दाऊदखान कमरेला विळखा घालतो ).

**दाऊद**:—या अल्ला! पकडला तुला. आतां कुठं जाशील?

**नेताजी**:—घात झाला! कसा गाफील राहिलों.

**दाऊद**:—अच्छा हुवा! ऐसाही मेरा तखदीर है. शिवाजी मी तुला कैद केला आहे.

**नेताजी**:–कबूल. मी तुमचा कैदी आहे. सोडा विळखा आणि आंवळा जेरबंद.

**दाऊद**:—छे! विळखा सुटल्यावर तूं पळून जाशील, नाहींतर माझीच मुंडी मुरगळशील. मी तुला असाच घेऊन जाणार.

**नेताजी**:—मी मनांत आणीन तर तुला असाच फरफटत गडावर घेऊन जाईन, पण नाहीं. मी वचनाचा सच्चा आणि न्यायाचा चाहता आहें. मी तुमचा कैदी—

**दाऊद**:–आहेस, हें खरं आहे. पळून जाणार नाहींस, तरीपण देवाची कसम खा.

**नेताजी**:—भवानी शपथ मी पळून जाणार नाहीं. ( दाऊद सोडतो. ) पण मीच शिवाजी ही खात्री आहेना? नाहींतर दरबारांत हसं मात्र होईल.

**दाऊद**:—खात्री! अरे बाबा पक्की खात्री झाली. पण थांब, पुन्हां एकवार पहाणी करतों. शिवाजी पुटदिशीं जमिनीतून वर येतो, हा पण तसाच आला; पण तसाच गडप नाहींना होणार? कसम खाल्ली आहे. वेषांतर करतो. हें वेषांतरही असेल. दिसायला शहाजीसारखाच आहे. बरोबर आहे. सरकारी माहिती जुळते तुझ्याशीं.

**नेताजी**:-आणि हा शिवाजी नाशाबीत झाला तर माझी गर्दन नाहींना मारणार?

**दाऊद**:—छे! तसं होणारच नाहीं. कांहीं झालं तरी मी आतां तुला सोडणार नाहीं. तूं शिवाजी नाहींस असं ठरलंच, तर मी तुला माझा पंडित करीन. हें घे वचन.

**नेताजी**:—ठीक आहे. मग चला खानासमोर.

**दाऊद**:—खानासमोर! तो काय ह्मणून? आतां एकदम अल्ली आदिलशहा-समोर. शिवाजीला पकडणाराला बेगमनं वजिरी देण्याचं जाहीर केलं आहे. खान तुला आपल्या ताब्यांत घेऊन वजिरी लाटील. आणि मला फांका मारायला लावील.

**नेताजी**:—खान मोहिमेचे अधिकारी आहेत. त्यांच्या मार्फतच मला घेऊन चला.

**दाऊद**:—काय जगाची रीत तरी! सर्व लोक बड्या लोकांच्या पाठीशीं. यांना बड्या लोकांच्या लाथा गोड लागतात; आणि आमचे गरिबाचे गोड शब्द कडू लागतात.

**नेताजी**:—आपल्या पराक्रमाची मी दरबारांत हजेरी लावतों. नाहींतर खान तुमच्यावर भलतंच कुभांड रचील; आणि वजिरीऐवजीं फांशी देईल.

**दाऊद**:-खरं आहे. पण दरबारांत तूं माझ्याबद्दल बेगमेला काय सांगशीलरे?

**नेताजी**:—दाऊदखान प्रतापगडावर रात्रीचे भुयारांतून एकटे गेले?

**दाऊद**:—या अल्ला! मी नाहीं जायचा. (पळून जातो. नेताजी धरून आणतो.)

**नेताजी**:—अहो, जायचं नाहीं नुसतं सांगायचं. तेंसुद्धां आपण नाहीं; मी.

**दाऊद**:—बरं पुढं काय केलं? आधीं कळलेलं बरं.

**नेताजी**:—मी निजलेला असतां गुंगी येणाऱ्या वनस्पतीनं मला बेशुद्ध केलं. आणि माझी मोट बांधून आपल्या छावणींत आणलं. जागा होऊन पहातों तो मी जेरबंद आणि दाऊदखानाच्या राहुटींत. असं कपटानं-गनिमी काव्यानं मला पकडलं.

**दाऊद**:—अच्छा! बहोत खाशी! पण कायरे शिवाजी, मग बेगमेला काय वाटेल?

**नेताजी**:—तुम्ही युक्तिबाज-कारस्थानी-शूर-लढवय्ये असं वाटेल.

**दाऊदः**—फक्त शूर लढवय्याच ! मी मुत्सद्दी, बडा मुत्सद्दी आहें, असं वाटलं पाहिजे. तुझ्या सांगण्यांत माझा मुत्सद्दिपणा दिसला पाहिजे.

**नेताजीः**—यांत आपला मुत्सद्दिपणा दिसतोच. अहो लढाईची दगदग टाळलीत ना.

**दाऊदः**—हां! हां! बहोत नामी. चलो खानके सामने. ( जातात. )

---

## प्रवेश तिसरा.

( अफझुलखानाचा तंबू-खान व पंडित बोलत बसले आहेत. )

**अफझुलखानः**-पंडितजी, शिवाजी आमच्या सैन्याला भिऊन शरण येईल, असं मला तरी वाटत नाहीं. आजपर्यंत तीन हजार मावळे नोकरीला ठेवले. जावळीकरांची मदत घेऊन मानाजीरावाला जवळ केलं, पण कुणाचाच उपयोग होत नाहीं. आतां माझा कुणावरच विश्वास नाहीं. स्वतःच काय तें करावं.

**पंडितः**—खानसाहेब, या अविश्वासानं मराठ्यांबद्दलच्या आपल्या अनास्थेनं एकेक जहागिरदार आदिलशाही सोडून शिवाजीला मिळतो आहे. ओघाला आलंच म्हणून बोलतों. खानसाहेब, आम्हां मराठ्यांच्या मदतीशिवाय आदिलशाहीलाच काय पण कोणत्याही राज्यकर्त्याला या आर्यावर्तांत राज्यच करतां येणार नाहीं. आदिलशाही मराठ्यांच्याच जिवावर जीव धरून आहे हें विसरूं नका.

**अफझुलखानः**—पण या नऊ महिन्यांत कार्य काय झालं? शत्रूचा दम किती आहे हेंसुद्धां आम्हांला कळूं नये? आमच्या हेरांना किल्ल्याची पायरीसुद्धां गुप्तपणं चढतां येत नाहीं; यावरून मी काय समजूं? पंडितजी तुमचा फितूर का कामाची ढिलाई.

**पंडितः**—आम्हांला फितूर म्हणा किंवा आमच्या कामाची ढिलाई ठरवा. आज आम्हांला तेंही ऐकून घेणं भाग आहे. आज मराठ्यांचा ओढा स्वराज्याकडे आहे, त्यांना वळवून फितूर करून घ्यायचं आहे हे विसरूं नका. खानसाहेब,

काळ आणि परिस्थिति इकडही अधिकाऱ्यांनीं लक्ष दिलं पाहिजे. आपल्याला वाटत असेल तर या घटकेला प्रतापगडाला वेढा द्या. राजनिष्ठ मराठे मरेपर्यंत किल्ला झुंजवायला कचरले तर मराठ्यांना दोष द्या.

**अफझुलखान**:–प्रतापगडाला वेढा देऊन शत्रूचा कोंडमारा होत नाहीं आणि शिवाजी हातीं येत नाहीं. आमचे सर्व बेत त्याला समजून तो आमचाच कोंडमारा करतो; यावरून सर्व दरबारी मराठ्यांची या सैतानाला आंतून मदत आहे असं मी कां म्हणूं नये ?

**पंडित**:—शिवाजीला या गोष्टी कळतात, म्हणूनच तो इतका प्रबल होत चालला आहे. आपण या गोष्टीकड कानाडोळा करतां इतकंच नव्हे तर आपल्या प्रांताची आणि राजनिष्ठ प्रजेची पूर्ण ओळखही करून घेत नाहीं, हेंच आपल्याला नडतं; मराठ्यांचा फितूर नडत नाहीं बरं. खानसाहेब, या जावळीचं महत्व आपल्याला पूर्वीं कळलं होतं का ? आज चंद्ररावासारखा मित्र किती उपयोगी पडता; पण त्या मानी मराठ्याला मगरूर मानून मारूं दिलात आणि एक शिरजोर मराठा नाहींसा झाला या आनंदांत आज तीन वर्षं गप्प बसलांत. शिवाजीला तेवढीच संधी मिळून तो प्रबळ झाला हा का मराठ्यांचा फितूर ?

**अफझुलखान**:—पंडितजी, मराठ्यांचा फितूर खात्रीनं आहे या शहाजीची आपल्या पोराला खात्रीनं फूस आहे. हा शहाजी दरबारांत आल्यापासून मुरारजगदेवादि सारे मराठे निमकहराम झाले आहेत. या मोहिमेंतसुद्धां यांचा कांहीं डाव असावा असंच मला वाटतं. (मानाजी येतो.)

**मानाजी**:—वाटतं कशाला, तसं तें आहेच. शहाजीची शिवाजीशीं असलेलीं सर्व संधानं मला माहीत आहेत, आणि त्यांचा बंदोबस्त करायला हा बंदा तयार आहे.

**पंडित**:—मानाजीराव नीट विचार करून बोला. स्वतःच्या निमकहरामीवर पांघरुण घालण्याकरतां दरबारी मराठ्यांवर भलतींच कुभांडं रचून दरबारी मराठे आणि दरबार यांच्यांत तंटे लावूं नका. या दुहीनं दरबार आधींच कमकुवत होत चालला आहे. आपल्या फायद्यापेक्षां आदिलशाहीची खबिरी प्रथम राखा. खानसाहेब, याचं भलतं सलतं ऐकाल तर मोहिमेंत फूट पडून शिवाजीचं काम आयतंच साधेल.

**मानाजी**:—नाहीं. यावेळीं शहाजीचं कारस्थान जमिनदोस्त केलं नाहीं, तर




दाऊद:— ···म्हणे पंधरा दिवसांत धरून देतों. खानसाहेब. शिवाजी— (पान १७.)

मात्र शिवाजीचं काम साधेल खरं. हुजूर आयत्यावेळीं दगा करून आपल्या फौजेची दाणादाण करण्याकरितां शहाजीनं झुंझार घाटग्याला या मोहिमेंत मुद्दाम गोंवला आहे. हा झुंझार इथून काढला नाहीं तर शहाजीचा बेत सफल होऊन आदिलशाही तोंडघशीं पडेल. कानावर आलेल्या गोष्टी मी आपल्याला कळवण्याचं कर्तव्य केलं आहे.

**अफझुलखान**:—ऐका ! पंडितजी ऐका ! तुमचेच लोक दरबारी मराठ्यांचा फितूर सिद्ध करतात. या शहाजीची कारस्थानं प्रत्यक्ष सुलतानालाही कळलीं आहेत.

**पंडित**:—तें कांहीं असो आणि हा वाटेल तें म्हणो; पण तें सारं खरं मानून कारभार यांच्या हातीं देणं मला योग्य वाटत नाहीं. सूडाच्या कल्पनेनं बेफाम झालेलीं हीं माणसं यांना मागचा पुढचा विचार नसतो. मानाजीराव विजापुरांत गेल्यावर या गोष्टींचा पुरावा करण्याची सर्व जबाबदारी आपल्या शिरावर आहे, याचा विचार करून बोला.

**मानाजी**:—आम्ही राजनिष्ठ राजहिताशिवाय दुसरा विचारच करीत नाहीं.

**पंडित**:—खानसाहेब, याच्यावर विश्वास ठेऊन आमच्या राजनिष्ठेबद्दल आपण साशंक असाल तर आम्ही सारे मराठे या क्षणीं विजापुराला निघून जातों.

**मानाजी**:—जा. तुम्ही सारे फितूर इथून निघून जा. हुजूर हे सारे फितूर निघून गेल्यानंतर पंधरादिवसांच्या आंत मी शिवाजीला आपल्यापुढं आणून हजर करतों. (दाऊद नेताजीला घेऊन येतो.)

**दाऊद**:—पंधरा दिवस कशाला ! याक्षणीं हा वेडा दाऊद शिवाजीला हजर करूं शकतो. म्हणे पंधरा दिवसांत धरून देतों. खानसाहेब, शिवाजी—

**अफझुलखान**:—या अल्ला ! शाबास भाईसहेब, मराठ्यांच्या मदतीशिवाय आम्ही—

**दाऊद**:—नाहीं. खानसाहेब शिवाजीला मी पकडला. म्हणे आम्ही पकडला. दिवसा शिवाजीला पकडायला हा धाडशी, युक्तिबाज दाऊदखानच समर्थ आहे. कसा मुत्सद्दी फांसा टाकला—

**अफझुलखान**:–बहोत खासा ! पंडितजी, भाईसाहेबांनीं शिवाजीला पकडला.

**मानाजी**:—हा शिवाजी नाहीं. शिवाजीला पकडायला डावपेंचच पाहिजेत.

**अफझुलखान**:—भाईसाहेबांनीं शिवाजीला डावपेंचांनींच पकडला आहे.

**दाऊदः**—कसा फांसा टाकला! आणि हा उंदराचा राजा कसा अडकवला हें हाच सांगेल. शिवाजी, सांग मी तुला कसा पकडला? सारी हक्कित सांग.

**मानाजीः**—तुम्हीं शिवाजीला समजतां तरी कोण ?

**दाऊदः**—डोंगरी उंदरांचा राजा समजतों. आणि तुलासुद्धां ओळखतों बरं मी. तूं फितूर आहेस. शिवाजीचा हेर आहेस. शिवाजीला सोडवण्याकरतां ही सारी बतावणी आहे. हे पंडितजी सांगतील—पंडितजी कशाला? हा स्वतःच सांगेल. ए शिवाजी सांग यांना मी शिवाजी आहें म्हणून.

**नेताजीः**—मी शिवाजी आहें.

**पंडितः**—खानसाहेब, हा शिवाजी खास नव्हे. असल्या नादान माणसाच्या नादीं लागाल तर शिवाजी आम्हां सर्वांना नादान ठरवून असलंच एखादं सोंग घेऊन विजापुरला रवाना करील.

**दाऊदः**—हा दुसरा फितूर! खानसाहेब, हे सारे मराठे शिवाजीला फितूर आहेत. मराठे निमक हराम आहेत. आदिलशाहीच्या मालिद्यावर पोसलेले हे पोळ—

**अफझुलखानः**—हां! भाईसाहेब, गप्प बसा.

**दाऊदः**—खानसाहेब पण फितूर.

**अफझुलखानः**—पंडितजी, हा शिवाजी नव्हे म्हणतां? मानाजी हा शिवाजी नव्हे तर कोण ? हा स्वतःच म्हणतो मी शिवाजी आहें म्हणून.

**मानाजीः**—नाहीं. हा शिवाजी खास नाहीं. शिवाजी भाईसाहेबांच्या हातीं लागणं शक्य नाहीं.

**दाऊदः**—आणि तो तुझ्यासारख्या फितुराच्या हातीं लागेल होय!

**पंडितः**—आमच्यावर विश्वास नसेल तर झुंझाररावांना बोलवा ते ओळखतील.

**अफझुलखानः**-झुंझार शिवजीला फितूर आहे त्याची साक्ष काय कामाची? ए बोल तूं शिवाजी आहेस? शहाजी राजांचा बंडखोर लडका तूंच आहेस?

**नेताजीः**—पंडितजीसारख्या स्वामिनिष्ठावर आपला विश्वास नाहीं. मग तो माझ्यावर कसा बसेल? मी शिवाजी नाहीं मी शिवाजीचा शत्रू आहें. मला शिवाजीवर सूड घ्यायचा आहे.

**अफझुलखानः**—भाईसाहेब याला तुम्ही कुठं पकडलांत?

**दाऊद**:—जावळींत, खानसाहेब.

**नेताजी**:—मीच यांच्या हातीं लागलों.

**दाऊद**:—ए शिवाजी, मी तुला पकडला.

**नेताजी**:—मला आपली भेट पाहिजे होती. म्हणून भाईसाहेबांच्या शिवाजीला पकडण्याच्या वेडांत शिरलों; आणि आपल्या पायांपाशीं आलों. मला शिवाजीवर सूड घ्यावयाचा आहे. मी यापूर्वीच आलों असतों; पण मानाजी-रावांच्या कारस्थानामुळं—

**अफझुलखान**:—मानाजींचं कारस्थान! मानाजी हा काय प्रकार आहे?

**दाऊद**:—ही फितुरी आहे खानसाहेब. ए बोल, असा गप्प कां?

**मानाजी**:—हें कुभांड आहे. शिवाजीला पकडण्याशिवाय मला कांहींच सुचत नाहीं. सूडाशिवाय मला दुसरं कारस्थान माहित नाहीं.

**पंडित**:—खानसाहेब, या नव्या माणसाच्या चौकशींत खरं बाहेर पड-ण्याचा जास्त संभव आहे. कायरे तोतया शिवाजी तुझं खरं नांव काय?

**नेताजी**:—मला खरं नांव सांगतां येत नाहीं. मला या प्रांतातील लोक सावजी या नांवानं ओळखतात. मी शिवाजीचा शत्रू आहें, एवढंच आज मला सांगतां येईल. मला वाटेल तर कामगिरी द्या, नाहींतर माझं वाटेल तें करा.

**मानाजी**:—कायरे तूं कुठला? आणि यांच्या हातीं या वेषांत कां सांपडलास.

**दाऊद**:—अरे वः! मी याला पकडला.

**नेताजी**:—मी पुरंदरचा. यांच्या हातीं खानसाहेबांच्या प्रत्यक्ष भेटीकरतां सांपडलों. या पलिकड जास्त खुलासा मला करतां येत नाहीं. जावळींत शिवा-जीच्या हेरांना संशय येऊं नये—

**अफझुलखान**:-जावळींत शिवाजीचे हेर? मानाजी हेंही तुम्हांला कळूं नये?

**पंडित**:—(स्वगत) स्वयंस्फूर्तांची कर्तबगारी भाडोत्र्यांना कशी कळणार.

**मानाजी**:—मलाही तसा संशय आहेच, पण झुंझारराव अधिकारी त्यांनच ही संधी शिवाजीला आणून दिली. खाविंद म्हणून म्हणतों हा फितूर नाहींसा करा. शिवाजीच्या सैतानीला घरांत आणणारीं हीं पिशाचं प्रथम गाडून टाका.

**अफझुलखान**:—हीं सारीं सैतानं गाडण्याकरतांच मी इथं आलों आहें.

**मानाजी**:—मला हुकुम करा, मी गाडतों एकेकाला. प्रथम या झुंझार घाटग्याला नाहींसा करतों.

**अफझुलखान**:–या फितुरीचा नायनाट करायचा मी तुम्हांला पूर्ण अधिकार–

**पंडित**:—हां! एकदम असा अविचार करूं नका. नीट चौकशी करून मग काय करायचं तें करा. आजच याला अधिकार देऊं नका.

**अफझुलखान**:—पण हा फितूर नाहींसा केल्याशिवाय आम्हाला काय करतां येणार?

**दाऊद**:—आम्हाला काय करतां येणार पंडितजी?

**पंडित**:—मानाजीराव, झुंझार फितूर आहे अशी आपली खात्री आहे? मग हा फितूर शिवाजीला पकडायला मदतच करील. झुंझारराव आणि शिवाजी यांच्या भेटीचा योग जुळवून आणा आणि पकडा दोघांना एकदम. हे पुरंदरकर, भाईसाहेब तुमच्या मदतीला आहेतच, मात्र तुमचं कारस्थान झुंझाररावाला कळूं देऊं नका. डाव असा टाका कीं एकाच जाळयांत झुंझार आणि शिवाजी सांपडले पाहिजेत.

**नेताजी**:—(स्वगत) इथं डाव फसला. खानाची दाढी हातीं येत नाहीं.

**अफझुलखान**:—मानाजी, तूर्त पंडितजी म्हणतात तसंच करा. या नव्या माणसाला मदतीला घ्या. भाईसाहेब आपणही यांच्याबरोबर जा. मात्र वेडेचार करून हसं मात्र करून घेऊं नका. (मानाजी, नेताजी, दाऊद जातात.) पंडितजी, आपल्या म्हणण्याप्रमाणं या फितुरांनां मी आजच उजेडांत आणीत नाहीं. यांची चौकशी आजच करणं धोक्याचं आहे; पण मराठ्यांचा फितूर मात्र खास आहे.

**पंडित**:–अधिकाऱ्यांनीं असाच धिम्मेपणा स्वीकारला पाहिजे. राजकारणांत झुंझाररावासारखं प्यादं इरेस घालून शत्रूचा मोहरा चीत करणं हाच मुत्सद्दिपणा, आतांच्या आपल्या डावांत एक शिवाजी तरी हातीं येईल, नाहींतर मानाजी खोटा ठरून झुंझारची आणि त्याच्याबरोबर सर्व मराठ्यांची राजनिष्ठा—

**अफझुलखान**:—मराठ्यांच्या राजनिष्ठेची कसोटी शिवाजीच्या गोटांतील बातमी आणण्यावर ठरणार आहे. पंडितजी मला वाटतं हें काम आपण स्वतः शिरावर घ्याल तरच साधेल

**पंडित**:—(स्वगत) डाव लक्षांत तर आला. मानाजीकडून अत्याचार करवायला यांना मी इथं नको आहें. ठीक आहे. तुमच्या ठावाला सवाई डाव न करीन तर नांवाचा पंडितच नव्हे. (उघड) एक आठवड्याच्या आंत गडावरची

बातमी आणण्याची मी व्यवस्था करतों, तोंपर्यंत छावणींत शांतता राखण्याची सर्व जबाबदारी आपल्या शिरावर आहे.

**अफझुलखानः**—ठीक आहे. बातमी मात्र एक आठवड्यांत आली पाहिजे. ( पंडित जातो. ) याला माझा डाव कळलेला दिसतो. याच्याबद्दल शंका नाहीं; पण झुंझारबद्दल खात्री देतां येत नाहीं. याच्याबद्दल चौकशी केली पाहिजे! पण आमची खात्री पटली असतां चौकशीची जरूर? या मराठ्यांना कारभारांत घेतलं हीच चूक झाली; म्हणून असं यांच्या कलानं घ्यावं लागतं. मानाजीच्या कलानं न घ्यावं तर शिवाजी हातीं येत नाहीं. हा सैतान गाडला नाहीं तर तो आदिलशाहीला पुरा ग्रासणार, घटकोघटकीं पछाडणार. हा शहाजी एवढ्याचसाठीं आदिलशाहींत आला; आणि मुरार जगदेवादि सारे मराठे त्याला सामील आहेत, यांत मुळींच शंका नाहीं. मानाजीरावावर यश अवलंबून, पण त्याला हे दरबारी मराठे नकोत. या मराठ्यांना दुखवावं तर आपसांत फूट पडून सारी मसलत जमिनदोस्त होणार. बस्स! यावेळीं वाटेल त्याला वाटेल तें करूं द्यावं. आपणमात्र तटस्थ वृत्ति स्वीकारावी. वेळीं कुणाला तरी पुढं ढकलून वेळ मारून न्यावी, जवळ म्हणून कुणालाच करूं नये. या पंडितजीला प्रथम दूर केला पाहिजे. झुंझार मानाजीच्या लढ्यांत खरं उजेडांत येण्याचा संभव आहे; पण या निःस्पृह ब्राह्मणाच्या समजुतीकरतां एक आठवडा थांबावं हेंच ठीक. ( जातो. )

---

## प्रवेश ४ था.

( **जावळीः**—झुंझारचा वाडा. )

**कमळजाः**—काय बाई करावं! अझून कसं यायचं होत नाहीं? जाऊन कित्तीतरी वेळ झाला. आज जाणं झाल्यापासून मनाला कशी हुरहुर लागून राहिली आहे. डोळाही पण सारखा लवतो आहे. इकड आल्यापासून आजपर्यंतचे दिवस कसे आनंदांत गेले; पण आजच असं कसं चमत्कारिक वाटतं. ( पाल चिंवचिंवते ) अगबाई, ही पाल कां मला चूपचूप करते! आज असे

अपशकुन कां होतात ? ( पुन्हा पाल चिवचिवते. ) पुन्हा चूप चूप ! बाई, मी चूपच आहें. देवा, काय अरिष्ट आणतो आहेस आम्हां गरिबांवर ? आमचा सर्व भरंवसा तुझ्यावर. आम्हांला तुझ्याशिवाय कुणाचा आधार ? आतां येणं झालं कीं, पुन्हा म्हणून बाहेरच जाऊं द्यायची नाहीं ! हो नाहींच जाऊं द्यायची ! ( झुंझार येतो. ) हे असे हाणामारीचे दिवस आणि या परमुलुखांत—पण हा परमुलुख का ? हा महाराष्ट्र आम्हाला परमुलुख ? ही आमची मायभूमी ना ? आपल्या जन्मभूमींत कुणाला भीति ? हें आमच्या शिवरायाचं शिवराज्य—शिवराज्यांत अनाथांचं रक्षण होतं असं मी ऐकलं आहे; मग मला भय कां वाटतं ? भीतीचं कारण नसतां मन असं कां बरं घाबरतं ?

**झुंझारराव**—हं ! निर्विकार मनाची स्फूर्ति पुढील प्रसंगाची सूचना कशी देते ती पहा. माझी कमळजा, कोमल मनाचा जीव. बिचारीला आनंदाशिवाय कशाचाच गंध नसतां पुढील प्रसंगाचीं दुःस्वप्नं कशीं बुजावताहेत ? यावरून आमच्यावर कांहींतरी प्रसंग येणार खास.

**कमळजा**:-काय बाई करावं ? कांहींच सुचत नाहीं. स्वारी पण कशी अझून येत नाहीं ? मला बाई फार भीति वाटूं लागली आहे. (झुंझार तिला कवटाळतो.)

**झुंझारराव**:—आपल्याला भीति कशाची वाटते ?

**कमळजा**:—कशाची तें नाहीं सांगतां येत, पण जीव कसा भांबावून गेला आहे; पण येणं केव्हां झालं ? आज गडे इतका उशीर ? आज किनई जाणं झाल्यापासून मनाला सारखी हुरहुर लागली आहे. नाथ, असं कां बरं व्हावं आजच ?

**झुंझारराव**:—कां तें मी हिला काय सांगूं ? मोहनेचं छद्मी बोलावणं—मानाजीचं वैषम्य—कधींच न पाहिलेली हिची ही स्थिति, आपण अनाथ अशी हिच्या मनाची स्फूर्ती; मला मात्र पुढील दुःस्वप्नं दाखवून भेदरवीत आहे.

**कमळजा**:—आज असा अबोला कां गडे ? ( झुंझारची बावरी मुद्रा पाहून ) अगबाई, आपली मुद्रा अशी बावरलेली कां ? सांगा, सांगाना गडे ? आपल्याला काय होतंय तें—

**झुंझारराव**:—( स्वगत. ) उत्तराला उत्तर देत बसलों तर ही करुणामूर्ती मलासुद्धां रडायला लावील, विषय बदलावा हेंच बरं. ( उघड ) मला कांहीं होत नाहीं.

**कमळजा:**—मग चेहेरा असा उतरलेला कां?

**झुंझारराव:**—ही मुद्रा बावरलेली पाहिली म्हणून. मला या जगांत तुझ्या-शिवाय कोण आहे? हा आनंद पाहून मी देहभान विसरून जातों. आज आनंदा ऐवजीं मलूलता—

**कमळजा:**—म्हणूनच ना हें औदास्य? आतां किनई मी कधीं कधीं मलूल दिसायची नाहीं.

**झुंझारराव:**—मग मीसुद्धां उदास राहणार नाहीं. आतां भय नाहींना वाटत?

**कमळजा:**—आपण जवळ असल्यावर मला कोण भिववणार?

**झुंझारराव:**—लाडके, या महाराष्ट्रांत आल्यापासून तुला बरं वाटत होतंना? इथं राहणं आनंदाचं वाटत असतां, आजच अशी एकाएकीं भीति कां बरं वाटली?

**कमळजा:**—कारण असं कांहींच नाहीं. पण जाणं झाल्यापासून हुरहुर मात्र लागली आहे. पण मी म्हणतें आजच असं कां व्हावं? आपल्याला काय वाटतं?

**झुंझारराव:**—मला वाटतं तूं आतां विजापुराला जावं. तुला विजापुरला पोंचवून मी परत येईन. विजापुरला गेलीस म्हणजे तुला भीति वाटणार नाहीं. तिथं तुला बरं वाटेल.

**कमळजा:**—मी नाहीं गडे आपल्याला सोडून जायची. आणि आपणही विजापुरला जायचं नाहीं. आपण या महाराष्ट्रांतच रहायचं.

**झुंझारराव:**—कमळजे, तुला वेड तर नाहीं लागलं. अग वेडे, आपल्याला या महाराष्ट्रांत कसं रहातां येईल? माझी नोकरी विजापुरांत आणि या परमुलुखांत—

**कमळजा:**—पण हा परमुलुख का? हा आम्हां मराठ्यांचा आपल्या-शिवप्र-भूचा महाराष्ट्र आपल्याला परमुलुख कसा? नाथ आपल्यालासुद्धां हा महाराष्ट्र परका वाटतो का? या महाराष्ट्रावर आपलेपणाचा हक्क आपल्याला पोंचत नाहीं का? हा महाराष्ट्र—हें शिवराज्य सर्व मराठ्यांचं असं शिवाजीमहाराज म्हणतात, असंच मी विजापुरांत ऐकिलं आहे. मग आम्हाला हा महाराष्ट्र पर-मुलुख कसा?

**झुंझारराव**:--वेडे आज तूं मांडलं आहेस तरी काय? सम मनाच्या राजकारण पंडितालासुद्धां निरुत्तर करणारा हा बुद्धिवाद माझ्या वेडीला कुणी शिकवला ?

**कमळजाः**—मला आपल्याशिवाय कोण शिकवणार ? नाथ, आतांचं माझं म्हणणं आपल्याला खरोखरच का निरुत्तर करणारं आहे? या प्रश्नाचं उत्तर आपल्याला देतां येत नाहीं का ? असं कां बरं? सांगाना गडे आपल्याला कां उत्तर देतां येत नाहीं तें ? माझ्या वेड्या मनाला याचं उत्तर देतां येईल; मग आपल्याला कां नाहीं ?

**झुंझारराव**:--हें वेडं मन मला मात्र वेडा ठरवील खास. तुझा हा वेडा प्रश्न सरळ-शहाणपणाचा असला तरी मला तो वेडेपणाचाच वाटतो. कमळजे, हा महाराष्ट्र माझा असं मला म्हणतां येईल; पण मी कुठं आहे माझा ?

**कमळजाः**—आपण माझे आहांत. मला वाटतं हा महाराष्ट्र आपला आहे; मग आपल्याला कां वाटूं नये ? मुद्दाम माणसानं वेड कां बरं पांघरावं ?

**झुंझारराव**:—मी तुझा तर खराच, तसाच पातशहाचा—विजापुरच्या सुलतानाचा ताबेदार आहें. तूं व मी एकमेकांचीं ऋणानुबंधाचीं-प्रेमाचीं ताबेदार. हा ताबा त्रास देत नाहीं, जड होत नाहीं. सुलतानाचा ताबा आर्थिक आहे. तो सोडणं आणि सुटणं कठीण आणि धोक्याचं आहे. हा देह सुलतानाचा ताबेदार आहे. सुलतानाच्या मताप्रमाणं मला चालल पाहिजे. शिवाजी महाराज सुलतानाचे शत्रु अर्थात् माझेही ते शत्रुच.

**कमळजाः**—असं कां बरं म्हणावं नाथ? शिवप्रभु आपले शत्रु ! आपल्या हितकर्त्याचे आपण शत्रु ? आपल्या भाईबंदांशी शत्रुत्व हें का मनुष्यपण ? नाथ, आपण आपण शिवप्रभूचे शत्रु नाहीं. आपण शिवप्रभूचे दास आहांत. आपल्या हातून शिवसेवाच घडली पाहिजे. नाथ, सुलतानाची ताबेदारी-सुलतानाची आर्थिक ताबेदारी म्हणजे आपल्याला कुणी सुलतानाला विकलं का आहे ? आजपर्यंत घेतलेलं मोल नोकरीच्या रुपानं फिटलं.

**झुंझारराव**:—कमल तूं कांहींही म्हण-कितीही सांग-इतकंच नव्हे तर मला कांहीं वाटलं किंवा पटलं तरी मी आजच शिवाजीचा शत्रु म्हणूनच इथं उभा आहे. मी सुलतानाचा ताबेदार आहें. सुलतानानं मला शिवाजीच्या

पारिपत्याकरतां इकडे पाठवलं आहे. मला माझी नोकरी इमानानं बजावली पाहिजे. हा तावेतारीचा पेशा आहे तोंपर्यंत त्या पेशाला न्याय्य, असंच मला वागलं पाहिजे.

**कमळजाः**—( त्याला सचिंत पाहून ) नाथ, आपल्याला वाईट वाटलं ! मनाला दुःख झालं ! आतां नाहीं हो मी असं बोलायची. आपला आनंद मी वेडीनं घालवला--मन दुखवलं. नाथ, चुकलें हो मी. मी वेडीना ? मला कसें बरं कळावं काय आणि कुठं बोलावं तें ?

**झुंझाररावः**-(स्वगत) अहाहा ! कोण हा सरळ स्वभाव ! हाच परमेश्वराचा निसर्ग ! परमेश्वर अशा साध्या सरळ हृदयांत वास करीत असतो. परमेश्वरी हेतूची कल्पना, अशा सरळ निर्विकार वाणींतून निघते, तीच ग्राह्य नको का मानायला ? पण मला ती ग्राह्य मानतां येईल का ? नाहीं. या मोहिमेंत तरी मी शिवाजीमहाराजांचा शत्रूच राहिलों पाहिजे. ( उघड ) लाडके, तूं वेडी ! मला वेड लावून वेडा ठरवणारी तूं वेडी कशी ? मला वाईट वाटलं नाहीं, माझं मन दुखवलं नाहींस. तुझं बोलणं दुःखितालासुद्धां घटकाभर दुःख विसरायला लावील, मग मला कसं तें दुखवील !

**कमळजाः**—मग असं सचिंत कां बरं असायचं ? असे जड उसासे कां बरं सोडायचे ? मी क्निई आतां भ्यायची नाहीं; पण मला विजापूराला नका गडे पोंचवूं.

**झुंझाररावः**-हे दिवस असे हाणामारीचे, आतां मोहिमेला खरी सुरवात. तुला माहेरीं पोंचवावी म्हणून बरोबर आणली, पण मध्येंच मार्ग अडला गेला. आतां तुला माहेरीं पोंचवणं कठीण, म्हणून म्हणतों, तूं विजापुरला परत जावं हें बरं.

**कमळजाः**—मी आपलीं माहेरींही जाणार नाहीं; आणि विजापूरलाही जाणार नाहीं. मी आपल्याबरोबरच राहणार.

**झुंझाररावः**-पण उद्यां लढाईला तोंड लागलं, म्हणजे तूं एकटी कशी राहशील ?

**कमळजाः**—आपल्या सान्निध्यांत मी एकटी कशी ? लढाईला सुरवात होईल तेव्हां पाहतां येईल. पण नाथ, लढाई होणारच का हो ? आपण शिवप्रभूशीं लढणार ? आपण आपले जातभाई कापणार ? नका, नका गडे असं करूं. आपण शिवसेवाच करा.

**झुंझारराव:**—अग, पण लढाईच्या बाबतींत कोणतीही गोष्ट करणं किंवा न करणं आमच्या हातीं थोडंच आहे ! मी सुलतानाचा ताबेदार—त्याच्या हुकुमाचा बंदा. त्याच्या हुकुमाप्रमाणं मी माझे जातभाई कापले तर त्यांत माझा दोष नाहीं. माझ्या धन्याशीं मी स्वामिभक्तीनं वागलों—माझा पेशा मी इमानानं पाळला तर, माझ्याकड पापाचा—अन्यायाचा वांटा येत नाहीं. आम्ही मुद्दाम आमच्या जातभाईंच्या मानेवर सुरी थोडीच ठेवतों; ताबेदारी आमच्या हातून तसं घडवते.

**कमळजा:**—पण आपल्याला आपलं करणं न्यायाचं दिसतं का ?

**झुंझारराव:**-ताबेदारीला दृष्टि-मन-विचार नसतो. तसं होईल तर हुकमाची अम्मल बजावणी होणार नाहीं. आम्हाला अन्यायी हुकुमसुद्धां न्याय्यच मानले पाहिजेत.

**कमळजा:**—तरमग ही ताबेदारी म्हणजे निव्वळ गुलामगिरीच आहे म्हणायची. नाथ, असली गुलामगिरी आपण कां स्वीकारावी ? सोडा गडे असली नोकरी. अशा नोकरीनं मनःक्षोभ वाढत नाहीं का ? महाराज सोडाच ही ताबेदारी.

**झुंझारराव:**-ताबेदारी सोडून काय करूं ? आपल्यासारख्यांना नोकरीच केली पाहिजे. आम्हां गरीबांचं जीवन नोकरी ना ? नोकरी सोडून कसं चालेल ?

**कमळजा:**—शिवप्रभु कुठं करताहेत नोकरी. त्यांचे वाडवडील नोकर पेशाचे असतांना, त्यांनी ही ताबेदारीची परंपरा तोडली कीं नाहीं ? मग आपण कां तोडूं नये ?

**झुंझारराव:**-शिवाजी राजा आहे, मला करतेस का राजा ?

**कमळजा:**—राजा, करून होत नसतो. व्हावं लागतं. शिवप्रभूनीं स्वतंत्र उद्योग केला आणि राजे झाले. आपण स्वतंत्र व्हा, उद्योग करा, मग राजपद आलंच म्हणून समजा.

**झुंझारराव:**-( स्वगत ) माझ्या आयुष्यांतील भावी घडामोडींचीं हीं शब्दचित्रं, मला आजच किती भंडावून सोडताहेत ! आजचा दिवसच किती चमत्कारिक आहे ! मसलतीच्या नांवावर मोहनेनं घरीं बोलावलं, यांत तिचा कांहींतरी हेतु असलाच पाहिजे. आजपर्यंत हिच्या तोंडून असा बुद्धिवाद मी ऐकला नव्हता. विचारांला प्रेम—आनंद—साधेपणा याशिवाय कशाचाच गंध नसतां,



झुंझाररावः-शिवाजी राजा आहे, मला करतेस का राजा! (पान २६)

आजच अशी प्रेरणा कां व्हावी ! या एकंदर परिस्थितीनं माझा मात्र कोंडमारा चालवला आहे. काय करावं कांहींच सुचत नाहीं.

**कमळजा**:—पुन्हां अबोला ! नाथ, मी आपल्याला न आवडणारं बोलल्यें होय ? खरंच माझ्या बोलण्याचा त्रास झालेला दिसतो. आतां नाहीं हो मी बोलायचीं; पण आपणच ना सुरवात केलीत ? आतां हा विषयच काढूं नका. इकडनं सुरुवात झाली कीं, मग मला भान न राहून मी बोलून जातें आणि मग आपल्याला वाईट वाटतं.

**झुंझारराव**:-तुझं बोलणं मला गोड वाटतं म्हणून तर मी तुझ्याकडून बोलवतों. बोल !

**कमळजा**:—पण त्याचा परिणाम त्रासांत होतो. मी आपली जातेंच कशी.

( जाते. )

**झुंझारराव**:-अहाहा, किती सरळ स्वभाव हा ! मला त्रास किंवा दुःख होऊं नये म्हणून बिचारीची केवढी दक्षता. अशा प्रेमळ जीवाला मी तरी कसा दुखवूं !

( जातो. )

---

## प्रवेश ५ वा.

( **प्रतापगड**—भवानीचें मंदिर. )

**जिजाबाई**:—शिवबा, ताना अझून कसे आले नाहींत ! माझा शिवबा कांहीं झालं तरी दर्शनाची वेळ चुकवायचा नाहीं, मग अझून कां बरं आला नाहीं ! ( देवीजवळ हात जोडून ) माते, माझा बाळ आणि त्याचे संवगडी खुशाल आहेत ना ! नेहमींची दर्शनाची वेळ टळून गेली, या प्रांतांत शत्रूचा सुळसुळाट, हा जावळीचा नवखा गैर माहितीचा मुलूख, म्हणून जीव जरा कच-रतो. माते, कांहीं दगा तर नाहीं ना ! तुझ्या स्फूर्तीनं मी माझ्या बाळाला गर्भा-पासून मायदेशाला वाहिला; त्याला देशसेवेचं-शिवसेवेचं बाळकडू पाजून श्री समर्थांच्या चरणीं वाहिला. माझ्या बाळाच्या हातून मायदेशाचं-हिंदुधर्माचं-

अनाथ दुबळ्यांचं पांग फिटावं, म्हणून मी कशाचीहि पर्वा न करतां, देशसेवेसाठीं स्त्रियांचा स्वर्ग दूर लोटला; आणि माते, तुझ्याचरणीं–देशचरणीं सारं पुण्य वाहिलं. माते माझा बाळ मायदेशाकरतां–स्वधर्माकरतां कामास आला, तर मला दुःख होणार नाहीं, पण स्वराज्य स्थापनेचा पाया आतांसा घातला जात असतां, श्रीसमर्थ शिवबावर रुसलेले; आणि खानाची अवाढव्य सेनेनिशीं मोहिम, म्हणून जीव जरा कचरतो. प्रसंग बिनतोड आणीबाणीचा–अनुभवाचा सल्ला देणारे श्रीसमर्थ दूर, अशावेळीं आम्ही घाबरलेले तुझ्या पायांशिवाय कुणाचा आश्रय मागणार ! माते माझ्या बाळावर, त्याच्या जीवाला जीव देणाऱ्या मावळ्यांवर, हिंदु धर्मावर मायापाखर घाल आणि याप्रसंगीं कसं वागावं याची प्रेरणा मला कर. (हात जोडून देवीचं ध्यान करते. ध्यान सुटतांच स्फूर्ति होते.) अहाहा ! आतां बावरलेलं मन शांत झालं. माते, आम्हांला तुझं दर्शन हाच एक विश्राम. माते, तुझी तुळजापुरची मूर्ति छिन्नविछिन्न करणाऱ्या, माझ्या शंभूराजाला खाणाऱ्या, या खानाचे माझ्या शिवबानं तुकडे तुकडे केले पाहिजेत–त्याला जिवंत जाळलं पाहिजे–त्याचा बळी, माते तुझ्यासमोर दिला पाहिजे, असं असतां, माझ्या शिवबानं, मराठ्यांनीं माघार घेऊन शरण जावं अशी स्फूर्ति तूं कशी देतेस ? मराठ्यांना माघार–(तानाजी रागानं प्रवेश करतो.)

**तानाजी**:--माघार ! माघार काय म्हणून ? आईसाहेब आपलीसुद्धां हीच इच्छा ?

**जिजाबाई**:–ताना, माझ्या शिवबाचीसुद्धां हीच इच्छा आहेना ?

**तानाजी**:--होय. पण ती बदलली पाहिजे. म्हणूनच मी आपल्या पायांकड धांव घेतली. आईसाहेब, हा तानाजी जिवंत असतां–माझे वीस हजार मावळे हयात असतां, शिवशाहीला माघार ? या मूर्ति फोडणाऱ्या, संभाजी राजाच्या खुनी खानाला–या मुर्दाडाला शरण जाण्याची महाराजांना आणि आपल्याला इच्छा कां व्हावी ? असा कोणता प्रसंग आला आहे! कोण भीक घालतो या खानाला ! या प्रसंगाची आपल्याला आणि महाराजांना भीति वाटत असेल तर आपण व महाराज खुशाल रायगडला परत जा. मी एकटा खानाला आणि त्याच्या अफाट सेनेला धूळ चारतां. खानाला जिवंत धरून, तुळजापुरच्या अत्याचाराची भरपाई म्हणून या मदोन्मत्त रेड्याचा बळी भवानी समोर मी देतों. आईसाहेब, आज्ञा करा कीं या घटकेला माझ्या दोन हजार मावळ्यांनिशीं खानावर तुटून पडतों.

महाराजांचा एक मावळा खानाच्या विसांना भारी आहे. मावळे जिवंत आहेत तोंपर्यंत, महाराजांना मी शरण जाऊं देणार नाहीं आणि माघारही घेऊं देणार नाहीं.

**जिजाबाई**:—बाळ ताना, मला हें कळत का नाहीं! माझ्या शूर मावळ्यांच्या जिवावरचना आम्ही राजगडावरून इथं आलों! या घटकेपर्यंत मलासुद्धां खानाला धूळ चारून शंभूराजाच्या वधाबद्दल सूड घ्यावा असंच वाटत होतं.

**तानाजी**:-मग आतांच माघार घ्यावीशी कां वाटते? आईसाहेब, मी एकटा संभाजीराजाबद्दल सूड घेतों. आईसाहेब, कांहीं झालं तरी माघार घ्यायची नाहीं; आणि शरण जायचं नाहीं असले छप्पन खान आपल्या आशीर्वादानं आम्हीं हां हां म्हणतां गारद करूं. आपण धीर द्या कीं, महाराज शरण जाण्याचा बेत खात्रीनं फिरवतील.

**जिजाबाई**:—ताना, पण देवीची तशी प्रेरणा आहेना! शिवबा कुणाला हार का जाणार! तो या देवांच्या मूर्ती फोडणाऱ्या खानाला जिवंत कां जाऊं देणार! पण तो जी आज माघार घेतो आहे, ती देवीच्या प्रेरणेमुळं. तीच प्रेरणा मला झाली. देवीच्या प्रेरणेबाहेर कसं जाणार!

**तानाजी**:--देवीचीच प्रेरणा मग इलाजच खुंटला; पण मला अझूनहि वाटतं कीं, महाराजांनीं शरण जाऊं नये आणि माघार घेऊं नये.

**जिजाबाई**:—बाळ ताना, अरे आज तूं असं काय करतोस? प्रसंगाशीं तोंड द्यायला नको का! आपल्याला शत्रूंनीं चारी बाजूंनीं घेरलं आहे ना? ताना, मावळे जिवावर उदार म्हणून का त्यांना विनाकारण शत्रूच्या तोंडीं द्यायचं! शत्रूला डावपेचांनीं हरवतां आलं तर लढाई कशाला! ताना, आपल्याला लोकसंग्रह केला पाहिजे. शक्य तितकी प्राणहानी टाळली पाहिजे. आज खानाशीं उघड्या मैदानांत सामना दिला तर आपले चार पांच हजार लोक कामाला येतील. प्रत्येक शत्रूशीं असं झुंजूत लोकसंग्रह आटला तर स्वराज्याचा तरणोपाय काय! प्रसंगीं पडती बाजू घेऊन, शत्रूंत फूट पाडून, शत्रूला पांगून आपला लोकसंग्रह वाढवला पाहिजे. आजपर्यंत तेंच करीत आलांत ना! केवळ शिपाईगिरीवर भिस्त ठेवून भागणार नाहीं.

**तानाजी**:—खानाला शरण जाऊन तह करायचा म्हटलं तर खान सांगेल त्या अटीवर महाराजांना खानाच्या गोटांत जावं लागेल; आणि महाराजांना पक-

डण्याची आपली प्रतिज्ञा त्याला सहज साधतां येईल. छे ! नाहीं. आईसाहेब, आम्हांला हें मुळींच पसंत नाहीं.

**जिजाबाई**:—ताना, परमेश्वरी प्रेरणेबद्दल अविश्वास म्हणजेच विनाश. आजपर्यंत या हिंदुपदपातशाहीवर गळचेपीचे थोडे का प्रसंग आले; पण त्यांतून निभावून नेणारी माता जगदंबेचीच प्रेरणा ना ! बाळ, देवीच्या प्रेरणेबद्दल अविश्वास धरून आत्मनाशाला कारण होऊं नका. मातेच्या प्रेरणेप्रमाणं वागून आजपर्यंत आपलं कल्याणच झालं; तीच या दिव्यांतून शिवबाला-मराठ्यांना खात्रीनं निभावून यश देईल. यावेळीं तुझा हिरमोड झाला तरी शेवटीं आपला विजयच होईल. हें वेड तूं मनांतून काढून टाक आणि शांत हो.

**तानाजी**:—शांत ! शांत कसा होऊं ! पुढं काळाचा जबडा पसरलेला पाहून मी शांत कसा होऊं ! आईसाहेब, खानानं दरबारांत काय प्रतिज्ञा केली आहे, हें आपण विसरतां. तो विश्वासघातकी खान खात्रीनं विश्वासघात करील.

**जिजाबाई**:--आणि आपलाच घात करून घेईल. शिवबाला पकडायचा विडा—

**नेताजी**:—( प्रवेश करून ) खानाप्रमाणं खंड्या खोपड्यानंही उचलला आहे. कां ! तानाजीराव आपणसुद्धां फसलांत मग खान फसला यांत काय नवल.

**जिजाबाई**:—कोण नेताजी तूंच का हा ! मला वाटलं शिवबाच आला.

**तानाजी**:--हा शिवाजी खानाच्या मगरमिठींतून कसा सुटला ?

**जिजाबाई**:-भवानीच्या कृपेनं-

**नेताजी**:--आणि कृष्णाजी भास्कराच्या लुडबुडीनं हा शिवाजी नाशाबीत झाला, पण उंदीरशाहीला सनद मिळाली. आईसाहेब, महाराजांना पकडून पंधरा दिवसांत खानासमोर आणण्याची प्रतिज्ञा खंड्या खोपड्यानं केली आहे. प्रतापगडची आपल्याला खडान् खडा माहिती आहे असं तो म्हणतो.

**तानाजी**:—आईसाहेब, हा खान विश्वासघात करून दगा—

[ शिवाजी येतो. ]

**शिवाजी**:-खानाच्या दग्याला आमचाही दगा ठेवलेलाच आहे. विश्वासघात आणि फितूर यांच्यावर विश्वास ठेऊन जय कधींच मिळत नसतो. ( जिजाबाईस व देवीस नमस्कार करून ) आईसाहेब, आज आपल्यापुढं माझ्या तानाजीची माझ्यावर फिर्याद आहे. बाळपणापासून आम्ही जोडीनं स्वराज्याचा खेळ सलो-

ख्यानं खेळलों, त्यांचं संगोपन केलं, पण आज आम्ही भांडलों. आजपर्यंतच्या भांडणांत मी माझ्या तानाजीकरतां अनेकवार माघार घेत आलों आहें. आज मी मागं रहाणं इष्ट नाहीं. तानाजीच्या फिर्यादींत माझी कैफियतही त्याच्याच मांडणींत आहे. आईसाहेब, आपल्यापुढं आम्ही दोघं न्याय मागायला आलों आहोंत. आपल्या हुकुमाप्रमाणं वागायला मी तयार आहें.

**जिजाबाई**:-शिवबा, तानाजीची आतां समजूत पडली आहे. जगदंबेनं तुम्हांप्रमाणं मलाही तशीच प्रेरणा केली. आजपर्यंत देवीची प्रेरणा आपल्याला यशच देत गेली. या प्रसंगीं आपल्याला यश मिळणार यांत मुळींच शंका नाहीं: पण नेताजीची बातमी जरा काळजी उत्पन्न करते.

**शिवाजी**:—म्हणूनच आम्हीं असा विचार ठरवला. खानाला कसंही करून मला पकडून विजापूरला न्यायचा आहे. हा विश्वास घातकी खान आम्हीं म्हणूं त्या अटीवर तहाला तयार होणार असं कळतांच, आम्हीही माघार घ्यायचं ठरवलं. गोंजारीत गोंजारीत खानाला या जावळींत आणायचा, सामदामानं वळला तर ठीकच. नाहींतर—

**तानाजी**:-खानाबरोबर सुलतान सेनेचंही निसंतान करायचं. महाराज, आपलं म्हणणं मला कबूल आहे; पण माझंही एक म्हणणं आपल्याला कबूल केलं पाहिजे.

**शिवाजी**:—रणदेवांच्या निःसीम भक्ता, सांग, तुझं म्हणणं सांग.

**तानाजी**:—महाराज ठरल्या मसलतीप्रमाणं आपण माघार घ्या. खानाला या रडतोंडीच्या घाटांत आणूं या. खान खात्रीनं विश्वासघात करणार; म्हणून म्हणतों आपण खाशा स्वारीनं या मोहिमेंत भाग घेतां कामा नये-किल्ल्याबाहेर जातां कामा नये. आम्ही खानाला पाहून घेऊं.

**शिवाजी**:—तानाजी, अरे खान जो या रडतोंडींत येणार तो मी त्याच्या हातीं सांपडावा म्हणून. आम्हींच भ्याल्याचा बहाणा करून किल्ल्याच्या पायथ्याशीं एकट्या खानाला आणूं; मग कसली भीति! भवानीच्या कृपेनं आणि आईसाहेबांच्या आशीर्वादानं खानाला मी खात्रीनं लढवीन. मीच जर दूर राहून बोलणं करूं लागलों तर ज्या रीतीनं हा प्रसंग टाळायचा असं ठरलं, ती रीत चुकून आम्हीच विश्वासघात केल्यासारखं नाहीं का होणार ?

**तानाजी**:—हो, असं तर होतां कामा नये; पण मला अजूनही असं वाटतं कीं, हा खान खात्रीनं दगा करणार आणि आपला कावा तो साधणार.

**शिवाजी**:—खानाच्या काव्याला आमचा सवाई कावा ठेवलेलाच आहे. आपण नीतिविरुद्ध जायचं नाहीं, पण वेळ पडल्यास काट्यानं कांटा काढायला चुकायचं नाहीं. तानाजी, तूं माझ्या पाठीशीं असल्यावर मी प्रत्यक्ष कृतांत काळाच्या तोंडावरसुद्धां उडी टाकायला कमी करणार नाहीं. याप्रसंगीं तूं आणि मी जोडीनं काम करून, या प्रतापगडावर आपल्या स्वराज्याचं 'स्वराज्यतोरण' दोघांनीं मिळून बांधूं मग तर झालं ना ?

**जिजाबाई**:-शिवबा, ताना, अरे फिर्यादी आरोपी एक झाले आणि सलोख्यानं आपल्या वादाचा निकाल स्वतांच लावूं लागले तर न्यायाच्या दरबाराची वाट काय ?

**शिवाजी**:-न्यायाधिशानं सलोख्याची पुण्यभूमी निर्माण केल्यावर, न्यायाचीं सुंदर रोपं, प्रत्येक हृदयांत उगवल्याशिवाय कशीं राहतील ! आईसाहेब, या स्वराज्यांत प्रत्येक हृदय न्यायमंदीर होईल, अशीच आपली शिकवणूक आहे.

**नेताजी**:—महाराज, खानाच्या छावणींत-या जावळींत दुसरंही एक कारस्थान चालू आहे. मोऱ्यांच्या मोहनेचा व मानाजी खोपड्याचा झुंझार घाटग्याला दगा करायचा बेत असून त्याला आंतून खानाची संमति आहे.

**तानाजी**:—वः ! परस्पर कांट्यानं कांटा निघेल. या हरामखोरांना अशीच शिक्षा झाली पाहिजे.

**शिवाजी**:—हां ! ताना या झुंझारवर येणाऱ्या संकटाला कारण आपण. हा झुंझार आदिलशाहीचा स्वामिभक्त नोकर; पण बाबांचा पट्टशिष्य. बाबानींच वाढविलेला म्हणून खानाचा त्याच्यावर रोष असेल. ताना, विजापुरांत असतांना आम्ही एकत्र खेळलों आहोंत. आम्हीं दोघांनीं स्वराज्याचा विचार केलेला आहे. आम्ही दोघे एकाच मताचे होतों; पण पातशाही डामडौल पाहून दरबारची नोकरी करून स्वजनांचं हित साधावं, असं त्याला वाटून त्यानं तो मार्ग स्वीकारला आणि आम्ही हा मार्ग धरला. माझा झुंझार खऱ्या दिलाचा देशभक्त होता; पण पातशाही गुलामगिरीला मान दिल्यामुळं तो आज पेंचांत आहे. त्याला सोडवणं हें स्वराज्याइतकंच पुण्याईचं आहे. असले तावून सुलाखून निघालेले वीर स्वराज्याला फार उपयोगीं पडतील. ताना, या घटकेपासून जावळींत निवडक वीरांचा संचार असूं द्या. आईसाहेब, या घटकेपासून आम्ही कामगिरीला सुरवात करतों. आम्हांला आशीर्वाद द्या. ( शिवाजी तानाजी देवाची प्रार्थना करतात. शिवाजी उदास होऊन उसासा टाकतो. सर्व चपापतात. )

**जिजाबाई**:—बाळ शिवबा, असा उसासा कां? यावेळीं तुला ईर्षा यायची, मग हें औदासिन्य कां! समजल्यें. यावेळीं तुला श्रींचं दर्शन-समर्थांचा आशीर्वाद पाहिजे आहे.

**श्रीधरस्वामी**:--( आंतून )

समर्थाचिया सेवका वक्र पाहे।
असा सर्व भूमंडळीं कोण आहे।
जयाची लिला वर्णिती लोक तिन्ही।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥ १ ॥

जय जय रघुवीर समर्थ!

**जिजाबाई**:-पहा बाळ, यावेळीं श्रीनीं दर्शन दिलं नाहीं तरी आशीर्वाद पाठवला. त्यांची तुझ्यावर पूर्ण कृपा आहे. श्री आमची कधींच उपेक्षा करणार नाहींत. त्यांचा तुझ्यावर नेहमीं वरदहस्त आहे. त्यांच्या प्रसादानं तुला काळाचंही भय नाहीं.

**श्रीधरस्वामी**:—( प्रवेश करून ) जय जय रघुवीर समर्थ! राजा, तुझा विजय असो!

**शिवाजी**:-(नमस्कार करून) श्रींचा प्रसाद आणला असेल तो सत्वर द्यावा.

**श्रीधरस्वामी**:—राजा, श्रींची तपश्चर्या-त्यांचं प्रत्येक कृत्य तुझ्या हिताचंच असतं. राजा, तुझ्यासारखे कर्ते पुरुष ज्या कार्याला हात घालतील, त्यांत नेहमीं विजयच पावतील. शिवबा, श्रीनीं तुझ्याकरतां कांहीं ओंव्या करून, आज प्रातः समयीं तुला देण्याकरतां माझ्याजवळ दिल्या आहेत. त्या वाच आणि त्याप्रमाणं वाग. ( लिफाफा देतो. )

**शिवाजी**:—( लिफाफा शिरीं धारण करून नंतर फोडून वाचतो. )

**नाना वस्त्रें भुषणें। येणें शरीर शृंगारणें॥**
**विवेकें विचारें राजकारणें। अंतरें शृंगारिजे ॥ १ ॥**
**शरीर सुंदर सतेज। वस्त्रें भुषणें केलें सज्ज॥**
**अंतरीं नसतां चातुर्यबीज। कदापि शोभा नापावे ॥ २ ॥**
**तुंड हेकांड कठोर वचनीं। अखंड तोले साभिमानी॥**
**न्याय नीति अंतःकरणीं। घेणार नाहीं ॥ ३ ॥**
**तरी शीघ्र कोपि सदा। कदापि न धरी मर्यादा॥**
**राजकारण संवादा। मिळोंचि नेणें ॥ ४ ॥**

ऐसे लौंद बेईमानी । कदापि सत्य नाहीं वचनीं ॥
पापी अपस्मार जनीं । राक्षेस जाणावे ॥ ५ ॥
समयासारिखा समयो येना । नेम सहसा चालेना ॥
नेम धरितां राजकारणा । अंतर पडे ॥ ६ ॥
अति सर्वत्र वर्जावें । प्रसंग पाहोन बोलावें ॥
हटनिग्रहीं पडावें । विवेकी पुरुषें ॥ ७ ॥
महायत्न सावधपणें । समयीं धारिष्ट धरणें ॥
अद्‌भुतचि कार्य करणें। देणें ईश्वराचें ॥ ८ ॥
बहुतांसी करतां हट । तेथें येऊन पडेल तट ॥
कोणी एकाचा सेवट । झाला पाहिजे ॥ ९ ॥
बरें ईश्वर आहे साभिमानी । विशेष तुळजाभोवानी ॥
परंतु विचार पाहोनी । कार्य करणें ॥ १० ॥

जय जय रघुवीर समर्थ !

आईसाहेब, तानाजी, नेताजी, हाच शुभ मुहुर्त. याच शुभ मुहुर्तां आम्ही कार्याला आरंभ करणार. नेताजी समर्थ कृपेची वर्दी सर्वांना द्या. आईसाहेब, आम्ही येतों आतां, आम्हाला आशीर्वाद असावा. ( शिवाजी व तानाजी नमस्कार करतात.)

**जिजाबाई:**—शिवबा, ताना तुम्हांवर जगदंबेची–श्रीसमर्थांची कृपा आहेच. तुम्ही विजयी व्हाल असा माझाही तुम्हाला आशीर्वाद आहे !

**श्रीधरस्वामी:**--शिवबा, तूं विजयी होऊन तुम्ही या प्रतापगडावर 'स्वराज्य तोरण' बांधाल असा श्रीसमर्थांचा तुला आशीर्वाद आहे. (पडदा पडतो.)

---

**अंक पहिला समाप्त.**

# अंक दुसरा.

## प्रवेश पहिला.

( जावळी–मोऱ्यांचा वाडा–मोहना सचिंत बसली आहे. )

**मोहनाः**—हं! शेवटीं आमच्या कारस्थानाला असा टोला दिला अं! शिवाजीनं आम्हां सर्वांनाच नादान ठरवायचा घाट घातला म्हणायचा. खान या जावळींत आला, तर तो या सैतानाच्या हातून कसचा सुटतो. कांहीं झालं तरी खान रडतोंडींत येतां कामा नये. खान तहाला तयार झाला, तर झुंझाररावांना या मोहिमेंतून हुसकावायचं कशाला? आम्ही म्हणूं त्याप्रमाणं खानानं वागावं, सांगूं त्या ठिकाणीं वाकावं म्हणून आम्हांला झुंझारराव नको होते; पण आतां काय! खान जावळींत येणार मग असेनात का झुंझारराव इथं. अहाहा! झुंझारराव, आपली शांत गंभीर मूर्ति या मोहनेनं हृदय सिंहासनावर उच्च पदीं बसविली होती. आपल्या कर्तबगारीच्या गोष्टी बाबांच्या तोंडून ऐकून माझं प्रेम आपल्यावर जडलं. कर्तबगारीचा वैभवाकडील आपला मार्ग सुलभ करावा; कर्तबगारी आणि वैभव यांच्यामधील गरिबीचा खंदक आपल्याला चटकन ओलंडतां यावा; म्हणून या वैभवशाली मोहनेची जोड आपल्याला मिळून आदिलशाहींत आपण उच्च पद गाठावं, अशी माझी फार इच्छा होती; पण—(संताजीला येतांना पाहून मोहना दचकते, खूनशी वृत्तीचा अंगांत संचार होतो.) काय–काय मी बरळत होतें! प्रेम! प्रेम आणि सूड कधींतरी एकत्र नांदतील का! प्रेमाच्या रक्षेतूनचना सूडाचा जन्म! मोहने, वेडे पोरी या जगांत–या दगेबाज जगांत तुझ्या प्रेमाला थारा कसा मिळेल! बाबांच्या चितेंत तुझ्या हृदयांतील प्रेम जळून त्याची राख झाली. तुझ्या हृदय सिंहासनावरून झुंझाररावांना खालीं ओढून त्या ठिकाणीं सूडाच्या सैतानानं आपलं ठाणं दिलं. हा सैतान मानाजीच्या रूपानं माझ्या प्रेमदेवाचा पहिला बळी घेत आहे. झुंझारराव, झुंझारराव हें मी काय पहातें. ( बेशुद्ध पडते. संताजी धांवत येऊन तिला सांवरतो इतक्यांत मानाजी येतो. )

**मानाजीः**—झुंझारराव! पुन्हां झुंझारराव इथं! या सैतानाचं आयुष्य एक आठवड्यानं वाढतांच, हें सैतान हिला पछाडूं लागलं आं! काय करूं रे, याला

केव्हांच गाडला असता; पण तो कृष्ण्या मध्यें आला. नाहीं, आतां याला गाडलाच पाहिजे.

**मोहनाः**—हायरे दैवा! घात झाला. मेल्यांनीं वार केला. पडले, मोहनेचं नशीब फुटलं. मेल्या, याचा सूड घेईन बरं मी.

**संताजीः**—ताईसाहेब, हें काय बरळतां. हे पहा मानाजीराव आले आहेत. मानाजीराव जरा थांबा, ताईसाहेब थोड्या वेळांत सावध होतील. धनीसाहेबांच्या खुनामुळं कोंवळ्या मनाला धक्का बसून संतापातिरेकांत केव्हां केव्हां असं कांहीं-तरी बरळतात. पोर वय, तारुण्याचा भर आणि त्यांत हा असा अज्ञातवास! हा त्यांचा दोष नाहीं! दैव झालं.

**मानाजीः**—अस्सं, मला वाटलं पुन्हां तो हरामखोर इथं आला कीं काय!

**संताजीः**—नाहीं. झुंझारराव इथं कधींच येत नाहींत. (मोहना सावध होते.)

**मोहनाः**—कोण मानाजीराव! संताजी, तूं इथं असून हे उभे! बसायला तरी सांगायचं होतंस. केव्हां आलांत आपण? बसा. उभे कां?

**मानाजीः**—(स्वगत) अहाहा! फारच मोहक, फारच मधुर स्वागत; पण नाहीं. हें वरकरणी आहे का खरंच आहे तें अजमावलं पाहिजे. (उघड) आतांच आलों. आपण झुंझारराव-झुंझारराव असं ओरडलांत तेव्हां आलों. मोहने, अजून हें पिशाच्च तुझा पिच्छा सोडीत नाहीं आं?

**मोहनाः**--नाहीं. तसंच केवळ नाहीं. झुंझारराव कशाला इकड पहाताहेत. आपल्या प्रयत्नानं होणारं त्यांच्या नाशाचं चित्र पुढं उभं राहून क्षणभर वाईट वाटलं इतकंच. पण आतां काय त्याचं; व्हायचं तें होणारच. आपण आधीं या आसनावर बसा.

**मानाजीः**—मोहने झुंझारचं आयुष्य एक आठवड्यानं वाढलं. तो कृष्ण्या मध्यें आला नसता तर काल रात्रींच त्याला नाहींसा करून टाकला असता. खान माझ्या मुठींत आहे. माझ्या मोहिनीनं-शिवाजीला धरून देतों; या मंत्रानं आणि दरबारी मराठ्यांच्या निंदेच्या पुंगीनं हा आदिलशाहीचा नाग मी वळवीन तिकड वळतो आहे. मध्येंच त्या कृष्ण्याला थोडा बुजतो त्यालाही दूर करीन.

**मोहनाः**—अहो गारुडी ही पुंगी जरा आंवरा आतां.

**मानाजीः**—ती काय म्हणून?

**मोहनाः**—तुमचा नाग, तुमची पोतडी सोडून प्रतापगडच्या गरुडाच्या

ढोलींत चालला म्हणून. मानाजीराव तुम्हांला सांगातं तेवढंच घेऊन बसतां. त्याच्या साधक बाधक गोष्टींचा तुम्ही मुळीं विचारच करीत नाहीं. तुमच्या शत्रूचं काय कारस्थान चाललं आहे इकडे लक्ष द्या. झुंझाररावाला तूर्त सोडा.

**मानाजीः**—झुंझारला सोडूं! तो कां ? पुन्हां वळली वाटतं आपली दृष्टि त्याच्याकडे. झुंझारला सोडा आणि यांच्या चैनी चालवा, असं असेल तर त्याला उद्यांच ठार करतों.

**मोहनाः**—मानाजी, तुमची तुम्हांला शुद्ध आहे का ? कुणासमोर काय बरळतां याचा सुमार आहे तुम्हांला ? मोहना प्रेमाची पागल नाहीं. मानाजीराव, शिवाजी खानाला शरण येतो.

**मानाजीः**—मग त्यांत काय बिघडलं ? आपल्या पायांनीं मरायला येत असेल तर आपला त्रास वांचला. शिवाजी शरण आला तरी खान त्याला सोडणार नाहीं.

**मोहनाः**—हे खानाच्या मनचे मांडे आहेत. तुमच्यासारखे नादान शत्रू शिवाजीला मिळतात, म्हणून तर दिवसें दिवस तो प्रबळ होतो आहे. शिवाजी स्वतः होऊन तुमच्या हातीं पडण्याइतका तो मूर्ख नाहीं. तो मोठा धूर्त आहे. शिवाजीचं हें कारस्थान यशस्वी झालं; त्याच्या म्हणण्याप्रमाणं खान जावळींत आला तर तो मेलाच म्हणून समजा.

**मानाजीः**—हें राजकारण आहे. तें तुम्हां बायकांना थोडंच कळायचं आहे. तुम्ही बायकांनीं प्रेमानं पुरुषांना डोलवावं. राजकारण आम्ही पुरूषांनींच खेळावं. मला तूं कमी मुत्सद्दी समजूं नकोस. शिवाजीच्या या कारस्थानाचा मी चांगलाच उपयोग करून घेईन.

**मोहनाः**—तर तर ! दिवे ओंवाळा दिवे !

**मानाजीः**—तीच वेळ आतां येणार आहे. शिवाजी शरण कशाला यायला पाहिजे. खानाला जावळींत आणून शिवाजीला धरून देतों. हा प्रतापगड–त्याच्या चोरवाटा माझ्या इतक्या कुणालाच माहित नाहींत. चोरवाटेनं चोरटा छापा घालून शिवाजीला हा मानाजी पकडणार.

**मोहनाः**—आणि चोरट्याप्रमाणं भुयारांत अडकून शिवाजीच्या हातीं लागणार. मानाजी शत्रुत्व करावं, पण तें केव्हां ! आपल्या बलाबलाचा विचार करून मग. शिवाजीनं तुमची देशमुखी काढली ती तुमचा मगदुर ओळखूनच ना ?

मानाजीराव, प्रतापगड आतां पूर्वीचा राहिला नाहीं-पूर्वीच्या चोरवाटाही आतां राहिल्या नाहींत, इतकंच नव्हे तर तुमच्या सारख्यांना पकडणारे ते सांपळे झाले आहेत.

**मानाजी:**—(स्वगत) काय बायको आहे पहा! सारखी बोलून बोलून झुलवते आह. हृदयाचा थांग लागूं देत नाहीं. कुठची बातमी कशी गोळा करील आणि मतलब साधण्यासाठीं तिचा कुठं मारा करील, याचा नेम नाहीं; पण मानाजी हा कांगाव ओळखतो. ही सारी धडपड मी झुंझारला सोडावा म्हणून आहे: पण मी त्याचा सत्यानाश केल्याशिवाय गप्प बसणार नाहीं.

**मोहना:**—विचारांतसे पडलांत ! पटतं वाटतं माझं म्हणणं ! अहो मुत्सद्दी कळली का आपली चूक ? मी असंही ऐकत्यें कीं, खानाला शिवाजीच्या बलाचा अझून पत्ता लागत नाहीं म्हणून. मानाजीराव, आपण या प्रांतातले ना ? या प्रांतांतला खडान्‌खडा आपल्याला माहित आहे, असं आपण म्हणतां: पण हे खडे तुमच्या कामीं नाहीं हो यायचे ! ते शिवाजीच्याच कामीं यायचे आणि तुमचा कपाळमोक्ष करायचे. म्हणून म्हणतें, आपल्याला कळत नाहीं तर दुसऱ्यांचं तरी ऐका आणि आपलं कार्य साधा.

**मानाजी:**—(स्वगत) हिची ही बत्तिशी खिळेपर्यंत हिच्याच कलानं घ्यावं. (उघड) मग मी काय करूं म्हणतेस ? शिवाजीचा नाद सोडूं ?

**मोहना:**-तो तर आपोआपच सुटतो आहे. आपल्या पदरीं नादानपणा येतो आहे. कायससं म्हणतात ना 'विनाश काल विपरीत बुद्धि' ! तोच शिवाजीचा पहा ! काळ चालता आहे; म्हणून शत्रूंनासुद्धां आत्मघाताची बुद्धि सुचते. (रडण्याचा बहाणा करून) फुकट फुकट मी तुम्हांला जवळ केले.

**मानाजी:**-मोहने, तुझ्या या रडण्याचा कांहींएक उपयोग होणार नाहीं. माझं अंतःकरण दगडाचं आहे, त्याला तुझे हे अश्रू पाझर फोडूं शकणार नाहींत. तुझं हें मायावी वर्तन मला समजतं; तूं अश्रूंचा समुद्र करून त्यांत आपल्या जाराला—

**मोहना:**—मानाजी !

**मानाजी:**—झुंझारला लपवून ठेवलास तरी माझ्या मगरमिठींतून तो आतां सुटत नाहीं; हें पक्कं लक्षांत ठेव.

**मोहना:**—मानाजी सांभाळून बोला. जा. इथून काळं करा. नादान ते नादान आणि वर दिमाख ! जा. मला तुमची मुळींच पर्वा नाहीं.

**मानाजीः**—( स्वगत ) प्रेमग्रंथी नाजूक पण अभंग असते, ती दृढ झाली कीं तुटत नाहीं असं म्हणतात; पण इथं अनुभव तर निराळाच येतो आहे. का हिचं माझ्यावर प्रेमच नाहीं! नाहीं असंही म्हणतां येत नाहीं. अझून हिच्या कठोर बोलण्यांत आदर आहे. मग तें तुटूं कां पहातं? मी फाजील ताणलं तर नाहीं. हो असंच. ( मोहना वळून पहाते ) आहे, अझून आशा आहे. पुन्हां एकदां पड-ताळा पहावा. ( उघड ) मोहने—

**मोहनाः**—काय म्हणतां ?

**मानाजीः**—मोहने, झुंझारला ठार करायचा खानानं मला हुकूम केला आहे. उद्यां रात्रीं मी त्याला रौरवांत पाठवणार. त्याच्या बायकोची भर बाजारांत बेअब्रू करणार. माझ्या शौर्याचं स्मारक आणि तुझ्या प्रेमाचं चित्र म्हणून तुझ्या डोळयां-समोर–तुझ्या या वाड्यासमोर त्याला झाडाला टांगून ठेवणार.

**मोहनाः**—मानाजी, ही मोहना अझून जिवंत आहे, ती कशाकरतां ? जगाकरतां ? नाहीं. मला जगायचं आहे तें एकाच गोष्टीकरतां. पितृऋण फेडण्याकरतां–बाबांच्या खुनाबद्दल सूड घेण्याकरतां–शिवाजीला जगांतून नाहींसा करण्याकरतां. जगाला मोहना दुष्ट, क्रूर, राक्षसी, खूनशी वाटेल, पण ती मूळची तशी नाहीं. मी जी राक्षसीवृत्ति धारण केली आहे, ती दुष्टपणानं दुष्टावा–क्रूर-पणानं क्रूरपणा आणि राक्षसी वृत्तीनं जगांतले राक्षस नाहींसे करावे म्हणून; पण मानाजीराव, स्वार्थाकरतां अन्यायानं बिचाऱ्या निरपराध जीवांनां मारावं असं मला कधींच वाटणार नाहीं. आणि त्याच दृष्टीनं मी झुंझाररावांकड पहातें.

**मानाजीः**—तर मग त्याला इथून काढून लाव असं कसं सांगितलंस ?

**मोहनाः**—खान तुमच्या मुठींत रहावा म्हणून. खानानं प्रत्येक गोष्ट आपल्या सल्ल्यानं करावी म्हणून. आतां काय! खानाचं मन त्यांच्याबद्दल कलुषित झालं आहे. आतां ते कुठंही असले तरी सारखेच. हें पहा कांहींही करा; पण खानाला जावळींत येऊं देऊं नका. जा आपली सगळी मुत्सद्देगिरी खर्चीं घाला आणि खानाला वाईतच थोपवून धरा.

**मानाजीः**—शिवाजी केव्हां एकदां हातीं येतो असं खानाला झालं आहे. माझ्या सांगण्याचा त्याच्यावर परिणाम होईल असं मला वाटत नाहीं.

**मोहनाः**—मग खान तुमच्या मुठींत कुठं आहे ?

**मानाजीः**—खान माझ्या मुठींत आहे तसाच तो त्या कृष्णाच्याही कह्यांत

आहे. प्रथम त्याला दूर केला पाहिजे. खानाला वळवायला तसंच कारण घडवून आणलं पाहिजे. खानाला वळवायचं साधन म्हणजे झुंझार. त्याच्या बायकोचा ओढा शिवाजीकडे आहे, ही गोष्ट दाऊदखानाच्या नजरेस आणून झुंझारच्या फितूरीचं प्रतिबिंब त्याला दाखवतों; आणि पंडिताला दाऊदखानाकडून पुराव्यानिशीं खानापुढं खोटा पाडतों कीं, खान वळला माझ्याकडे. मोहने, मी येतों आतां. माझी मुत्सद्देगिरी तुला आठ दिवसांत दिसेल. या मानाजीची योग्यता तुला लवकर कळेल. तूं मात्र आपल्या इमानाला जाग म्हणजे झालं.

( मानाजी जातो. )

**मोहनाः**—हं! मानाजी कशाला आलास पुरुषाच्या जन्माला? शेंदाडा तुझ्या हातून काय होणार हें दिसतंच आहे. (संताजी येतो.) संताजी, मानाजीचा उपयोग होईल असं मला वाटत नाहीं.

**संताजीः**—हें मी कधींच ओळखलं होतं. पर्यायानं आपल्याजवळ बोललोंहि होतों; पण आपला कल त्याच्याकडे झुकल्यामुळं आपण माझ्या सांगण्याला अर्धचंद्र दिलात. शिवाजीनं प्रतापगडावर तळ दिल्यामुळं खानाला जावळींत येणंच भाग आहे. खान जावळींत आल्यावर सिंहाचं कातडं पांघरलेलं हें गाढव उजेडांत येणार; आणि त्याच्या संगतीनं आपल्या कारस्थानाला मूठमाती मिळणार. ताईसाहेब, सूड घ्यायचा असेल तर तो स्वतःच घेतला पाहिजे; आणि तो हा संताजी घेणारच. आठ दिवसांत तें तुम्हाला पटेलही.

**मोहनाः**—पण हा मानाजी जावळींतून जाईपर्यंत त्याच्या पाठीवर रहा. हा झुंझाररावांचा खात्रीनं बळी घेणार. वाटेल त्याची मदत घे; पण त्यांचा बचाव कर. आपल्यामुळं विनाकारण निरापराधी झुंझारराव मरतां कामा नये.

**संताजीः**—मदत कुणाची घेऊं? दाऊदखानाची घेऊं का?

**मोहनाः**—मानाजी बहुतेक हें काम दाऊदखानाकडूनच करवील.

**संताजीः**—मग मी सावजीची मदत घेतों.

**मोहनाः**—वाटेल तें कर, जा. मी ही इथली व्यवस्था लावून तयार होतें.

## प्रवेश दुसरा.

( दाऊदखानाची राहुटी–दाऊदखान व नेताजी येतात. )

**दाऊद**:—सावजी, आज आपल्या मानाजीरावांनीं एक सुंदर संधी साधून देण्याचा घाट जमवून आणला आहे. काम कसं अगदीं गुप्तपणं झालं पाहिजे.

**नेताजी**:—वः ! गुप्तपणं, आणि तें तुम्हीच करणार ना ? तमाम आदिलशाही तुम्हांला वेडा म्हणते, मी या मानाजीला वेडा म्हणतों. खाशी वेड्यांची जोडी मिळाली.

**दाऊद**:—सावजी, मी आतां वेडा नाहींरे. तुझं हें शहाणं डोकं मला शहाणाच ठरवील. तसंच हा मानाजी वेडा असता तर खानानं त्याच्यावर विश्वास टाकला असता का ? तूं कांहींतरीच म्हणतोस.

**नेताजी**:—मी त्याला वेडा तर म्हणतोंच. आतां तो हुषार, तसाच धाडशी आहे म्हणून खानाची त्याच्यावर थोडीशी मर्जी आहे. बाकी आजचा त्याचा डाव निराळाच असावा. भाईसाहेब आज मानाजीनं काय करायचं ठरवलं आहे तें सांगा. मग सांगतों त्याचा डाव.

**दाऊद**:—आज कांहींच करायचं नाहीं.

**नेताजी**:—कांहींच करायचं नाही ! मग मला कशाला बोलावलात ? बरं तर– ( जाऊं लागतो. )

**दाऊद**:—अरे हा गेला कीं काय ! सावजी, सांगतों. मानाजी आज वाईस खानाकड गेला आहे. उद्यां प्रहर रात्रीं परत येईल. उद्यां मानाजी झुंझारचा खून करणार आहे खून. आणि सावजी तूं आणि मी–

**नेताजी**:—तूं आणि मी काय ?

**दाऊद**:—झुंझारच्या बायकोला पळवून माझ्या छावणींत आणायची.

**नेताजी**:—आणि ती कशाला ?

**दाऊद**:—कशाला ? एवढंही कळूं नये तुला ? फितूर मराठ्यांचा नक्षा उतरण्याकरतां तिचा माझ्याशीं निका लावायचा आहे.

**नेताजी**:—( स्वगत ) असा डाव टाकला काय या चोरानं ? ( उघड ) भाईसाहेब, डाव आला लक्षांत.

**दाऊद**:—मी सांगितला तेव्हां ना !

**नेताजी**:—पण त्यांतलं मर्म कुठं कळलं आहे तुम्हांला ? परवां पंडितजी-समक्ष खानासमोर आपण मानाजीची फजिती केलीत !

**दाऊद**:—कुणी ? मी फजिती केली. छे ! मला नाहीं आठवत.

**नेताजी**:—अहो झुंझार फितूर असल्याची बातमी त्यानं तुम्हाला सांगितली, आणि तुम्ही ती सगळया छावणीभर केलीत. तेव्हां कसलीच गुप्त बातमी तुम्हाला सांगू नये अशी खानाची त्याला ताकीद आहे. त्याचा वचपा जावळींत तुमची फजिती करून तो काढणार, हें मलासुद्धां कळलं आहे. म्हणूनच मघाशीं मी तसं बोललों. तुमची फजिती करण्याकरितां त्यानं लोकसुद्धां तयार करून ठेवले आहेत. शिवाय त्याला तुम्ही इथं नको.

**दाऊद**:—आं ! अस्सं काय ? अरे चोरा माझी फजिती तूं करणार ? सावजी या मानाजीची फजिती करायची तूं काढरे एखादी शक्कल. ऐशी शक्कल काढ कीं, तो पुरा चीत झाला पाहिजे. या जावळींत त्याची गाढवावरून धिंड निघाली पाहिजे. चोर, हरामखोर, पाजी, चुगलखोर, आतां ये तूं म्हणावं माझ्याकड, मग दाखवतों पराक्रम. नादान माझी फजिती करतो.

**नेताजी**:—हां ! हां ! भाईसाहेब, असे एकेरीवर येऊं नका. माझं पुरं ऐकून तर घ्या. पंडितजीच्या युक्तीप्रमाणं शिवाजी सांपडणार. जावळींत तुम्ही एकटेच मुसलमान अधिकारी शिवाय खानाचे मेहुणे, अर्थात् शिवाजीला पकडणारे पराक्रमी अधिकारी तुम्हीं, असंच खान दरबारला सांगणार. अहो, पण तें या मानाजीला नको आहे. जावळींत तुमची फजिती करून तुम्हांला घालवायचें आणि खाना-समोर मराठे सरदारांच्या बायकांची तुम्ही नाचक्की करतां, बलात्कार करतां असं सांगून तिथं पुन्हां फजिती करायची असा गुलामाचा डाव आहे.

**दाऊद**:—या अल्ला ! तोबा तोबा. क्या काफरकी अवलाद है ! सावजी तूं काढरे एखादी शक्कल. आतां तो माझ्यासमोर तर येऊं दे. त्याचे तुकडे तुकडे न करीन तर नांवाचा दाऊदखानच नव्हे.

**नेताजी**:—तें मला माहीत आहे. पराक्रमी अहांतच तसे आपण. पण पराक्रम असा फुकट घालवायचा नाहीं. पराक्रमाच्या वेळीं पराक्रम दाखवूं.

**दाऊद**:—मग आतां काय करूं ?

**नेताजी**:—अगोदर ती तलवार म्यानांत घाला.

**दाऊद**:—सावजी तलवार म्यानांत घाल. प्रथम कांहींतरी युक्ति काढ. मानाजीची फजिती मला दाखव.

**नेताजी**:—भाईसाहेब, मी जवळ असतां फजीति शक्यच नाहीं. आपला शत्रू तो माझा.

**दाऊद**:—वः ! वः ! वः ! सावजी अरे तें मी जाणतों; म्हणूनच कांहीं कळलं की तुला सांगतों.

**नेताजी**:—असंच करा. नाहींतर फसाल. ( स्वगत ) आणि माझं काम साधणार नाहीं.

**दाऊद**:—असंच करीन पण शक्कल काढ.

**नेताजी**:—काढूं! काढतों हां. भाईसाहेब, आपण जरा-

**दाऊद**:—बाहेर जाऊं ? जातों.

**नेताजी**:—जाऊं नका. इथं उभे रहा. मी शक्कल काढतों. ( स्वगत ) झुंझारची व महाराजांची भेट करायला ही संधी बरी आहे. मानाजीचा डाव हाणून पाडून मोहनेच्या सूचनेप्रमाणं झुंझारला तर वांचवणार. हा खुळा माझ्या पुरा हातीं आला आहे. आतां बातमी काढण्याच्या मिषानं याला गुंगारा देऊन गड गांठावा.

**दाऊद**:—बेटा खुळला आहे. डोकं आहे गुलामाचं.

**नेताजी**:—भाईसाहेब, शक्कल निघाली. पण मी म्हणेन तसं वागावं लागेल.

**दाऊद**:—अगदीं तुझ्या म्हणण्याप्रमाणं. एक तसूभरसुद्धां कमजास्त नाहीं.

**नेताजी**:—मी आतां तयारीला बाहेर जातों.

**दाऊद**:—आणि मी इथं एकटाच.

**नेताजी**:—प्रहर रात्रीं परत येईन. यांतलं एक अक्षरसुद्धां फुटतां कामा नये. फुटलं तर फजिती होईल तुमची. आतां मानाजी आला तर वेड पांघरा.

**दाऊद**:—त्याची नको काळजी. मुळवं पाणी आपोआप बाहेर येईल.

**नेताजी**:—चिडून बडबडाल तर सारं फुटेल.

**दाऊद**:—पण त्याची फजिती केव्हां, कशी, कुठं करणार तें सांग.

**नेताजी**:—मानाजीनं ठरवलेल्या वेळीं, मानाजीनं ठरवल्याप्रमाणं, झुंझारच्या घरीं, खानासमोर आणि कशी तीं सांगूं का भाईसाहेब ?

**दाऊद**:—बेशक सांग.

**नेताजीः**--पण तें बाहेर फुटलं तर?

**दाऊदः**--माझाच घात मीच केल्यासारखा होईल.

**नेताजीः**--( स्वगत ) पण माझं कार्य कसं साधेल !

**दाऊदः**--सावजी सांगना. मी कुणाजवळही बोलणार नाहीं. तुझ्या पायां-शपथ. ( दाऊद पायां पडतो. नेताजी त्याला उठवतो. )

**नेताजीः**--हां हां, भाईसाहेब हें काय करतां? मीच तुम्हाला सलाम करायचा.

**दाऊदः**—पण माझी अब्रू सलामत ठेवणं तुझ्या हातीं आहेना? सावजी, अरे कसले तुम्ही आम्ही चाकर आणि धनी. तूं व मी भाई भाई. असे ( हातांत हात घालून ) जोडीनं आपल्या शत्रूचा नक्षा उतरूं. मानाजी ये, आतां आम्ही तुला एकट्याला पुरून उरूं.

**नेताजीः**—कामाच्या वेळीं तरी तुम्ही असं म्हणतां. चला, कसं वागायचं त्याची तालीम देतों.

**दाऊदः**-शिकवून ठेवतोस होय? अच्छा चलो (हातांत हात घालून जातो.)

---

## प्रवेश तिसरा.

( अफझुलखान व पंडितजी )

**अफझुलखानः**—पंडितजी, शिवाजी म्हणेल तर आपण वाई सोडावी का? वाई सोडून जावळींत गेलों तर शिवाजी चोरटे छापे घालून आम्हांला त्रास देईल असं तुम्हांला वाटतं?

**पंडितः**—तहाचं बोलणं सुरू होईपर्यंत आपण वाई सोडूं नये, हेंच ठीक. एकमेकांचे वकील परस्परांकडील परिस्थिति पाहून तहाच्या मसलतीला कसाकाय रंग आणतात तें पाहून मगच छावणीचा तळ उचलावा.

**अफझुलखानः**--यावरून शिवाजीबद्दल अद्याप आपली खात्री नाहीं. शिवाय शिवाजीच्या या खलित्यावरून तो प्रतापगड सोडून निदान गडाखालच्या मैदानाच्या पुढं येईल असं मला वाटत नाहीं. आम्हांला किल्यांत जाणं धोक्याचं आहे. शिवाजीची प्रत्यक्ष भेट तर झाली पाहिजे.

**पंडितः**—मग आपला काय विचार ठरतो ?

**अफझुलखानः**—माझा विचार शिवाजीकडील अंतस्थ माहितीवरून ठरणार आहे. शिवाजी खरोखरच भ्याला असून तहाला तयार असल्याची खात्री आपण देत असाल तर मात्र छावणीचा तळ जावळींत नेणं भाग आहे.

**पंडितः**—आपल्या बलापुढं शिवाजी निर्बल तर आहेच, म्हणून त्यानं आपल्याला अशा अभेद्य जागीं अडवलं. शिवाजी आज कितीहि निर्बल असला-भ्याला असला तरी तो आपल्याला अजिंक्य आहे. वकिलाच्या बोलण्यावरून शिवाजीकडून प्रथम दगा होईल असं मला तरी वाटत नाहीं; तरीपण आजच वाई सोडण्याचा सल्ला मी तरी देणार नाहीं, आणि शिवाजीला पकडण्याचा आपला बेत कायम असेल तर वाई सोडणं मुळींच इष्ट नाहीं.

**अफझुलखानः**—पंडितजी, वकिलाच्या बोलण्यावर विश्वास ठेवून तुम्ही स्वस्थ बसणार ? हा शिवाजीचा पढीक वकील सांगतो तेंच खरं मानणार ? शिवाजी नेहमी दुटप्पी वागत असतो.

**पंडितः**—खरं आहे. तो महान् मुत्सद्दी आहे. बलाबलाचा विचार केल्याशिवाय तो पुढं पाऊलच टाकणार नाहीं. आज आपल्याला पिटाळून लावण्याचं सामर्थ्य त्याला नाहीं, म्हणूनच तो मित्रत्वाचा तह करून आपल्याला विजापूरच्या वाटेला लावणार मुत्सद्दी नेहमीं दुटप्पीच डाव टाकणार. खानसाहेब, शिवाजीचं चरित्र तुम्ही अजमावतां तसं तें नाहीं. तो शत्रूचा नाश शत्रूच्या हातूनच करवतो; आणि आत्मसंरक्षणाशिवाय तो अत्याचाराला कधींच प्रवृत्त होत नाहीं.

**अफझुलखानः**—पंडितजी, मी आपल्याला मुत्सद्दी समजत होतों; पण शिवाजी शरण येतो एवढ्यावरच तुम्ही भाळलांत आणि तो सत्याचा पुतळा आहे, असं तुम्हाला वाटूं लागलं; पण मी हा त्याचा कावा पूर्ण ओळखला आहे. या त्याच्या काव्याला सवाई कावा करून मी माझी प्रतिज्ञा शेवटास नेणार ?

**पंडितः**—तें शक्यच नाहीं. उलट आपणच गोत्यांत याल.

**अफझुलखानः**—एकदां हातांत आल्यावर तो कुठं जातो.

**पंडितः**—एकूण आपण दगा करणार ?

**अफझुलखानः**—अलबत् !

**पंडितः**—विश्वास दाखवून विश्वासघात करणार !

**अफझुलखान**:—आदिलशाहीला दगावणारा हा दगेखोर नाहींसा झालाच पाहिजे.

**पंडित**:—पण हा अन्याय होतो. आदिलशाहीच्या इभ्रतीला धक्का बसतो त्याची वाट ?

**अफझुलखान**:-तसं न करावं तर दौलतीची वाट लागते ती कशी टळणार ? राजकारणांत विश्वास अविश्वास, दौलतीच्या कल्याणापेक्षां मी तरी गौण समजतों. शिवाजीशीं जशास तसं वागलं पाहिजे. पंडितजी आज त्याला विश्वासाच्या आमिषावरच झुलवला पाहिजे.

**पंडित**:—पण तो झुलला पाहिजेना ? शिवाजी जोंपर्यंत दगा करीत नाहीं तोंपर्यंत आपणही दगा करणं बरं नाहीं. शिवाजी बिकट जागीं आम्हांला नेत असल्यामुळं आपणच जर दग्याला सुरुवात केली तर जाचक होईल. दौलतीच्या नाशाला कारणीभूत होईल. जागृतीला ऊत येऊन तमाम दौलतींत हाहा:कार उडेल. म्हणून म्हणतों आज वाई सोडणं इष्ट नाहीं.

**अफझुलखान**:—(स्वगत) हा विथरलेला दिसतो. काय करायचं तें स्वत:च करावं. ( उघड ) पंडितजी तुमच्या धोरणाप्रमाणं वाई न सोडून कसं चालेल ?

**पंडित**:—आपलं धोरण बदला आणि खुशाल वाई सोडा.

**अफझुलखान**:—पण शिवाजीनं दगा करायचा घाट घातला तर ?

**पंडित**:—त्याला तोंड द्यायला आपण समर्थ आहोंत; पण शिवाजी प्रथम दग्याला प्रवृत्त होणार नाहीं हें खास. शिवाजीच्या आजच्या परिस्थितीवरून त्याला लढाई नको आहे.

**अफझुलखान**:—असलं कोरडं अनुमान नको. शिवाजीकडं आमचे वकील म्हणून जाऊन प्रत्यक्ष परिस्थितीचं निरीक्षण करा. शिवाजी कावा-कपट करणार या भावनेनं चौकशी करा. चांगले आठ दिवस तुम्ही तिथं रहा मग खात्री द्या. शिवाजी खुल्या दिलानं आदिलशाहीचा बंदा होत असेल तर आम्हांला धोरण बदलायला मुळींच हरकत नाहीं.

**पंडित**:—ठीक आहे. मानाजीला आवरून ठेवा. ( स्वगत ) जातांना झुंझारला इषारा द्यावा हें बरं.

**अफझुलखान**:—त्याची काळजी नको. आपलं काम योग्य बजावा जा. (पंडितजी जातो) शिवाजी शरण येतो. पंडितजीप्रमाणं मलाही वाटतं कीं, तो दगा

करणार नाहीं म्हणून; पण मी कां त्याला मोकळा सोडावा ! शिवाजीला जिवंत–निदान मेलेला तरी आदिलशाहीच्या तक्तासमोर हजर करतों, अशी भर दरबारांत मी फुशारकी मारली आहेना? हर प्रयत्नानं त्याला पकडण्याकरतां मी आलों. लढाई न करतां–आदिलशाहीचा एकही शिपाई खर्ची न पडतां मी शिवाजीला विजापुरला नेला तर आदिलशाहीच्या मुत्सद्यांना मी चीत केल्यासारखं होईल. मुरारजगदेवासारख्या मराठ्यांच्या हातांतील आदिलशाहीचीं राजसूत्रं माझ्या हातीं देऊन बेगम माझा सन्मान करून, मला इतमामाला चढवील. मी वजीर झालों कीं, आदिलशाहींतून या मराठ्याचं पहिल्यानं उच्चाटन करतों. शिवाजीला जिवंत पकडून मी विजापुरला नेला तर तमाम आदिलशाही–अलम दुनिया माझा लौकिक गाईल. बेगमेला, मला कुठं ठेऊं आणि कुठं न ठेऊं असं होईल. ती माझ्या तंत्रानं राज्यशकट हांकील. अल्ली आदिलशहा माझ्या हुकमतींत वागेल आणि आजपर्यंत दरबारच्या बाहेर वगळलेला मी सर्वांच्या शिरोभागीं जाऊन बसेन. आदिलशाहीचा आधारस्तंभ गणला जाईन. बस्स. मी शिवाजीला पकडणार–विजापुरला नेणार ! तो हातीं लागावा म्हणून जावळींतच काय पण खुद्द प्रतापगडावरसुद्धां जाईन. ( मानाजी येतो. ) कोण मानाजी ! कां आलांत ?

**मानाजी**:—हुजूर आपण छावणी जावळींत नेणार असं ऐकलं म्हणून.

**अफझुलखान**:—मग त्यांत काय बिघडलं? पण हें तुम्हांला कसं कळलं?

**मानाजी**:—जावळींत ही बातमी दाट आहे. कदाचित् शिवाजीकडून ती झुंझारला कळली असेल.

**अफझुलखान**:—शिवाजीला मी जावळींत जाणार हें कसं कळावं? हा बेत तर आजच होतो आहे.

**मानाजी**:—त्यानं डावच असा टाकला आहे कीं, आपण जावळींतच काय पण खुद्द प्रतापगडावर सुद्धां जायला तयार व्हाल. हा त्याचा कावा आहे आणि त्यांत दगा आहे. जावळी आणि प्रतापगड हे प्रांतच असे आहेत कीं, महाप्रतापी शत्रूलासुद्धां शेंदोनशें लोक धूळ चारतील. प्रत्यक्ष वार लागला तरी शत्रू दिसणार नाहीं. खाविंद म्हणून म्हणतों वाई सोडायची नाहीं शिवाजीनं इथंच आलं पाहिजे.

**अफझुलखान**:—मानाजी, आज नऊ महिने झगडून तुम्हीं शत्रूकडील

माहिती मिळवूं शकत नाहीं, ते तुम्हीं शिवाजीला काय पकडणार? जा. तुमच्या सल्ल्यावर आणि कामगिरीवर माझा मुळींच विश्वास नाहीं. मी शिवाजीशीं मित्रत्वाचा तह करणार. तो म्हणेल तिथं जाऊन तह करणार. शिवाजीला पकडण्याच्या तुमच्या सर्व मुदती फोल ठरल्या. आम्हीं आजच जावळींत जाणार.

**मानाजी**:—खाविंद, आपण प्रतापशाली अहांत इतकंच नव्हे तर आदिलशाहींत आपल्यासारखा हुषार-धोरणी मुत्सद्दी दुसरा कुणी नाहीं हें मी जाणतों. मला वाटतं पंडितजीसारख्या फितूरानं-

**अफझुलखान**:—मानाजी काय सांगतां? पंडितजीचा फितूर?

**मानाजी**:—मी पुराव्यानिशी सिद्ध करतों.

**अफझुलखान**:—तरच वाई न सोडण्याचा त्याचा सल्ला.

**मानाजी**:—झुंझारकड आतांच त्याचा जासूद रवाना झाला. यावरून पंडितजीबरोबर त्याचाही शिवाजीकड पळून जायचा बेत दिसतो. खाविंद वेळ प्रसंगीं मी स्वामीसेवेकरतां स्वतःचे प्राण खर्ची घालून या फितुराला अटक करीन, पण गोष्ट निराळ्या थराला गेली तर मला तसा हुकूम असावा. मी आतां जावळी गाठतों. आणि ऐन वेळीं त्याला अटक करतों.

**अफझुलखान**:-आत्मसंरक्षणाकरतां झुंझारचा तुमच्या हातून खून पडला तर तो तुमचा दोष ठरणार नाहीं; पण मुद्दाम द्वेषानं तो होत असेल तर-पण नाहीं. कांहीं झालं तरी त्याला अटकच करा. मानाजी, पंडितजींचा फितूर संभवत नाहीं. या बाबतींत तुम्ही खोटे ठराल तर—

**मानाजी**:—मी वाटेल ती शिक्षा भोगीन. झुंझारचा बेत शिवाजीला मिळायचा होता: म्हणूनच तो बायकोसह या मोहिमेवर मुद्दाम आला. मी जावळींत असल्यामुळं तो बेत साधला नाहीं. आजच्या संधीचा तो फायदा घेणार. पंडितजीलासुद्धां त्यानंच वळवला आहे.

**अफझुलखान**:—मी तुम्हाला झुंझार शिवाजीकडच जात असेल तर त्याला फक्त अटक करायचाच हुकूम देतों. पण लक्षांत ठेवा, द्वेषानं अगर कोणत्याही कारणानं त्याचा घात होतां कामा नये. ( जातो ).

**मानाजी**:—मला अडवायचाच हुकूम पाहिजे होता कीं घातलाच त्याला आडवा. दाऊदच्या गळयांत कमळजेचं लोढणं अडकवून त्याच्याकडून गाढ्याच सारखं वदवतों. झुंझार तुझ्यामुळं मोहना माझा तिटकारा करते काय! हा डाव साधून या पंडिताला दूर करतों मग खान कुठं जातो. ( खान येतो. )

**अफझुलखानः**—हा घ्या हुकूम ! नीट जपून अम्मल बजावणी करा ! जा. ( मानाजी जातो. ) याचा झुंझारवर दांत दिसतो याच्यावर विश्वासही ठेवतां येत नाहीं आणि याला खोटाही म्हणवत नाहीं. यावेळीं जावळींत प्रत्यक्ष हजर असणं हेंच ठीक. शिवाजीपुढं मला कुणाचींच पर्वा नाहीं. ( जातो. )

---

## प्रवेश चौथा.

( झुंझारचा दिवाणखाना–नेताजी, दाऊदखान, मानाजी चोरून प्रवेश करतात. )

**दाऊदः**—सावजी फजिती तर होणार नाहींना ?

**नेताजीः**—ती तर होणारच ! पण आपली नाहीं, शत्रूची–मानाजीरावांची तयारी ही. (मानाजी येतो.)

**मानाजीः**—भाईसाहेब, सावजी, आतां दबा धरून बसा. ठरल्याप्रमाणं सावजी, तूं झुंझारला बाहेर काढायचा, मी त्याचा समाचार घ्यायचा आणि भाईसाहेब, आपण—

**दाऊदः**—झुझारच्या बायकोला पळवायची ! पण मानाजीराव, हा सावजी जवळ पाहिजे. बायकोला पळवायचं एकट्याला नाहीं जमायचं.

**मानाजीः**–सावजी येईलच तुमच्या मदतीला. तोंपर्यंत अशी दमांत ठेवाल–

**दाऊदः**—हां दमांत ठेवीन. बायकांना दमांत ठेवतां आलं नाहीं तर मी पुरुष कसचा !

**मानाजीः**—ही पहा चाहूल. चला आपापली जागा धरा. ठरल्याप्रमाणं करा. ( जातात. )

**कमळजाः**—किती रात्र झाली ही ! मध्यरात्र उलटून गेली असेल. यांचीं रात्रींचीं कसलीं कामं निघतात कोण जाणें ? आज मजाच करतें. दारच द्यायची नाहीं. ( कोंचावर बसते. ) हो पण तिष्ठावं लागेल ना स्वारीला ! मुद्दाम कां बाहेर राहणं होतं ! कामाला जाणं झालं होतं, मग तिकडचा का हा दोष ! दरबार काळोखांत कसलीं कामं काढतं कोण जाणें. केव्हांहि पहा यांचीं चोरासारखीं रात्रीचीं खलबतं. पण मी बडबडत काय राहिलं ! दरवाजा उघडला पाहिजेना !

( दरवाज्याजवळ जाते. ) बाहेरच का राहणार आज ! नाहीं बोलत ! नका बोलूं. मी पण नाहीं बोलायची. आज थट्टेची लहर आली वाटतं ! हळूच उघडूं का दार ! नको. यानांच बोलायला लावलं पाहिजे. करावीच मजा. अगबाई, हे कोण ? चोर ! धांवा हो धांवा ! हे पाहिलेत का चोर घरांत शिरले ! आतां काय करूं ! धांवा कुणी तरी लवकर !

**दाऊद**:—( आंतून ) अरे बापरे हिनं पाहिलं–

**मानाजी**:—( आंतून ) चूप !

**कमळजा**:—कोण बरं बोललं हें ! स्वारी आलेली दिसत नाहीं; मग बोललं कोण आतां ? ( दरवाज्यावर थाप ) कोण आहे, बोला लवकर.

**झुंझारराव**:—( आंतून ) कमळ—

**कमळजा**:—स्वारीच. ( दार उघडते. ) कां आज बाहेर रहायची लहर आली वाटतं ? इतका वेळ सारखी बोला बोला म्हणत होतें; पण बोलायचं नाहीं आणि दुसऱ्याला भिववायचं.

**झुंझारराव**:—पण मी हा आतांच येतों आहें.

**कमळजा**:—मग बाहेर बोललं कोण ? मला दोन वेळ भास झाला; नाहीं. स्पष्ट ऐकूं आलं.

**झुंझारराव**:—असेल कुणीतरी. यापुढं असंच चालणार. इतकंच नाहीं तर केव्हां अचानक घाला येईल याचा नियम नाहीं.

**कमळजा**:—म्हणजे तह होणार ना ? शिवाजी महाराज असला घाला घालायचे नाहींत.

**झुंझारराव**:—हा घाला शिवाजीचा नाहीं; आपसांतलाच आहे. हें मानाजीचं कपट आहे.

**कमळजा**:—कांहींतरीच बोलायचं. मानाजीराव आपले मित्र. त्यांनीं इथं आपली सोय लावली. ते कसे आपला घात करतील ? मित्राबद्दल संशय घेणं बरं नाहीं.

**झुंझारराव**:–प्रेमळ जीवा, या भोळेपणामुळंच आपला घात झाला. मानाजी मित्र कसचा ? तो माझ्या मानेला बसलेला या जावळीकरांचा फांस आहे. खानापर्यंत आपली दाद लागावी म्हणून या मानाजीनं माझ्यापुढं साखर पेरली. या स्वार्थी आणि कपटी माणसांना भरभर पुढं जायची हांव असल्यामुळं ती

चुगलखोरीचा अवलंब करतात आणि आपल्यासारखीं भोळीं माणसं वळी देतात. माझ्यामुळं मानाजीला खानापर्यंत जातां आलं. दरबारी चुरशीचा फायदा घेऊन त्यानं माझ्याबद्दल खानाच्या मनांत विष कालवलं. मी शिवाजीला फितूर आहें. इतकंच नव्हे तर सारे दरबारी मराठे फितूर आहेत. असा खानाचा समज केला. मी कारस्थानाला भीक घातली नसती, पण तुझ्याबद्दल काळजी—

**कमळजा**:—नाथ, माझी काळजी मुळींच करूं नका. आपलं रक्षण करा. असल्या नीचांचा संसर्ग टाळण्याकरतां पवित्र अशा शिवप्रभूच्या स्वराज्यांत चला. स्वदेशाला मिळा. तिथं आपलं चीज होईल.

**झुंझारराव**:-लाडके असं बोलूं नकोस. आतां आपल्याला फार सावधगिरीनं वागलं पाहिजे—जपून बोललं पाहिजे. पाजी लोकांच्या कुजक्या श्वासोच्छ्वासानं घाणेरडं झालेलं हें वातावरण आपल्या सरळ शब्दांनां विषारी पुटं देऊन भलताच प्रसंग आणील. कमळजे, आपण दारिद्र्य आणि परिस्थितीच्या गैरसोईमुळें दुसऱ्याच्या जीवावर पराक्रम करून पुढं यावं म्हणून हा गुलामगिरीचा पेशा पतकरला; आदिलशाहीच्या जीवावर पोसलों. गुलामगिरीच्या मिंध्या अन्नावर वाढलेला आणि प्रत्यहीं दरबारला मान वांकवणारा हा जीव स्वदेशाच्या पुण्य कार्याला नालायक आहे. म्हणून म्हणतों स्वदेशाला मिळायच्या कल्पना मनांतून काढून टाक. आपल्या परात्पर गुरुचं स्मरण कर; आणि प्रसंगांशीं झगडायला तयार हो. थोर विभूतींच्या पुण्य स्मरणानं पतित जीवसुद्धां आत्मरक्षण करायला समर्थ होतो. लाडके, आतां नैसर्गिक कोमलता टाकून मन वज्रासारखं कठोर कर. गुलामगिरीला मान वांकवल्यामुळं मी आज दुबळा झालों आहें. अरेरे! नैतिक जबाबदारीसुद्धां मला सांभाळतां येऊं नये. आं!

**कमळजा**:—नाथ, आतां आलं सारं माझ्या लक्षांत. मानाजी आपला घात करणार—बेअब्रू करणार; पण मला माझं मन ग्वाही देतें कीं, शेवटीं तोच फसणार. माझी काळजी मुळींच करूं नका. मी आत्मबचाव खात्रीनं करीन. ही वेडी बावळी कमळजा, रणवीर झुंझाररावांची वीरपत्नी आहे, हें मी मानाजीला दाखवणार. त्यानं प्रथम माझ्याच वाटेला जावं. आपल्या या अर्धांगीचा पराक्रम त्याला चीत करील.

**झुंझारराव**:—अशी अर्धांगी लाभलेला दुबळा जीवसुद्धां काळाला लढवील.

(नेताजी येतो.)

**नेताजी**:—सरदारसाहेब, खानानं ताबडतोब आपल्याला भेटीला बोलावलं आहे.

**झुंझारराव**:—हा मी आलोंच. लाडके, या घटकेपासून आपली कसोटी सुरु झाली. ही तलवार घे. प्रसंगीं ही तुझं रक्षण करील; पण हीनंहि दगा दिला तर—

**कमळजा**:—मी काय करीन तें दाखवतें. ( जंबिया आणते. ) हा चांडाळां-पासून पवित्र जीवांना सोडवणारा परमेश्वराचा दूत माझं रक्षण करील.

**झुंझारराव**:—शाबास. मी येतो आतां. ( मिठी मारते. ) सावध रहा.

**कमळजा**:—नाथ. खुशाल या. माझी काळजी करूं नका. नीचांची क्षिति मुळींच बाळगूं नका. ( झुंझार निघतो. ) नाथ थांबा. मला नरवीरांची पूजा करूं द्या. ( हार घालते व हातांत तलवार देते. )

**झुंझारराव**:—सावजी, मी जाऊन येईपर्यंत तूं राहतोस का हिच्या सोबतीला.

**नेताजी**:—राहिलों असतों; पण खानाचा हुकूम आपल्याला घेऊन ये असा आहे.

**झुंझारराव**:—ठीक आहे. कमळजे सावध रहा. ( जातात. कमळजा दरवाजा लावायला जाते. )

**दाऊद**:—( भीत भीत पुढें येतो. ) काय पण बायको आहे ! ही पहा आलीच. ( कोंचावर बसतो. )

**कमळजा**:—( स्वगत ) मेल्यांनीं असं कारस्थान केलं काय ? ( उघड ) भाईसाहेब, स्वारी आतांच खानाकड गेली.

**दाऊद**:—म्हणूनच आमची स्वारी पुढं आली. प्यारी भिऊं नकोस.

**कमळजा**:—तुम्हीं आंत कसे आलांत ?

**दाऊद**:—या चोर दरवाजानं चोरून आलों.

**कमळजा**:—कुणी दाखवला हा तुम्हांला ? ( मानाजी पुढें येतो. )

**मानाजी**:—मी दाखवला.

**दाऊद**:—हो यांनींच दाखवला.

**मानाजी**:—कमळजे मुकाट्यानें याच्या स्वाधीन हो.

**कमळजा**:—नीचा शरम नाहीं वाटत पुढं यायला. कशाला आलास मराठ्याच्या जन्माला ?

**मानाजी**:—वः ! दम तर खूब आहे ?

**दाऊद**:—देखो क्या दम है !

**मानाजी**:--कमळजे यांच्या स्वाधीन हो. झुंझार फितूर आहे, त्याला ठार करून त्याची जिंदगी सरकारजमा करायचा खानाचा मला हुकूम आहे.

**कमळजा**:--चांडाळा, कोण म्हणतं त्यांना फितूर? तूंच ना? तुला सारं जग तुझ्यासारखंच दिसणार. भाईसाहेब, आतांचं त्यांचं बोलणं तुम्ही ऐकलंत ना? मग सांगा ते फितूर आहेत का?

**दाऊद**:-ते फितूर नाहींत, पण तूं आहेस ना? तुझ्या संगतीनं ते बिघडतील.

**मानाजी**:--भाईसाहेब, तुम्ही हिला घेऊन या. मी झुंझारचा समाचार घेतों. (जातो.)

**दाऊद**:--प्यारी कमळजे, चल माझ्याबरोबर! माझ्या संगतींत तुला कुणाचंच भय नाहीं.

**कमळजा**:—मी कुणालाच भीत नाहीं. जीवांत जीव असे तोंपर्यंत मी इथून हालणार नाहीं.

**दाऊद**:--मग जबरदस्ती करावी लागेल, ओढीत न्यावी लागेल.

**कमळजा**:--ती नेहमीचीच आहे, तिलाहि मी भीक घालीत नाहीं.

**दाऊद**:--लेंकाचा सावजी कसा येत नाहीं अझून? मुकाट्यानं येतेस कां खेचूं—

**कमळजा**:--मेल्या पुढं तर ये. (तलवार सांवरते. दाऊदखान दचकतो.)

**दाऊद**:--बायकांच्या दरडावणीला भिणारा हा पुरुष नव्हे. (हळूच तलवार उडवतो.) कमळजे तलवार गेली मुकाट्यानं स्वाधीन हो. आम्ही बायकांबरोबर लढत नसतों.

**कमळजा**:--चांडाळा, तरीसुद्धां मी तुझ्या हातीं लागत नाहीं. (जंबिया छातीवर रोखते.)

**दाऊद**:—अरे बापरे, कमळजे हें काय?

**कमळजा**:—शिवराया, तुझ्या पायापाशीं येऊनसुद्धां असा प्रसंग यावा ना! पण तुला तरी मी दोष कसा देऊं? आमचंच कर्म झालं! नाथ येतें मी आतां.

**शिवाजी**:--(प्रवेश करून) बाई, भिऊं नका! आत्मघात करूं नका! (दाऊद घाबरून एका कोंपऱ्यांत जातो.)

**कमळजा**:--अहाहा, धन्य शिवाजी महाराज!

**दाऊद**:--कोण शिवाजी आतां पकडतों. (शिवाजीला पाहून बोबडी वळते.)

**कमळजा**:--महाराज आतां माझं रक्षण व्यर्थ आहे.

**शिवाजी**:—बाई, मला सर्व कांहीं ठाऊक आहे. झुंझाररावांच्या केंसालाही धक्का लागलेला नाहीं आणि लागणारहि नाहीं. इतकंच नव्हे तर ते इतक्यांतच परत येतील. ( नेताजी येतो. )

**नेताजी**:--भाईसाहेब घात झाला. झुंझारराव आले. अरे बापरे! शिवाजी महाराज.

**झुंझारराव**:—( प्रवेश करून ) कुठं आहे तो हरामखोर दाऊदखान? पण हे कोण?

**कमळजा**:—नाथ, सत्पक्षाला उचलून धरणारे महाराष्ट्राचे भूदेव आपल्या रक्षणाकरतां धांवून आले आहेत; त्यांचं स्वागत करा.

**झुंझारराव**:—शिवबा राजे, माझ्या घरीं--आपल्या शत्रूच्या घरीं आपण कां आलांत?

**शिवाजी**--शत्रुत्व कुणाशीं व कसं करावं हें आपणांला दाखविण्याकरितां. झुंझारराव, मी शत्रूच्या घरीं आलों नसून मी माझ्याच घरीं आलों आहे. असे विस्मित होऊं नका. परमेश्वरानं निर्माण केलेला प्रत्येक जीव माझा बंधू आहे. अर्थात् माझ्या बंधूचें जें घर तें माझं घर. झुंझारराव माझं शत्रुत्व जीवमात्रांशीं नाहीं. अन्याय, जुलूम, अत्याचार, दडपशाही हेच माझे शत्रू आहेत. त्यांचा नायनाट करून माझ्या बंधूभगिनींना सोडवायला मी प्रत्यक्ष काळाच्या पोटांत उडी टाकायला कचरणार नाहीं. तुम्ही जुलमाला आणि अन्यायाला आपल्या हृदयांत थारा देतां म्हणून मी तुम्हांला शत्रू भासतों.

**झुंझारराव**:-सावजी, दाऊदखान जा. त्या पलीकडल्या दालनांत जाऊन बसा. मला तुम्हांला खानापुढं नेलं पाहिजे. ( नेताजी, दाऊदखान व कमळजा जातात.) शिवबा राजे, इथं येऊन आपण आपलं जीवित धोक्यांत घातलंत आणि त्या बरोबरच मला आणि दरबारी मराठ्यांना पेंचांत आणलंत.

**शिवाजी**:—जिवाची पर्वा आणि धोक्याचं भय कुणाला? गुलामगिरीला मान देऊन दरबारी डामडौलाला भाळलेल्या मराठ्यांनां! आम्हांला ती धरून कसं चालेल! आम्हीं जर जिवाची पर्वा करूं, तर तुमच्या आंधळेपणामुळं, मानवी जिवीताबद्दल बेपर्वा अशा अधमांकडून होणारी आमच्या आयाबहिणीची बेअब्रू कशी टळेल. धर्माचं आणि पवित्र देवस्थानांचं रक्षण कसं होईल! झुंझारराव,

दरबारी डामडौलांत खिळलेल्या आपल्या दृष्टीला या गोष्टी पहायला सवडच मिळत नाहीं. म्हणूनच तुमच्या हृदयाला पीळ पडून तुमचे डोळे खाडकन् उघडत नाहींत. कदाचित् आजच्यासारखा प्रसंग पाहून तुमच्या डोळ्यांत सहानुभूतीचीं आसवं आलींच तर दरबारी क्षमेचा गोंडस हात तीं पुसून टाकतो; आणि परदुःख शीतळ म्हणून तुम्ही तो प्रसंग विसरतां; पण असले प्रसंग आमच्या डोळ्यांपुढून हालत नाहींत: आणि आम्हांला स्वस्थच बसूं देत नाहींत. झुंझारराव दरबारी मराठे आणि स्वराज्यांतले मराठे यांत हाच फरक.

**झुंझारराव**:—लहान सहान अधिकाऱ्यांकडून आत्मबचावाकरतां चुकून हुकूमाचा अतिक्रम होत असेल, पण तो जाणून झालेला नसल्यामुळं त्याची चौकशी होऊन अधिकाऱ्यांना समज देण्यांत येते. दरबारांत येणाऱ्या माहिती-प्रमाणं आम्हीं आपली बाजू सांभाळतों.

**शिवाजी**:—पण त्यानं अत्याचार थांबताहेत का! झुंझारराव खात्री पटवायला दूर जायला नको. आज आपल्या घरीं काय घडत होतं? त्याला खानाची मोघम संमतीहि होती. खानाच्या या हुकुमानं खान आपल्या जबाबदारींतून सुटतो, मानाजी आत्मबचावाची ढाल पुढं करील; पण तुम्हींमात्र फुकट मराल. फितूर म्हणून जगांत कीर्ति मिळवाल. या कृत्याची दरबारला माहिती कशी मिळेल! फितूराला अटक करीत असतां आत्मबचाव करतांना फितूर चुकून मारला गेला, अशीच ना?

**झुंझारराव**:—यांत दरबारचा काय दोष? हें त्या मानाजीचं कपट आहे.

**शिवाजी**:—या कपटाला खानाची आंतून फूस मिळाली आहे ना? मानाजीनं तुमच्या फितूराबद्दल खानाला माहिती दिली; आणि खान तुमच्या पारिपत्याचा अधिकार त्यालाच देतो, हा खासा न्याय. झुंझारराव, खान दरबारच्या विश्वासांतला दरबारचा प्रतिनिधी. त्यानंच हा सांवळा गोंधळ घातला; तर असला प्रतिनिधी पाठविल्याबद्दल दरबार जबाबदार नाहीं का? असल्या गोंधळाला आम्ही विरोध करतों म्हणून दरबार आम्हांला बंडखोर ठरवतो. झुंझारराव, डोळे उघडा, निदान स्वतःपुरतं तरी पहा. म्हणजे आमचं म्हणणं तुम्हांला पटेल.

**झुंझारराव**:—शिवबाराजे, आपले विचार मला पटतात. पण एकदां स्वीकारलेलं व्रत सोडवत नाहीं; पण आपण अगदीं ऐन वेळीं कसे आलांत?

**शिवाजी**:—कसा आलों ? कसा आलों तें काय सांगूं! झुंझारराव मनाच्या तळमळीनं-कमळजाबाईच्या पुण्याईनं आणि भवानीच्या स्फूर्तीनं मला या ठिकाणीं खेंचून आणलं. झुंझारराव, देवतासुद्धां या जुलुमाला कंटाळल्या आहेत. या महाराष्ट्रांत त्यांचा सारखा संचार आहे. त्या आम्हांला स्वस्थच बसूं देत नाहींत. झुंझारराव, सांगा या सोळा वर्षांत दुसऱ्याच्या जिवावर आपलं ध्येय संपादण्यांत स्वतःच्या जिवावर आणि अब्रूवर प्रसंग आणण्या पलीकड आपण काय केलंत ! कांहीं नाहीं. झुंझारराव, या संकटांतून आपण कसे पार पडणार ! तुमच्या साध्वी पत्नीच्या पातिव्रत्यावर येऊं पाहणाऱ्या संकटाचा प्रतिकार आपण कसा करणार ?

**झुंझारराव**:—मला त्याचा प्रतिकार करतां येईल; पण आज तो करणं इष्ट नाहीं. आज माझ्या स्वामिभक्तीकरतां मी प्रसंगाला मान देणार.

**शिवाजी**:—झुंझारराव, त्याचा परिणाम काय होईल याची कल्पनातरी आहे का तुम्हांला ! यावेळीं तुम्ही गप्प बसलांत—खानाच्या मूर्खपणाला आणि मानाजीच्या कपटाला मान दिलीत आणि फितूर म्हणून मारले गेलांत तर दरबारांत खान तुमच्या रक्तानं सर्व दरबारी मराठ्यांवर फितूरीचा शिक्का मारायला कमी करणार नाहीं. दरबारांत मानाजीचा बडजाव वाढून हे पाजी स्वार्थी मराठे इतर मराठ्यांचा छळ करतील, याचा कांहीं विचार करा. झुंझारराव यावेळीं अन्यायाकड डोळेझांक न करतां दरबारच्या डोळ्यांत चरचरीत अंजन घालायची तुम्हांला संधी आली आहे. तिचा फायदा घ्या आणि कांहीं लोककार्य करा. आमचं दरबारी मराठ्यांनां एवढंच सांगणं आहे कीं तुम्हीं स्वतःला तरी न्याय मिळेल असे वागा. डामडौल, पदव्या, किताब, जहागिरी यांचा मोह सोडून जागेपणानं जगाकड पहा. तुम्हीं एवढं केलंत तरी आम्हांला पुरे आहे.

**झुंझारराव**:—शिवबाराजे, महाराज माझी चूक मला कळली. माझा मार्ग चुकला. हेंही मला कळलं. पण त्याची दुरुस्ती या देहीं, या जन्मीं तुमच्या पक्षाला मिळून होणं शक्य नाहीं. मी जो मार्ग एकदां पसंत केला; तो सोडणं शक्य नाहीं. माझे प्राण गेले तरी मी आदिलशाहीशीं विरोध करणार नाहीं. माझ्या चुका मी आदिलशाहींत राहून सुधारीन; माझं ध्येय संपादीन. महाराज स्वकीयांसाठीं जुलमाचा प्रतिकार करण्याकरतां मला कुणाचीच मदत नको. मी तो करीन. महाराज, आपल्या या पुण्यपावन महाराष्ट्र देवाच्या पायावर हात

**शिवाजी**:—कसा आलों ? कसा आलों तें काय सांगूं! झुंझारराव मनाच्या तळमळीनं–कमळजाबाईंच्या पुण्याईनं आणि भवानीच्या स्फूर्तीनं मला या ठिकाणीं खेंचून आणलं. झुंझारराव, देवतासुद्धां या जुलमाला कंटाळल्या आहेत. या महाराष्ट्रांत त्यांचा सारखा संचार आहे. त्या आम्हांला स्वस्थच बसूं देत नाहींत. झुंझारराव, सांगा या सोळा वर्षांत दुसऱ्याच्या जिवावर आपलं ध्येय संपादण्यांत स्वतःच्या जिवावर आणि अब्रूवर प्रसंग आणण्या पलीकड आपण काय केलंत ! कांहीं नाहीं. झुंझारराव, या संकटांतून आपण कसे पार पडणार ! तुमच्या साध्वी पत्नीच्या पातिव्रत्यावर येऊं पाहणाऱ्या संकटाचा प्रतिकार आपण कसा करणार ?

**झुंझारराव**:—मला त्याचा प्रतिकार करतां येईल, पण आज तो करणं इष्ट नाहीं. आज माझ्या स्वामिभक्तीकरतां मी प्रसंगाला मान देणार.

**शिवाजी**:—झुंझारराव, त्याचा परिणाम काय होईल याची कल्पनातरी आहे का तुम्हांला ! यावेळीं तुम्ही गप्प बसलांत—खानाच्या मूर्खपणाला आणि मानाजीच्या कपटाला मान दिलीत आणि फितूर म्हणून मारले गेलांत तर दरबारांत खान तुमच्या रक्तानं सर्व दरबारी मराठ्यांवर फितूरीचा शिक्का मारायला कमी करणार नाहीं. दरबारांत मानाजीचा बडेजाव वाढून हे पाजी स्वार्थी मराठे इतर मराठ्यांचा छळ करतील, याचा कांहीं विचार करा. झुंझारराव यावेळीं अन्यायाकड डोळेझांक न करतां दरबारच्या डोळ्यांत चरचरीत अंजन घालायची तुम्हांला संधी आली आहे. तिचा फायदा घ्या आणि कांहीं लोककार्य करा. आमचं दरबारी मराठ्यांना एवढंच सांगणं आहे कीं तुम्हीं स्वतःला तरी न्याय मिळेल असे वागा. डामडौल, पदव्या, किताब, जहागिरी यांचा मोह सोडून जागेपणानं जगाकड पहा. तुम्हीं एवढं केलंत तरी आम्हांला पुरे आहे.

**झुंझारराव**:—शिवबाराजे, महाराज माझी चूक मला कळली. माझा मार्ग चुकला. हेंही मला कळलं. पण त्याची दुरुस्ती या देहीं, या जन्मीं तुमच्या पक्षाला मिळून होणं शक्य नाहीं. मी जो मार्ग एकदां पसंत केला; तो सोडणं शक्य नाहीं. माझे प्राण गेले तरी मी आदिलशाहीशीं विरोध करणार नाहीं. माझ्या चुका मी आदिलशाहींत राहून सुधारीन; माझं ध्येय संपादीन. महाराज स्वकीयांसाठीं जुलमाचा प्रतिकार करण्याकरतां मला कुणाचीच मदत नको. मी तो करीन. महाराज, आपल्या या पुण्यपावन महाराष्ट्र देवाच्या पायावर हात




शिवाजीः-हां ! या पायाला स्पर्श करायचा तुम्हाला अधिकार नाहीं. (पान ५७)




शिवाजीः-हां ! या पायाला स्पर्श करायचा तुम्हाला अधिकार नाहीं. (पान ५७)

मारून, महाराष्ट्राला मी असं आश्वासन देतों कीं, आदिलशाहींत राहून मी स्वजनांचं हित साधीन; आणि स्वकीयांविरुद्ध तलवार उचलणार नाहीं. (पायांवर हात मारायला जातो. शिवाजी झिडकारतो.)

**शिवाजीः**—हां या पायाला स्पर्श करायचा तुम्हांला अधिकार नाहीं. हा देह स्वदेशाकरतां भवानीच्या चरणीं वाहिला आहे. भवानीची सर्व मराठ्यांना अशी आज्ञा आहे कीं, स्वतंत्र व्हा, स्वधर्म रक्षण करण्याकरतां हातांत रणकंकण बांधा आणि मग मला शरण या. माझी दिक्षा न घेतलेला हिंदु मग तो प्रत्यक्ष ब्राह्मण असला तरी अस्पृश्य माना. झुंझारराव, गुलामगिरींत प्रतिज्ञा पाळणं फारच बिकट, केवळ अशक्य आहे; तरीपण मी तुमच्यावर विश्वास ठेवतों. आत्मरक्षण करा म्हणजे स्वदेश आणि स्वधर्म रक्षणाची किंमत तुम्हांला कळूं लागेल. झुंझारराव, मी तुम्हांला बजावून सांगतों कीं, स्वराज्य-तोरण बांधल्याशिवाय मराठ्यांना तरणोपाय नाहीं, स्वधर्म रक्षण होणार नाहीं.

———

अंक दुसरा समाप्त.

# अंक तिसरा.

## प्रवेश पहिला.

(जावळीबाहेरील अरण्य—विजापुरास निघालेलीं झुंझारराव कमळजा)

**झुंझारराव**:—माझ्या स्वामिभक्तीचा असा विपर्यास व्हावा आं ! शिवाजी महाराजांच्या भेटीमुळं खानाचा समज दृढ होणार; अशा स्थितींत आत्मबचाव करून माझ्या नांवाला लागलेला फितुरीचा डाग साफ करावा तर माझ्या लोकांची मदत घ्यावी लागेल आणि शत्रूला फूट दिसेल. नाहीं ! तसं करणं आज इष्ट नाहीं.

**कमळजा**:—कां नाहीं ! आम्हीं आत्मबचाव केला. खानाच्या मूर्खपणा-मुळं शिवाजीमहाराजांना जय मिळाला, तर तो दोष कुणाचा ? नाथ असंच करावं. आपल्या स्वाभिभक्तीला बाध न येतां सहज स्वदेशाला मदत होते. शिवप्रभूच्या उपकारांची फेड होत आहे तर--

**झुंझारराव**:—भोळ्या जीवा, शिवाजी महाराजांच्या उपकारांची फेड आपण करूं, पण ती अशी नको. लाडके, आपल्या अशा आत्मबचावांत पाद-शहाचं नुकसान आहे. तो आपल्या स्वामिभक्तीला कमीपणा आणणारा आहे.

**कमळजा**:—पण आपल्या नांवाला लागूं पहाणारा डाग कायम राहणार ना ? महाराज, आपली मलीन होऊं पहाणारी कीर्ति साफ झाल्याशिवाय मरण येतां कामा नये. आपल्याला नांवाकरतां मरायचं, तें शत्रूला लढवूनच मेलं पाहिजे. नाथ, अज्ञातवास पत्करून या जंगलांत कांहीं काळ काढला तर तूर्त मानाजीच्या हातून सुटून खानाची खात्री करतां येईल.

**झुंझारराव**:—होय. तुझं म्हणणं खरं आहे. आजच मृत्यूला कवटाळलं तर तें ठीक होणार नाहीं. अज्ञातवास—पण नको. मला वाटतं आपण आतां विजापूर गांठावं. विजापुरात तुला पोंचवून मी परत येतों आणि मग या मानाजीला पाहतों. मैत्रि संपादून असा घातावर उठतोस आं !

**कमळजा**:—नाथ, माझी काळजी करूं नका. आपण क्षत्रिय आहोंत. मला पावित्र्य रक्षण कसं करावं हें समजतं. काल रात्रीपासून (जंबिया दाखवते) हा

रक्षणकर्ता हृदयाशीं ठेवला आहे. आपण खुशाल परत चला. शत्रूला लढवा आणि आपल्याला लागूं पहाणारा कलंक वेळ पडल्यास शत्रूच्या रक्तानं धुवून काढा. ही पहा चाहूल. आलंच कुणी तरी—

**झुंझारराव**:—दुसरा कोण! मानाजीशिवाय कोण येणार! ये, मानाजी ये!

**मानाजी**:—(प्रवेश करून) हा पहा आलों. झुंझार, तुझ्या कमनशिबानं आणि माझ्या नशिबानं तुला ही पळून जाण्याची बुद्धि झाली. तूं आपल्या वाड्यांत असतास तर मला माझ्या मनासारखा सूड घेतां आला नसता. तुला फक्त कैदच करतां आलं असतं. म्हणूनच काल रात्रीं तुला सोडला. मला तूं असा बाहेरच सांपडावास म्हणून मी तुला ती हूल दाखवली आणि ती सफल झाली. झुंझार, मी तुला ठार करणार--जगांतून नाहींसा करणार.

**झुंझारराव**:—मानाजी, नीचा माझा काळ आज पडता आहे—नाहीं! मला आदिलशाहीच्या हिताकड पहावं लागतं म्हणून आजपर्यंत तुझे डाव हाणून पाडण्याचा मी प्रयत्न केला नाहीं. विश्वासघातक्या तुला बळाची घमेंड असेल पण मी ती तेव्हांच नाहींशी करीन. हरामखोरा, तूं आदिलशाहीचा नोकर पडलास. तुला ठार करणं इष्ट नाहीं. म्हणून माझ्या स्वामिभक्तीकरतां नीचा, तुझ्या हातीं मान देणें मला भाग आहे.

**कमळजा**:--नाहीं. नाथ, अशानं स्वामिभक्ति उज्वल रहात नाहीं. या नराधमाच्या हातीं निमूटपणं मान देणं आणि या मांगाकडून ती छाटली जाणं आज इष्ट नाहीं. हें मरण गुन्हेगाराला योग्य—असलं घाणेरडं मरण वीराला यायला नको. मरायचंच तर या चांडाळाच्या हातून कां? या स्वामिद्रोही नराधमाकडून कां?

**मानाजी**:—कमळजे, कर, माझी निंदा कर. मरतां मरतां शिव्यांची लाखोली वहा. तीही हौस पुरवायला मी तयार आहें; पण लक्षांत ठेव, हा मानाजी आहे. माझी ओळख आतां तुला पटलीच असेल. पुढं मी काय करणार आहे हें तुला आणि मृत्यूच्या जबड्यांत चाललेल्या या स्वामिभक्ताला ऐकवतों. मरतांना याच्या मनाला यातना व्हाव्या म्हणून मुद्दाम ऐकवतों. झुंझार, तुला ठार केल्यावर तुझा हा भोळा—पवित्र जीव दाऊदखानाच्या लगामीं बांधून मांगाच्या कृतीची साक्ष हिला मी पटवणार. माझ्या शौर्याचं आणि जावळीकरांच्या कारस्थानाचं स्मारक म्हणून तुला मोहनेच्या दारांत

झाडाला लटकवणार. कमळजे, चालूं द्या तुझ्या शिव्या. तूं जीं जीं विशेषणं मला लावशील तीं माझ्या अंगीं पूर्णपणं बिंबलेलीं आहेत; याचा दाखला मी तुला दाखवल्याशिवाय राहणार नाहीं. झुंझार, बायकोबद्दल काळजी—

**कमळजा**:—नीचा, तोंड संभाळून बोल. घातकी पाप्या, तूं आम्हांला कोण समजतोस?

**मानाजी**:—स्वामिभक्त समजतों. झुंझार, हा पहा खानाचा हुकूम. याला मान दे आणि आपली गर्दन देऊन स्वामिभक्तीला जाग. बाबारे, स्वामिभक्ति ही अशीच आहे. आज तुझ्यावर उद्यां माझ्यावरही पाळी यायची.

**कमळजा**:—चांडाळा अगदीं उलटं काळीज आहे तुझं.

**मानाजी**:—म्हणूनच तर अझून टिकलों आहें. (स्वगत) हा भोळा जीव जीव धरूं लागला, यालाही ठेंचलाच पाहिजे. (उघड) झुंझार, मग काय मरायला तयार आहेस ना? तुला क्षत्रियोचित मरण यावं असं मलाही वाटतं. पण तुझी स्वामिभक्ति तुला तसं करूं देत नाहीं; आणि मलाही तसा हुकूम नाहीं. तुला गुन्हेगार—फितूर म्हणूनच शिक्षा करायचा मला हुकूम आहे.

**झुंझारराव**:—मानाजी, मी पापी–फितूर नाहीं. स्वप्नांतसुद्धां मी आदिलशाहीशीं निमकहराम झालों नाहीं

**मानाजी**:—असेल, मी तरी तसं कुठं म्हणतों? खानाचा हुकूम तुला फितूर ठरवतो. तुझ्यासारख्या वीराला अशा रीतीनं मारण्याचं घाणेरडं काम—पण तें कर्तव्य म्हणून करणं भाग आहे.

**झुंझारराव**:—मानाजी, तूं खानाचं मन कलुषित केलंस. नीचा तुला खोटा पाडायला मुळींच वेळ लागणार नाहीं. माझ्या लोकांची मदत घेतली तर एका क्षणांत खानाची खात्री पटेल; पण सैन्यांत दुफळी होऊन मोहिम विस्कळित होते म्हणूनच मी गप्प आहें. मानाजी, माझ्यावर तुझा एवढा दांत कां?

**मानाजी**:—(स्वगत) दांत कां? सांगूं का कां तो. पण नको. यावेळीं शांतपणा सोडतां कामा नये. (उघड) माझा दांत तुझ्यावर कां असेल? मला तूं प्रथम जवळ केलास—

**कमळजा**:—त्याचे उपकार असे फेडतो आहेस वाटतं?

**मानाजी**:—तुझ्यावर माझा दांत नाहीं. आतां हें काम माझ्यावर आलं

म्हणून तुझा तसा समज होणं साहजिक आहे. पण खानाच्या हुकमापुढं माझं तरी काय चालणार ?

**झुंझारराव**:—तुझं हें मायावी भाषण मला समजतं आणि हें तुझंच कारस्थान आहे हें सुद्धां मी जाणतों. माझ्या मृत्यूनं सैन्यांत चलबिचल होऊं नये म्हणून तुझ्या मार्गांतला माझा कांटा मी कांहीं काळ दूर करायला तयार आहें. मी मृत्यूला भितों असं नाहीं; पण असलं मरण मला नको आहे. मी गुन्हेगार नाहीं. तुझ्यासारखा निमकहराम—फितूर नाहीं.

**कमळजा**:—अहाहा ! नाथ, अस्सं विचारानं वागायचं गडे.

**मानाजी**:—अस्सं. स्वामिभक्तीची धुंदी गेली वाटतं ? झुंझार, माझ्या मार्गांतला तुझा कांटा तुला ठार केल्याशिवाय निघत नाहीं. मी तुला ठार केल्याशिवाय सोडणार नाहीं.

**झुंझारराव**:—तर मग तुला माझ्याशीं लढावं लागेल. लढून मला कैद कर आणि वाटेल तें कर.

**मानाजी**:—झुंझार, तुझी स्वामिभक्ति पोकळ आहे. स्वामिभक्ति बोलून दाखवून भागत नाहीं. ती कृतींत दिसली पाहिजे. तूं खरा स्वामिभक्त असशील तर—

**झुंझारराव**:—माझी स्वामिभक्ति अढळ आहे. तिला मी कधींच बाध येऊं देणार नाहीं.

**मानाजी**:—मग खानाचा हुकूम मान. तूं फितूर असल्याची दाऊदखानाची खात्री झाली आहे. निमूटपणं मरायला तयार हो.

**झुंझारराव**:—दाऊदखान तुझाच साथीदार. (स्वगत) यांना विरोध करूं का ? नको. कांहीं झालं तरी सैन्यांत चलबिचल होऊं देतां कामा नये. (उघड) मानाजी, तुझ्या नीच हातीं मरण्यापेक्षां मीच आपलं शीर स्वामिकार्याला अर्पण करतों.

**मानाजी**:—ही सवलत मी खुषीनं देतों. मला तूं मेलेला—जगांतून नाहींसा झालेला पहायचा आहे.

**झुंझारराव**:—कमळजे, खानाचा हुकूम आपल्याला मानला पाहिजे.

**कमळजा**:—नाथ, आपल्या सान्निध्यांत मी मृत्यूला भीत नाहीं. पण असला मृत्यू—

**झुंझारराव**:—नाहीं, आतां असला मृत्यू वाईट कीं चांगला हा प्रश्न नाहीं आपण सत्याला जागलों तरी पुरे आहे. (कमळजा जंबिया बाहेर काढते.)

**मानाजी**:--झुंझार, कमळजेनं आत्महत्या करतां कामा नये. तिला य मांगाची कृती दाखवतों.

**कमळजा**:—कां! तुझे गुन्हेगार हे समोर उभे आहेत. मी स्वतंत्र आहें. मी कांहीं आदिलशाहीची गुलाम नाहीं. मी वाटेल तें करीन. तुझा हेतु य कमळजेकडून मातींतच मिळणार. (दाऊदखान व नेताजी येतात.)

**दाऊद**:-मानाजी यांचा छळ करूं नकोस. झुंझारराव मुळींच फितूर नाहींत.

**मानाजी**:—नाहीं. हा फितूरच आहे. याला ठार केलाच पाहिजे. नाहींतर आपलं कार्य—

**दाऊद**:—मी तुझं कार्य जाणत नाहीं. मी याला ठार मारूं देणार नाहीं.

**मानाजी**:--(कानाजवळ हळूच) ती पहा. याला ठार केला नाहीं तर ती लाभणार नाहीं. पहा विचार.

**नेताजी**:—(स्वगत) मात्रेचा जोर सरला. आतां झुंपणार इथं. वेळ पडल्यास माझे लोक धांवून येतीलच. कमळजेला मात्र इथून काढली पाहिजे.

**कमळजा**:--पाहिलंत. हें याच मेल्याचं कारस्थान. इथं आत्मबचाव केलाच पाहिजे.

**झुंझारराव**:--तूं भिऊं नकोस. मी तिघांना लढवतों.

**दाऊद**:--पण खानाची समजूत कशी घालणार! काय सावजी?

**नेताजी**:--त्याची नको काळजी. आपला विचार पहा. मानाजीराव इकडली दुनिया तिकड करतील.

**मानाजी**:--भाईसाहेब, सावजी. आतां पुराव्याची बाजूच नाहीं. आपण तिघे म्हणू तेंच खरं.

**दाऊद**:--मग माझी हरकत नाहीं. काय सावजी?

**नेताजी**:--हूं. उडूं द्या बार. तुम्हीं दोघे झुंझारशीं लढा. मी हिला--

**दाऊद**:--ए हैवान्! बायकोशीं लढतोस! नामर्द.

**नेताजी**:--आजपर्यंत बायका मोकळ्या सोडल्यात म्हणून तर त्या मर्दाप्रमाणं हातांत तलवार धरूं लागल्या. हिच्याशीं लढायला मर्द नको, युक्ति पाहिजे. पहा तर माझी करामत.

**दाऊद**:--मग तूंच लढ.

**मानाजी**:--झुंझार, आमच्या स्वाधीन हो.

**दाऊद**:--नाहींतर लढावं लागेल.

**झुंझारराव**:--हा मी तयार आहें. लढाईला माझी ना नाहीं.

**मानाजी**:--झुंझार, तूं आपल्याला स्वामिभक्त म्हणवतोस आणि स्वामि-विरुद्ध लढतोस ?

**झुंझारराव**:--हा प्रसंग तुमच्याशीं आहे. यांत आदिलशाहीचा मुळींच संबंध नाहीं.

**दाऊद**:--पण आम्ही आहोंतना आदिलशाहीचे !

**झुंझारराव**:--असाल. पण यावेळीं तुम्हीं आदिलशाहीच्या न्यायीपणाला काजळ फांसण्याचा प्रयत्न करीत आहांत. मी आदिलशाहीचा म्हणूनच तुम्हांला विरोध करतों.

**मानाजी**:-भाईसाहेब, झाली खात्री ! फितूर, निमकहराम ! तोंडा गुलामाला.

**झुंझारराव**:--मानाजी, तोंड संभाळ. नाहींतर एका फटक्यानं तुला नरकाचा रस्ता दाखवीन.

**दाऊद**:--झुंझारराव, अहो हा हट्ट बरा नव्हे. मरणसमयीं कसं एकचित्त असावं. लढाईची दगदग कशाला ?

**झुंझारराव**:--अंगीं सामर्थ्य असतां फुकट अन्यायाला बळी कां पडूं ?

**मानाजी**:--भाईसाहेब, हा बोलण्यांत वेळ काढतो आहे. यावरून याचं शत्रूशीं संधान आहे.

**झुंझारराव**:--नीचा, वेळ कोण काढतो आहे? मला शत्रूकड जायचं असतं तर तूं येतांच तुला छाटून केव्हांच गेलों असतों.

**मानाजी**:--भाईसाहेब, सावजी, चालवा तलवारी. गुलामाचे तुकडे तुकडे करा.

**नेताजी**:--सरदारसाहेब, आपण मजा पाहणार वाटतं ?

**मानाजी**:--मीही आहेंच तुमच्या मदतीला. चला आटपा लवकर. (लढतात, नेताजी कमळजेला लढत लढत आंत नेतो. दाऊद मागं होतो. मानाजी वार लागून पडतो. झुंझार त्याच्या छातीवर बेसावध उभा राहतो. दाऊद मागून वार करतो. झुंझार पडतो. हरहर महादेव अशी आरोळी होते. मानाजी पळतो.)

**दाऊद**:—अरे बापरे ! हे मराठे आले वाटतं. आतां मेल्याचं सोंग करून पडावं. (नेताजीचे लोक झुंझारला उचलून नेतात. कमळजा येते.)

**कमळजा**:—अहाहा ! धन्य शिवप्रभू ! बंधुभगिनींचं रक्षण करण्याचे आपले उद्योग खरोखरच दैविक आहेत. शिवराया, तुझे शत्रू म्हणून तुझ्या नाशावर आलेले आम्हीं; पण आमचं तूं दोन वेळां रक्षण केलंस. आतां स्वारीचं मन खात्रीनं शिवसेवेकड वळेल. पण इथं कुणीच नाहीं हें कसं ? जागा तर चुकलें नाहीं ? जागा हीच. मग मांगांनीं दगा तर केला नसेल ना ? देवा, तुझ्या राज्यांतसुद्धां न्याय नाहीं का ? (दाऊद कण्हतो) कोण बरं कण्हलं ? स्वारी तर नाहीं ? ( पुढं जाऊन) कोण आहे तिथं ?

**दाऊद**:--(स्वगत) या अल्ला ! तीच ही. (उठून न्याहाळून) प्यारी, मी आहें, दुसरं कुणी नाहीं. तुझ्या माझ्या भाग्यानं मीच एकटा जिवंत राहिलों. ये, प्यारी, मेरी दिलजान, मला हात दे.

**कमळजा**:—हायरे दैवा ! नाथ, चांडाळांनीं आपली काय हो दशा केली असेल ! देवा, देवा—

**दाऊद**:—अरे ही रडूं लागली. तूं रडूं नकोस. बाकीचे मेले नाहींत: पण सावजी कुठं आहे ?

**कमळजा**:—स्वारी कुठं आहे ?

**दाऊद**:—आतां मीच तुझी स्वारी. मेरी दिलजान, तुझ्याकरतां झुंझारवर स्वारी करून त्याला चीत केला. त्यानं मानाजीला लोळवला, पण मी त्याला पुरा जायबंदी केला. आतां तो जगत नाहीं.

**कमळजा**:—पण ते आहेत कुठं ?

**दाऊद**:—शत्रूनीं पळवला. मानाजी पळाला. मी मेल्याचं सोंग करून पडून राहिलों म्हणून वांचलों. प्यारी, मेरी दिलजान, मी तुझ्यावर आषक—

**कमळजा**:—मेल्या, कुणालारे प्यारी म्हणतोस ? मी इथं एकटी असलें तरी आमचं रक्षण करणारे शिवाजी महाराज योग्य वेळीं धांवून येतील. मला अडवायचं धाडस करूं नको.

**दाऊद**:—कोण ? शि-शिवाजी. माझ्यावर दया कर. त्याला हांक मारूं नको. जाऊं नकोस, मी तुझं रक्षण करीन. (तिला धरतो.)

**कमळजा**:—चांडाळा, सोड मला. नाहीं तर तुझ्या पायांजवळ कपाळमोक्ष करीन. शिवाजी महाराज—

**दाऊद**:—चूप. मी तुला छावणींत नेण्याकरतां तर जगलों. (जयजय रघुवीर समर्थ अशी घोषणा होते) अरे बापरे! आले हे लेकाचे परत. (कमळजेला सोडतो. झाडाला टेकून कांपत कांपत उभा राहतो. नेताजी आडून त्याला बांधतो.)

**कमळजा**:—नाथ, आपण कुठंही सुखरूप असा! मी पावित्र्य रक्षणाकरतां हें घाणेरडं जग सोडून जातें. देवा, स्वारींच्या मनांत मायदेशाच्या उद्धाराची प्रेरणा कर! नाथ, जातें मी आतां. नाथ! नाथ!

**श्रीधर**:—(कमळजा जंबियानें आत्महत्या करूं लागते.) मुली, आत्महत्या करूं नकोस. तुझा पती सुखरूप आहे!

**कमळजा**:—अहाहा! ते सुखरूप आहेत. महाराज, आपण मला देवासारखे भेटलांत. ते कुठं आहेत तें मला लवकर सांगा. त्यांना केव्हां एकदां डोळेभरून पाहीन असं झालं आहे.

**श्रीधर**:—तुझा पती सुखरूप आहे; पण तो तुला आजच भेटण्याच्या स्थितींत नाहीं. त्याला भयंकर जखम झाली आहे. तो शिवरायाच्या ताब्यांत असल्यामुळं तुला काळजी करण्याचं कारण नाहीं.

**कमळजा**:—महाराज, मरते वेळीं ही आनंदाची बातमी मला सांगितलीत आतां मी आनंदानं मरेन.

**श्रीधर**:—तूं आत्महत्या करणार? ती काय म्हणून?

**कमळजा**:—या जगांत मला थारा नाहीं म्हणून. महाराज, मला जगाचा जो अनुभव आला आहे तो फार वाईट आहे. मला पातिव्रत्य रक्षणाकरतां मेलंच पाहिजे.

**श्रीधर**:–सारं जग वाईट, सर्व पुरुष नराधम आहेत, असं का तुला वाटतं?

**कमळजा**:—नाहीं; पण ह्या आदिलशाहीत माझ्या पातिव्रत्यावर उठलेले पुष्कळ नराधम आहेत.

**श्रीधर**:—मग तूं मराठ्यांच्या स्वराज्यांत आपल्या नवऱ्याकडे चल; मी तुला पोंचवतों.

**कमळजा**:—एवढं कुठं आहे माझं भाग्य! महाराज, मला या देहीं शिवराज्यांत येतां येत नाहीं.

**श्रीधरः**—तें कां ?

**कमळजाः**--माझे स्वामी आदिलशाहीचे नोकर आहेत. ते महाराजांना मिळाले नाहींत तोंपर्यंत शिवराज्यांत पाऊल टाकणं बरं नाहीं. तिकडनं हा पक्ष सुटणं अशक्य, म्हणून मला हा देहत्याग प्राप्त आहे. महाराज, माझी ही कहाणी तिकडच्या कानीं घाला. पतीच्या नांवाकरतां—पतिध्येयाकरतां—पतीच्या इच्छे-प्रमाणं पातिव्रत्य राखण्याकरतां मी आनंदानं मृत्यूला कवटाळतें.

**श्रीधरः**—मुली, आत्महत्या अघोरी आहे ! पावित्र्य रक्षणाकरतां—पापी नराधमांच्या नजरबंदीकरतां मरायला नको. पतीची भेट होईपर्यंतचा काळ देवकार्यांत घालव. कुणातरी साधूचा मठ गांठ. मनांत उत्पन्न होणाऱ्या सत्प्रवृत्ती-प्रमाणं वाग. हा मृत्यूचा घोर विचार सोड; चल.

**कमळजाः**—महाराज, आपण मला देवाप्रमाणं अहांत. आपली आज्ञा मी कशी मोडूं. पण वेळ पडल्यास—

**श्रीधरः**—समजलों. मुली, तूं चतुर आहेस. तशी वेळच येणार नाहीं; तरी-पण प्रसंगीं तुला पावित्र्य रक्षणाची मोकळीक आहे. चल, मी तुला मंत्र सांगतों त्याचा पाठ कर आणि संकटमुक्त हो. (जातात.)

**नेताजीः**—(प्रवेश करून) भाईसाहेब, मी तो सावजी. मराठा नव्हे.

**दाऊदः**—मराठा नव्हे तर कोण, पठाण ?

**नेताजीः**—मी जातीचा मराठा, पण कृतीचा पठाण आहें. मी मराठा असतों तर ही दशा कां होती ?

**दाऊदः**--पण अगोदर मला सोड. हरामखोरांनीं जखडून कीरे टाकलं; झाडाचे कांटे बोंचताहेत.

**नेताजीः**--झाडाचे कांटे बोचत नाहींत; मानाजीची संगत नडते आहे ही. दाऊदखान, मी आतां मराठा आहें.

**दाऊदः**--अरे बापरे ! आणखी तूं काय करणार ? सावजी, तुझ्या पायां पडतों. तूं मराठा होऊं नको. मला आधीं छावणींत घेऊन चल. मला जिवदान दे.

**नेताजीः**--मला काय द्याल ?

**दाऊदः**-काय देऊं? माझ्याजवळ देण्यासारखं काय आहे ? हो. ही दोरी आहे.

**नेताजीः**—वः ! सोडणार त्याचे उपकार मला बांधून फेडणार वाटतं. दाऊदखान, मी तुझा शिरच्छेद करणार, तुझे तुकडे तुकडे करणार.

**दाऊद**:--अरे बापरे ! सावजी, नकोरे असं करूं. मी तुझा गुलाम होऊन राहीन. असा रागावूं नकोस. मी थट्टा केली ती. हें बघ तुझ्या पायां पडतों. मला मारूं नकोस.

**नेताजी**:--मग मी सांगेन तसं वागलं पाहिजे.

**दाऊद**:--कबूल.

**नेताजी**:--मी सांगेन तसं खानापुढं बोललं पाहिजे.

**दाऊद**:--कबूल.

**नेताजी**:--मानाजीची संगत--

**दाऊद**:--करायची.

**नेताजी**:--काय ? (तलवार उगारतो.)

**दाऊद**:--नाहीं ? बरं नाहीं करायची.

**नेताजी**:--कबूल असेल तर सोडतों.

**दाऊद**:--तूं सांगशील तसं करतों. तुझ्या सर्व अटी मला कबूल आहेत.
(नेताजी सोडतो.)

**नेताजी**:--हँः हँः हँः ! भाईसाहेब, भ्यालांत वाटतं ? मी थट्टा केली ती.

**दाऊद**:--हें मला माहित होतं.

**नेताजी**:--आपल्या पराक्रमाची तालीम घेतली.

**दाऊद**:--सावजी, तूं काय करशील तें खरं. पण मानाजीची फजिती--

**नेताजी**:--आतां दाखवतों; पण फिरलांत तर ?

**दाऊद**:--बांधून ठेव.

**नेताजी**:--मानाजीनं एकादी परी दाखवली तर ?

**दाऊद**:--ती पाहिजे.

**नेताजी**:--काय पाहिजे ? (तलवार उगारतो.)

**दाऊद**:--बरं नको.

**नेताजी**:--मानाजी आतां खानाकड बढाया मारीत असेल. त्याला खोटा पाडलात तर त्याची फजिती पहायला मिळेल.

**दाऊद**:--तूं शिकवून ठेव कीं असा खोटा पाडतों, पण तूं जवळ पाहिजेस.

**नेताजी**:--मी तुमची बाजू सांवरून घेईन.

**दाऊद**:--अच्छा चलो. (जातात.)

---

## प्रवेश दुसरा.

( अफझुलखान व मानाजी येतात. )

**अफझुलखानः**--काय म्हणतां मानाजी ? झुंझार मारला गेला ? मी तुम्हांला अटक करायचा हुकूम दिला होता-मारायचा नव्हता. झुंझारच्या वधामुळं सैन्यांतले मराठे बिथरले तर त्याला जबाबदार कोण ? नादानपणाचीं कृत्यें तुम्हीं करा आणि आम्हांला लोकांच्या तोंडीं द्या. बेवकूब ! तें कांहीं नाहीं. मी ही जबाबदारी घेत नाहीं. तुम्हांला जबाबदार धरून लोकांच्या कोपाग्नींत मला तुम्हांला ढकलावं लागेल.

**मानाजीः**--आदिलशाहीकरतां या देहाचा मी वाटेल तसा बळी देईन. झुंझार फितूर होता. इतकंच नव्हे तर जावळी बाहेरील जंगलांत शिवाजीचे लोक त्याच्या मदतीला तयार होते. आपल्या हुकमाप्रमाणं मी त्याला अटक केली; पण भाईसाहेबांवर त्यानं वार करून त्याला जमिनदोस्त केले, तेव्हां माझं मन अनावर झालं आणि मी त्याच्यावर प्रहार केला. खाविंद, ही पाहिलीत जखम. पण त्याच्याकड लक्ष न देतां—जिवाची पर्वा न करतां मी त्याला लढवला आणि आदिलशाहीचा हितशत्रू मातीला मिळवला.

**अफझुलखानः**—भाईसाहेबांचा खून आणि तो—

**मानाजीः**--झुंझारनं केला. खून म्हणजे लढतां लढतां वर्मी वार लागून ते पडले.

**अफझुलखानः**—आणि तुम्ही त्याला पुढं केलंत ?

**मानाजीः**--असं कसं होईल ? आदिलशाहीचा मी स्वामिभक्त नोकर. प्रथम मीच आडवा गेलों; पण हा वार लागून पडलों. मी मराठा असल्यामुळं माझ्यावर त्याचा तितका रोष नव्हता. पण भाईसाहेबांवर त्याचा दांत होता त्याच्यावर केलेला वार त्वेषाचा–कपटाचा होता. म्हणून असा प्रकार झाला. भाईसाहेबांची अशी अवस्था पाहून आदिलशाहीच्या लौकिकासाठीं मी अर्धमेल्या स्थितींत त्वेषानं प्रहार केला. आणि निमकहरामाला मातीला मिळवला.

**अफझुलखानः**-छान केलंत. मानाजी मी तुम्हांला सांभाळून घेईन. तुमच्या राजनिष्ठेचं मी चीज करीन. भाईसाहेबांचा खून आणि तो मराठ्याकडून ! याचा

सूड मी शिवाजीवर-शहाजीवर-दरबारांतल्या साऱ्या मराठ्यांवर घेईन. आदिलशाहीचीं राजसूत्रं माझ्या हातीं येतांच साऱ्या मराठ्यांचा मी उच्छेद करीन. आज मला वरवर शांतपणा दाखवला पाहिजे. शिवाजी हातीं येईपर्यंत जपून वागलं पाहिजे. मानाजी, झुंझारच्या मृत्यूचा बभ्रा करूं नका. आतांच्या आतां फर्मान काढून त्याला विजापुरास कामगिरीवर पाठवल्याचं जाहीर करूं. भाईसाहेबांचं दफ्फनही गुप्तपणंच उरकलं पाहिजे.

**मानाजीः**—खाविंद एक गोष्ट अद्याप राहिली आहे.

**अफझुलखानः**—ती कोणती ?

**मानाजीः**—मला कसूर माफ असावी. शत्रूचे लोक येतांच भाईसाहेबांचं शव टाकून मला यावं लागलं आणि शत्रूच्या लोकांनीं तें नेलं. (दाऊद नेताजी येतात.)

**दाऊदः**—शत्रूच्या लोकांनीं तें नेलं का तूं देऊं पहात होतास ? हरामखोर, पळपुटा! खानसाहेब, आजपर्यंतचं याचं वर्तन मायावी आणि सरकारी इभ्रतीला काळीमा आणणारं आहे. झुंझार खरा स्वामिभक्त होता. या पाजी माणसामुळं तो शत्रूच्या हातीं लागला.

**मानाजीः**—(स्वगत) याचे दांत याच्याच घशांत घालून मोकळं व्हावं. (उघड) खाविंद, हें कुभांड आहे. माझा प्रत्येक शब्द खरा आहे. आणि तो सिद्ध करायला मी तयार आहें.

**दाऊदः**—माझा खून झाला हें सिद्ध कर पाहूं ! अरे वः ! मला शत्रूच्या कैचींत टाकून पळालास.

**मानाजीः**—आत्मबचवासाठीं मला तसं करणं भाग पडलं. पण भाईसाहेब जिवंत आहेत असं मला दिसतं तर मी भाईसाहेबांकरतां आपला प्राण दिला असता, शिवाय हा सावजी जवळपास होताच.

**नेताजीः**—मी कसा जवळ असेन ? आत्मबचावाकरतां मीही लपून बसलों मात्र पळालों नाहीं.

**दाऊदः**—हो. पळाला नाहीं तुझ्यासारखा.

**नेताजीः**—शिवाय भाईसाहेबांच्या जिवाला जीव देण्याची हमी मानाजीराव, आपण घेतलेली. मी साधा नोकर. अर्थात् सेवा करायचं काम माझं. माझा सेवा-धर्म मी बरोबर पाळला.

**दाऊद**:—हा सावजी होता म्हणून तर मी आज वांचलों खानसाहेब. तें कांहीं नाहीं या काळसर्पाला कडक शिक्षा करा--तोफेच्या तोंडीं द्या. अहो, हा अवसानघातकी म्हणे त्या शिवाजीला पकडणार !

**नेताजी**:—भाईसाहेब, जरा थांबा. मानाजीराव, आपल्या सत्याचा पाढा एकदां वाचा पाहूं.

**मानाजी**:—(स्वगत) हा मोठा पाताळ यंत्री दिसतो. यालाही गोत्यांत आणलाच पाहिजे. कदाचित् हा शिवाजीचा हेर नसेल कशावरून !

**दाऊद**:—ए ! बोल, असा गप्प कां ?

**मानाजी**:—खाविंद, मला या सावजीचा संशय येतो.

**नेताजी**:--माझा संशय ? तो कां ? आपल्या कारस्थानांत मी सामील होत नाहीं म्हणून ? मानाजीराव, मी पातशाहीचा नोकर. आपली नोकरी इमानानं बजावतों. आम्हांला कारस्थानं काय करायचीं. आतां आम्हीं सरदार मानकरी नाहीं तेव्हां आमची कामगिरी दिसत नाहीं.

**दाऊद**:—सावजी, मी पाहिली आहेरे तुझी कामगिरी. तुझं इमान मी पुरतं ओळखलं आहे.

**अफझुलखान**:—मानाजी, प्रथम झुंझारचा फितूर सिद्ध करा. आणि तुमच्यावरचे यांचे आरोप खोटे आहेत अशी माझी खात्री करा.

**मानाजी**:—परवां झुंझारला भेटायला शिवाजी येणार असं कळतांच शिवाजीला अवचित पकडतां यावं, म्हणून आम्ही तिघे झुंझारच्या घरीं दबा धरून बसलों.

**दाऊद**:—हो, लपून बसलों खानसाहेब.

**मानाजी**:—शिवाजीला पकडायला झुंझारचा अडथळा नसावा म्हणून आपल्या नांवावर या सावजीकडून त्याला बाहेर काढला. मी त्याला पकडायला गेलों पण तो बाहेरच पडला नाहीं. शिवाजीची आणि त्याची भेट झाली. सावजीला आणि भाईसाहेबांना झुंझारनं अटक केली.

**नेताजी**:—(दाऊदच्या कानांत) भाईसाहेब, यावेळीं खरी हकिगत सांगा. चोर बाजू तुमच्या अंगावर आणतो आहे.

**दाऊद**:—अच्छा ! साफ खोटं आहे हें. खानसाहेब, झुंझारला या सावजीनं बाहेर काढल्यावर त्याला ठार करायला हा गेला. याचा झुंझारवर कूट आहे. मला झुंझारच्या बायकोला पकडून तिच्याशीं निका लावायला सांगितलं. मी

मोठ्या धिटाईनं झुंझारच्या बायकोला पकडणार इतक्यांत शिवाजी एकदम आला. मी एकटा म्हणून घाबरलों.

**अफझुलखानः**—मानाजी, शिवाजी येणार हें तुम्हांला कळलं असतां तुम्हांला त्याला पकडायचं सामर्थ्य नव्हतं, तर आम्हांला वर्दी कां दिली नाहीं?

**दाऊदः**—याला कुठं कळलं होतं?

**अफझुलखानः**—मग?

**दाऊदः**—शिवाजीला त्या भवानीनं सांगितलं म्हणे शिवाजीचं आणि झुंझारचं भांडण झालं. झुंझाररावाला सुद्धां त्यानं धमकी दिली. आम्ही सर्व घाबरलों.

**अफझुलखानः**—मानाजी तुम्ही कुठं होतां? शिवाजी हातीं आला असतां तुमची अशी अनास्था.

**नेताजीः**—पण शिवाजीला पकडायची आस्था यानां आहे कुठं? झुंझाररावांना नाहींसें करण्यापलीकड तुमचं राजकारण यानां दिसतं आहे कुठं? झुंझारराव फितूर नाहींत इतकंच नव्हे तर ते खरे स्वामिभक्त आहेत हें लवकरच आपल्या निदर्शनास येईल. खाविंद, या पाजी मानाजीनं झुंझाररावांच्या पत्नीवर भाईसाहेबांकडून हात टाकवला.

**अफझुलखानः**-भाईसाहेब, तुम्ही झुंझाररावाच्या पत्नीवर हात टाकलात?

**दाऊदः**—काय खानसाहेब, नुसता हात टाकला? अहो, माझ्या तलवारीनं तिच्या हातची तलवार मोठ्या शिताफीनं उडवली.

**अफझुलखानः**—चूप! मराठे सरदारांच्या झनान्याची अशी विटंबना करतां, शरम नाहीं वाटत?

**दाऊदः**—शरम वाटते खानसाहेब, पण मी कबूल नसतां या मानाजीनं सारं करवलं.

**अफझुलखानः**—हरामखोर!

**दाऊदः**—हरामखोर!

**अफझुलखानः**—मानाजी, या वेड्या दाऊदखानाचा असा दुरुपयोग करतां? असले अत्याचार करवतां?

**मानाजीः**—मुळींच नाहीं. ही अतिशयोक्ति आहे. माझ्या सांगण्याबाहेर भाईसाहेबांकडून अचरटपणा झालेला आहे. हुजूर, झुंझारराव फितूर होता.

असल्या बेइमान्यांची-निमकहरामाची वाटेल ती वाट लावणं हें माझं कर्तव्य होतं आणि आपलीही त्याला संमत्ति होती.

**अफझुलखान**:—चूप ! मानाजी, कुणासमोर आहांत तुम्हीं ?

**दाऊद**:—चूप ! कुणासमोर आहांत तुम्हीं ?

**अफझुलखान**:–मी तुम्हांला वाटेल तसा धिंगाणा घालायची परवानगी दिली नव्हती. बेवकूब, नादान, मानाजी, तुमचे सर्व अधिकार काढून घेतले आहेत.

**दाऊद**:—शाबास ! सावजी. (आपली पाठ थोपटून घेतो.)

**अफझुलखान**:—या प्रकरणाची चौकशी होऊन छावणींत शांतता होई-पर्यंत तुम्ही छावणीबाहेर पडतां कामा नये. जा; चला इथून काळं करा.

**दाऊद**:—चले जाव इधरसे. (मानाजी जातो).

**अफझुलखान**:—तुम बी चलो.

**दाऊद**:—सावजी, तुम बी चलो. (नेताजी जातो.)

**अफझुलखान**:—चलो, तुमबी चलो.

**दाऊद**:—अहो, मी तुमचा मेहुणा दाऊदखान.

**अफझुलखान**:–चलो, अबीके अबी निकालो. (दाऊद जातो.) या मराठ्यांच्या दुहीचा फायदा घेऊन शिवाजीला पकडावा म्हणून या मानाजीला जवळ केला; त्याचा हा परिणाम झाला. झुंझार फितूर आहे असं हा एकटाच म्हणतो. दाऊद-सुद्धां त्याच्या राजनिष्ठेची तारीफच करतो. आतां विश्वास तरी कुणावर ठेवावा ! ही आग आतां कोठपर्यंत भडकते कुणाला ठाऊक. शिवाजी तहाला तयार आहे त्याचा फायदा घेऊन तो म्हणेल त्याला होला हो म्हणून त्याला तहाच्या वाटा-घाटीला बोलावतों. बस्स ! आतां तलवारीपेक्षां मुत्सद्देगिरीचाच अवलंब करावा. तमाम छावणींत आपण तह करणार शिवाजीला मोकळा सोडणार असा फुकारा करतों. मानाजीच्या चौकशीचा बहाणा करून लोकांना शांत ठेवतों आणि शिवाजी हातीं येतांच त्याला पकडून विजापुरास नेतों. (जातो.)

**नेताजी**:—(प्रवेश करून) कर कर ! वाटेल तो फुकारा कर ! माझे कान तुझ्या हृदयाला लागलेले आहेत. ते तुझं हृद्गत ऐकून केव्हांच सावध झाले आहेत. मानाजीला तर जाग्यावर बसवलाच. आतां या खानाच्या पोटांत शिरलं पाहिजे. माझ्यावर आतां त्याचा पूर्ण विश्वास बसला आहे. चला, खानाच्या पावलावर पाऊल टाकून राहिलं पाहिजे. (जातो.)

---

मं. ग्रं. सं. ठाणे, कायनालय शाखा.
ग्रं. क. १०३६ नों. दि.
वि.




अफझुलखानः—मानाजी, तुमचे सर्व अधिकार काढून घेतले आहेत. (पान ७२.)

## प्रवेश तिसरा.

**मोहना**:—(यती वेषांत) शिवाजीला नाहींसा करायचीं सर्वच कारस्थानं कशीं फसतात ! आज तीन वर्षं मी कारस्थानं करतें पण तीं आपोआप धुळीला मिळतात. खानाच्या मोहिमेंत शिवाजीच्या नाशाच्या यशाचा वांटा जावळीकरांना मिळावा म्हणून या मानाजीला जवळ केला; पण हा नादान भलतंच करून बसला. का माझाच डाव चुकला ? नादी माणसं कामाला नालायक असतात, हेंच खरं. झुंझाररावांना परस्पर मोहिमेतून हुसकवायचं, पण या मूर्खानं स्वत:च त्यांचा पिच्छा पुरवला! आणि ते शिवाजीच्या हातीं लागले. मानाजीचं खरं स्वरूप खानाच्या नजरेस आलं. माझा संताजी, म्हातारा धोरणी खरा ! त्यानं भविष्य केलं तसं झालं. त्यानं आज तीन वर्षांत किती छान तयारी केली होती; पण ऐन वेळीं या मानाजीच्या नादानं ती मातीला मिळाली. आमच्या कारस्थानाचा—आमचा माग शिवाजीला लागूं नये म्हणून घरदार सोडून या वेषांत, हा अरण्याचा मार्ग धरावा लागला. आतां तरी यश येतं का कुणाला ठाऊक ! मी तर अगदीं निराश झाल्यें आहें. का मी हा नादच सोडूं ! प्रेमाच्या जाळ्यांत शिवाजीला पकडतां आलं असतं; पण वेळ निघून गेल्यावर सुचून काय उपयोग ! झुंझारराव शिवाजीच्या हातीं लागल्यामुळं माझा मात्र घात झाला. त्यांनीं आमचं कारस्थान त्याला सांगितलंही असेल आणि शिवाजीनं आपल्या हेरांचं जाळं या जावळींत पसरलं असेल. माझींच कृत्यं मला खाताहेत. माझ्या प्रेमाला लालचावलेलं हें कुत्रं माझा माग काढीत आलं तर त्याच्या मागं लागलेला शिवाजीचा फांसे पारधी, माझीच शिकार करून मलाच जाळ्यांत पकडील. काय करावं हेंच सुचत नाहीं. आतां संताजीच्या या कारस्थानाला यश येईल असं मला वाटत नाहीं. त्यानं भुयाराच्या कामावर लावलेल्या लमाणांत एकादा शिवाजीचा हेर बाहेर निघायचा. नको, नको हें कारस्थान आणि नको हें जीवित ! झुंझारराव, मनानं वरलेल्या पतीचा नाश करायला उद्युक्त होऊन आर्यस्त्रीधर्माला तुडवलं, म्हणून तर मला या यातना भोगाव्या लागत नसतील ! झुंझारराव, झुंझारराव ! (एका झाडाच्या बुंध्याशीं पडते, कमळजा वैराग्याच्या वेषांत येते.)

**कमळजा**:—इकडचं नांव घेऊन कुणी बरं करुणोद्गार काढले ! आवाज

तर स्त्रीचा असावा ! स्वारीवर असं प्रेम करणारी ही कोण बाई ! कां बरं प्रेम असणार नाहीं ! गुणी जीव सर्वांना प्यार असणारच. हो ! मोऱ्यांच्या मोहनेचं इकड प्रेम असण्याचा संभव आहे. इकडच्या चांडाळांनीं अशी अवस्था केल्याचं ऐकून तिचीही माझ्या प्रमाणंच स्थिति झाली असेल. हिची भेट झाली हें एक-परी बरं झालं. समदुःखी म्हणून जोडीनं परमेश्वराला आळवूं आणि आमचा जीव—प्राण सती सावित्री प्रमाणं परत मिळवूं ! जावंच पुढं; पण हो ! स्वामींच्या शिकवणुकीप्रमाणं ओळख न देतां बैराग्यासारखी बतावणी केली पाहिजे. (जवळ जाऊन) बाई, उठा. मीही आपल्यासारखीच पांथस्त बैरागीण आहें आम्हां बैराग्यांना संसारी सुखदुःखं विसरून परमेश्वराकड लक्ष दिलं पाहिजे. बाई—

**मोहनाः**—बाई ? कुणाला हो बाई म्हणतां ? दिसत नाहीं तुम्हांला मी पुरुष आहें तो.

**कमळजाः**—आव पुरुषाचा दिसतो आहे; पण लक्षण बायकोचं आहे. मला आश्रय पाहिजे आहे. मी यात्रेकरू बैरागीण. सोबतचीं माणसं चुकलीं म्हणून खानाची मोहीम आटपेपर्यंत मला आश्रय पाहिजे. बाई—

**मोहनाः**—नाहीं. मी बाई नाहीं, हा तुमचा गैरसमज आहे. मी पुरुषच आहे.

**कमळजाः**—तसंच कां होईना ! बुवा, मला आश्रय द्या. आज दोन दिवस सारखी भटकून भटकून थकल्यें आहें. मी तुमचे पाय धरल्यें मला झिडकारूं नका. (पाय धरते.)

**मोहनाः**—(स्वगत) ही कुठची ब्याद आली इथं ? ही शिवाजीचा हेर नसेल ना ! (उघड) बाई, मीच बैरागी. तुम्हांला आश्रय काय देणार ? दुसरा कुठं आश्रय पहा. माझ्यासारख्या फटिंगाशीं आश्रय कसा मिळणार ? मीच या जंगलांत एकटा भटकत असतों.

**कमळजाः**—फटिंगाला फटिंग, बैराग्याला बैरागी आश्रय देणार नाहीं तर कोण देणार ? मला सोबत पाहिजे. बुवा, बैराग्यांनीं असं निष्ठुर होणं बरं नाहीं.

**मोहनाः**—बाई, मी पुरुष, तुम्हीं स्त्री, आपली सोबत कशी जमेल ?

**कमळजाः**—बैराग्याला भेदाभेद नसतो. तो परमेश्वर स्वरूप असतो. म्हणून म्हणतें मला आश्रय द्याच.

**मोहनाः**—(स्वगत)आतां काय करावं ? ही तर पिच्छा सोडीत नाहीं. ही शिवाजीचा हेर असेल तर जास्त घासाघीस केल्यास हिचा संशय द्विगुणित

होईल. हिला बरोबर न्यावी आणि खात्री होईपर्यंत दूर ठेवावी. कमजास्त दिसल्यास भुयारांत आंतल्या आंत गाडून मोकळं व्हावं. मला मात्र ही नवी कामगिरी लागली. (उघड) बाई, मी तुम्हांला बरोबर नेतों; पण सांभाळून वागावं लागेल. माझे गुरु स्त्रीद्वेष्टे आहेत. त्यांच्यापासून लांब रहावं लागेल. त्यांची तुझ्याबद्दल खात्री होईपर्यंत कुठं बाहेर फिरायचं नाहीं. आहे कबूल?

**कमळजाः**—मला काय चार दोन महिने रहायचं. मला तुमचं म्हणणं कबूल आहे.

**मोहनाः**—चल माझ्याबरोबर; पण सांभाळून वाग; नाहींतर इथून जावं लागेल. (जातात.)

---

## प्रवेश चौथा.

( प्रतापगड—राजवाडा—तानाजीराव व झुंझारराव. )

**झुंझाररावः**—तानाजीराव, चार दिवसांच्या आपल्या सहवासानं मला खरोखरच धन्यता वाटते.

**तानाजीः**—झुंझारराव, आम्हांला शाब्दिक धन्यवाद नको आहेत. ते कृतींत उतरवा—स्वराज्याला मिळा.

**झुंझाररावः**—तानाजीराव, स्वराज्याला मिळून मी आदिलशाहीशीं निमकहराम होऊं? आदिलशाहींत तुमच्या या उत्कर्षामुळं सर्वच मराठे फितूर ठरताहेत. शहाजीराजे, मुरार जगदेव यांच्यासारखे मुत्सद्दी—आदिलशाहीचे आधारस्तंभ पण त्यांच्यावरसुद्धां फितूरीचा शिक्का मारायला आपमतलबी मराठे आणि दरबार कमी करीत नाहीं. आज मी आपल्या पक्षाला मिळालों तर हा समज दृढ होऊन दरबारी मराठ्यांचा छळ होईल. तानाजीराव, आदिलशाहींत आम्हीं स्वदेशाची बाजू सांवरून धरतों.

**तानाजीः**—नाहीं. तुमच्यासारखे देशद्रोही मराठे विजापूर दरबारांत आहेत, म्हणूनच स्वराज्यावर असले गळचेपीचे प्रसंग येतात. तुम्हीं स्वराज्यांत या आणि मग पहा आदिलशाही कशी वागते ती. आमचं स्वराज्य इतरांचीं राज्यं

उलथून पाडण्याकरतां आम्हीं मिळवीत नाहीं तर आम्हांला आमच्या घरांत सुखासमाधानानं—आपलेपणानं नांदतां आलं पाहिजे.

**झुंझारराव**:—कबूल. आमचेही प्रयत्न हेच आहेत. आदिलशाहींत शहाजीराजांसारखीं नररत्नं हाच उद्योग करीत आहेत.

**तानाजी**:—पण त्याचा परिणाम काय होतो ? तुम्हांला स्वतःचं जीवित सुरक्षित राखणं अशक्य ते तुम्हीं जनतेचं हित व रक्षण काय करणार ? महाराजांना पकडून स्वराज्याचा विध्वंस करायला तुम्ही खानाबरोबर आलांत हीच तुमची देशसेवा ना ?

**झुंझारराव**:—तानाजीराव, कांहीं गोष्टी आम्हांला दरबारच्या हुकमाप्रमाणं कराव्या लागल्या तरी बऱ्याच गोष्टींत आम्हांला यश मिळतं. आम्हीं दरबारी मराठे स्वराज्याचा नाश करूं देणार नाहीं.

**तानाजी**:—आम्हांला दरबारी मराठ्यांच्या सूजेचा थोरपणा नको आहे. तुम्हीं काय करतां तें सांगा. आदिलशाहींत हजारांत एखादी क्षुल्लक गोष्ट तुमच्या मनासारखी होत असेल; पण तेवढ्यानं आमचं भागणार नाहीं. आम्हांला आमच्या सर्व गोष्टी आमच्या मताप्रमाणं करतां आल्या पाहिजेत. झुंझारराव, ही गोष्ट सर्व मराठ्यांना कळून चुकली आहे. मग आपला विचार ?

**झुंझारराव**:—माझा विचार कायम आहे. मी आदिलशाही सोडायला केव्हांच तयार नाहीं.

**तानाजी**:—झुंझारराव, तुम्हांला आदिलशाही सुटली. तुम्हीं आम्हांला मिळालां नाहीं तर या प्रतापगडाच्या खालचा प्रदेश तुम्हांला दिसणार नाहीं, मग आदिलशाही आणि विजापूर कुठलं ?

**जिजाबाई**:—(प्रवेश करून) हां ! हां ! ताना, झुंझार अजून आजारी आहे आणि तुझा असा भडिमार !

**झुंझारराव**:—आईसाहेब, आपल्या कृपेनं आणि शिवराज्यांतल्या पुण्यशील वातावरणांत अंतःकरणाच्या जखमा बऱ्या होतील मग बाहेरच्या जखमा बऱ्या झाल्या यांत नवल नाहीं. आईसाहेब, मी आतां बरा झालों आहें. तानाजीरावांचं हें बोलणं ऐकून आपल्या शिकवणुकीचं चित्र डोळ्यांपुढं उभं राहतं. सारा महाराष्ट्र मला शिवाजीमय झालेला दिसतो आणि शिवबाराजांबद्दलचा माझा आदर मात्र वाढतो. शिवबा साधारण व्यक्ति नसून अलौकिक

विभूति जगदुद्धाराकरतां अवतरलेला परमेश्वरी अंश असावा असं वाटूं लागतं; पण आईसाहेब, मला मात्र त्याचा कांहीं उपयोग नाहीं. मी गुलामगिरीला मान दिली ती शेवटपर्यंत मागं घेणं शक्य नाहीं. मी आदिलशाहींत राहून स्वधर्मा-करतां—स्वजनांकरतां आदिलशाहीशीं झगडेन. आदिलशाहींत काकवृत्तीच्या माझ्या जातभाईनीं आणि त्यांच्या नादानं नादान झालेल्या मुसलमानांनीं माझा छळ केला तरीही तो मी सोशीन; पण स्वामिद्रोह करणार नाहीं—आदिलशाही सोडणार नाहीं. (पंडितजीसह शिवाजी येतो)

**शिवाजी:**—ऐका ! पंडितजी, ऐका ! या तुमच्या फितुराचं हें बोलणं ऐका ! आदिलशाहींच्या स्वामिभक्त—राजनिष्ठ सेवकाची ही स्थिति पहा आणि मग गरीब बिचाऱ्या प्रजेच्या सुखाची कल्पना करा ! पंडितजी, आज आठ दिवस आमच्या स्वराज्यांतली परिस्थिति आपण पाहिली आहे. आमच्या स्वराज्यांत कोणत्याही राजसत्तेबद्दल वैर नाहीं. आमचं स्वराज्य जगाच्या मैत्रिकरतां—जीवमात्राच्या एकीसाठीं आहे हें तुम्हांला दिसून आलंच असेल.

**पंडितजी:**—महाराज, आपलं ध्येय व त्याची संपादणी उच्च आहे, हें कुणीही कबूल करील. या आठ दिवसांत मला त्याचा प्रत्यक्ष अनुभव आला आहे. आत्मस्फूर्तीच्या या वातावरणांत बाहेरचा माणूस गुंगून जाऊन स्वतःलाच विसरतो. त्याला तुमच्याप्रमाणं दिसूं लागतं; पण वस्तुस्थितीची आणि दरबारांत मिळणाऱ्या माहितीची त्याला सांगडच घालतां येत नाहीं. शिष्टाईला आलेला वकील तुमच्याप्रमाणंच बोलूं लागतो.

**शिवाजी:**—पण त्याचा उपयोग काय होतो ? आदिलशाहींत खरं मत देणा-रावर फितुरीचा शिक्का बसतो. पंडितजी, आदिलशाहीच्या जुलमाचं माप प्रत्यक्ष आदिलशाहीच्या गोटांत आम्हांला घालतां आलं. असले अत्याचार दरबारचे विश्वासांतले प्रतिनिधी करूं शकतात; मग आदिलशाहींत इतर अधिकारी याहून भयंकर अत्याचार करतील यांत नवल नाहीं. पंडितजी, झुंझाररावाच्या छळा-बद्दल खानाला दरबार जबाबदार धरून जाब विचारील काय ? नाहीं. मग असल्या जुलमाला आम्हीं आळा कां घालूं नये ?

**पंडितजी:**—तें तर प्रत्येक जीवमात्राचं कर्तव्य आहे.

**तानाजी:**—पंडितजी, आपण आपल्या कर्तव्याला कितपत जागतां ?

**पंडितजी:**—महाराज, तुमच्या कर्तव्याच्या आणि स्वराज्याच्या आड

आदिलशाही कधींच येणार नाहीं; पण तुमच्याकडून आदिलशाहीला त्रास होतां कामा नये. आदिलशाहीच्या मुलखांत तुम्हीं ढवळाढवळ करतां कामा नये अशीच सुलतानाची इच्छा आहे.

**शिवाजीः**—आम्हीं आदिलशाहीला मुळींच त्रास दिला नाहीं आणि देणार नाहीं; पण जुलमाचा प्रतिकार करायला मात्र चुकणार नाहीं. आमच्याकडून आदिलशाहीला त्रास होतो असा तुमच्या सुलतानाचा समज असेल तर त्याचं कारण आदिलशाहीचा धार्मिक जुलूम—मराठ्यांवरील अविश्वास आणि दरबारी फुशीमुळं बेफाम झालेल्या अधिकाऱ्यांचा रूांवळागोंधळ होतो आहे. सुलतानानं आपला कारभार सुधारावा–धार्मिक छळ बंद पाडावा म्हणजे ही दुही आपोआप मिटेल. पंडितजी, आम्हांला कोणत्याही राजसत्तेपेक्षां निजामशाही, आदिलशाही सरकारावद्दल जास्त अभिमान—आपलेपणा वाटतो. आदिलशाहीवर परचक्र आलं तर आम्हीं आदिलशाहीकरतां प्रथम मान देऊं. या अभिमानाला अनुसरून आदिलशाहीच्या इभ्रतीकरतां जुलमाला आळा घालण्यापलीकड आम्हीं आदिलशाहींत कसलीच ढवळाढवळ करीत नाहीं. इतकंच नव्हे तर आदिलशाहीला लागलेला दक्षिणेंतील मोंगलांचा शह दिवसें दिवस आम्हीं कमजोर करीत असतां आमच्याच पारिपत्याकरतां आदिलशाही सरकार अवाढव्य सैन्य पाठवतं हा खासा न्याय!

**पंडितजीः**—पण त्याचा परिणाम आदिलशाहीवरच होतो ना? आदिलशाहीचे सरदार—जहागिरदार आदिलशाही सोडून तुम्हांलाच मिळताहेत ना?

**शिवाजीः**—हा का आमचा दोष? पंडितजी; स्वराज्याचं महत्व कळून मराठे आपलेपणाला जागले. स्वपराक्रमाची—आत्मबलाची जाणीव झाल्यावर त्यांनीं मिंधेपणा कां टाकूं नये? जबरदस्तीच्या बळावर जागा झालेल्या महाराष्ट्राची डोळेझांक करतां येईल, असं का तुम्हांला वाटतं? असल्या शेंकडों स्वाऱ्या महाराष्ट्राच्या जागत्या ज्योतीला विझवूं शकणार नाहींत.

**पंडितजीः**—पण त्याला कारण तुमची चळवळ—तुमचा धाक.

**शिवाजीः**—धाक कुणाचा? आमचा का आदिलशाहीचा? स्वरक्षणाकरतां चळवळ न करावी तर मराठ्यांवर—आदिलशाहींत या झुंझाररावांसारखे प्रसंग येतील ते कसे टाळणार? निरुपद्रवी माणसांना मग तो शत्रू पक्षाचा असला तरी त्याला आम्हीं त्रास देत नाहीं; इतकंच नव्हे तर त्याच्या बावतींत

अन्याय होत असला तर त्यालाही अडथळा करायला आम्हीं चुकत नाहीं. याची साक्ष आदिलशाहीचे हे स्वामिभक्त सेवक झुंझारराव !

**पंडितजीः**—पण दरबारांत त्याचा विपर्यास होतो त्याला उपाय ?

**शिवाजीः**—त्याला उपाय ! त्याला उपाय एकच ! आणि तो म्हणजे स्वराज्य. सर्व मराठ्यांनीं स्वराज्याचा मार्ग धरा कीं दरबारचे डोळे खाडकन् उघडून आमच्याबद्दलचा त्यांचा भ्रम तेव्हांच दूर होईल. मुसलमानांच्या मनांत आमच्याबद्दल आदर आणि प्रेम उत्पन्न होईल; आणि ते सर्वांशीं समत्वानं वागतील. सर्व मराठ्यांनीं एक दिलानं स्वराज्य-तोरण बांधा कीं साऱ्या भरतखंडांत समतेचं धोरण नांदून आनंदी आनंद होईल.

**पंडितजीः**—अशीच आदिलशाही सरकारचीही इच्छा आहे. इथली परिस्थिति पाहून खानालासुद्धां आपली मैत्री जोडावी आणि जुलमाचा कायमचा नायनाट करावा असं वाटूं लागलं आहे. आदिलशाही आणि मराठे यांच्या एकीचं पुढील धोरण ठरवण्याकरतां आपण आमच्याबरोबर विजापुरला यावं अशी खानाची इच्छा आहे.

**शिवाजीः**—पंडितजी, तुम्हीं इतके दिवस खानाजवळ राहून अद्याप त्याला पुरा ओळखलांत नाहीं किंवा सरकारी मानमरातबाला भुलून आम्हांला गोत्यांत आणूं पहातां; पण लक्षांत ठेवा, हा शिवाजी असल्या भूलथापांना फसणार नाहीं. पंडितजी, आम्हां मराठ्यांच्या रक्ताला सोकावलेला हा खान आमच्याशीं न्यायानं वागणं स्वप्नांतसुद्धां शक्य नाहीं. नुकत्याच केलेल्या अत्याचारी कत्तलीच्या रक्तानं माखलेले ज्याचे हात अद्याप वाळले नाहींत-खुनानं तारवठलेले डोळे अद्याप शांत झाले नाहींत, तो खान न्यायाचं-समत्वाचं-एकीचं बोलणं काय करणार ? पंडितजी, तुमचा हा कावा आम्ही पुरा ओळखला आहे. विजापूर दरबारच्या न्यायीपणाच्या सत्यतेची खात्री पटल्याशिवाय मी विजापुरांत येणं शक्य नाहीं.

**जिजाबाईः**—पंडितजी, तुम्ही शिवबाला विजापुरला बोलावतां ! आमच्या नाशावर टपलेल्या खानाच्या हातीं द्यायला तयार होतां ! खानाच्या मर्दुमकीवर डोलणारा विजापूर दरबार शिवबाचा घात केल्याशिवाय राहील असं तुम्हांला वाटतं ? पंडितजी, आमच्या जिवाचा एवढा आटापिटा कोणाकरतां आहे ? सर्व मराठ्यांकरतां—हिंदुधर्माकरतांना ? महाराष्ट्राला सुखाचे—स्वातंत्र्याचे दिवस दिसावेत म्हणूनच मराठे ही खडतर तपश्चर्या करताहेतना ? मग पंडितजी,

अशा वेळीं तुम्हीं आमचं कल्याण चिंतायचं का घात करायचा? आज सर्वांच्या पुढं या स्वराज्याच्या कार्यांत प्रथम तुम्ही उडी घ्यायची आणि आम्हांला कल्याणाचा—स्वराज्याचा मार्ग दाखवायचा!

**पंडितजीः**—आईसाहेब, खरं आहे आपलं म्हणणं. आम्हीं पोटाचे मिंधे-धन्याचे नोकर. मी बोलतों ते दरबारचे बोल आहेत. मी खानाचा वकील अर्थात् खानाचं म्हणणं मी आपल्यापुढं माडलं, यावरून माझ्या मनाची परिक्षा करूं नका. स्वराज्य आम्हांला नको का आहे? पण —

**तानाजीः**—बादशाही मलियाचा स्वार्थ सुटत नाहीं असंच कीं नाहीं?

**शिवाजीः**—पंडितजी, तुम्हांला स्वराज्य पाहिजे; पण तो मार्ग पडला कष्टाचा—स्वार्थत्यागाचा. तुमचं लक्ष आज पातशाही मलीद्यावर आहे, तुमची चैन चालली आहे; तेव्हां तुमचं लक्ष इतरांकड कसं जाईल? आणि मनांतले विचार कृतींत कसे उतरतील? पंडितजी, तुमचं हृदय स्वराज्याकरतां पिळवटतं तर तुम्ही मला हा सल्लाच दिला नसतात. आमच्या मनांत कपट असतं तर आपल्याला इतके दिवस राहून आमची अंतस्थिति पाहूंच दिली नसती. झुंझारराव, आपला काय विचार ठरला?

**झुंझाररावः**—माझा विचार कायम आहे. आपल्या सान्निध्यांनं मला स्वराज्याची किंमत कळली. आज मी आपल्या पक्षाला मिळालों तर मी स्वामिद्रोही—विश्वासघातकी ठरेन. मी विजापूर दरबारांत राहून मराठ्यांना आदिलशाहींत स्वराज्याप्रमाणं नांदतां येईल असाच प्रयत्न करीन.

**शिवाजीः**—सर्व कर्तबगारांना प्रथम असंच वाटतं. कित्येकांनीं अनेक वेळा असं बोलूनही दाखवलं आहे; पण दास्यवृत्तींत बोलण्या पलीकडे प्रत्यक्ष कार्य असं कुणाच्याच हातून घडलं नाहीं. याचक वृत्तीनं उत्कर्ष कधींच होत नाहीं. त्याला पराक्रमच पाहिजे. झुंझारराव, स्वराज्याला आपली सहानुभूति असेल, कांहीं करावं असं वाटत असेल तर स्वराज्याला मिळा; तसं नसेल तर या पंडितजी बरोबर आदिलशाहींत खुशाल जा.

**तानाजीः**—महाराज, असले देशद्रोही मोकळे सोडायचे? यांना आम्हांला मिळायचं नसेल तर यांनीं सारा जन्म आमच्या कैदेंत काढला पाहिजे.

**जिजाबाईः**—ताना, शिवबा, झुंझाररावाच्या मनाला दुखवूं नका. त्याला आदिलशाहींत जायचं असेल तर खुशाल जाऊं दे; पण तो नीट बरा तर होऊं

दे. बाळ झुंझार, तूं आपल्या मनाला लावून घेऊं नकोस; पण एवढं मात्र लक्षांत ठेव कीं, हा नरजन्म केवळ स्वतांकरतांच लाभलेला नाहीं. हा जनता-जनार्दनाच्या कामीं विशेष लावला पाहिजे. म्हणून म्हणत्यें, करायचं काय— आपलं कर्तव्य काय— परमेश्वरानं हा जन्म तुला कां दिला याचा शांतपणं विचार कर. महाराष्ट्राकड नीट पहा आणि मग काय केलं पाहिजे तें ठरव. केवळ स्वामिनिष्ठा—स्वामिद्रोह याचाच विचार उराशीं बाळगूं नकोस. शिवबा, पंडितजी, झुंझारनं आजच जायची घाई करणं बरं नाहीं. त्याला शांतपणं विचार करूं दे.

**शिवाजीः**—ठीक आहे. पंडितजी, तुम्ही खानाला सर्व गोष्टी समजावून सांगा; आणि आमच्या म्हणण्याप्रमाणं खान तह करायला तयार असेल तर पातशाही सेनेची आणि भेटीची जागा मुकर करून तुम्हांला कळवूं. झुंझारराव, कांहीं दिवस विश्रांति घ्या आणि नीट बरें झाल्यावर तुम्हांला आदिलशाहींत जायचंच असेल तर खुशाल जा. ( शिवाजी तानाजी जातात )

**जिजाबाईः**—बाळ झुंझार, विचार करून संताप करून घेऊं नकोस शांत-पणानं रहा.

**झुंझाररावः**—आईसाहेब, आतां या झुंझारला कसली शांतता? मला दोन्हीं पक्ष गाढे वाटतात. स्वाभिमान, स्वकर्तव्य, स्वराज्यांला आपलेपणा आणि दगडाला देवकळेला पोंचवणारा आपला मातेचा उपदेश, मला स्वराज्यांत रहा असं सांगतो. दुसऱ्या बाजूनं माझी स्वामिभक्ति अंगिकृत कार्य पराङ्मुख न होण्याबद्दल बजावते; आईसाहब, काय करावं हेंच सुचत नाहीं. महाराज, तानाजीराव म्हणतात तसा मला जन्मभर कैदेंत ठेवा आणि माझ्या मनाच्या या यातना वांचवा.

**जिजाबाईः**—किती संताप करून घेशील!

**पंडितजीः**–अशा शिकवणुकीनं अटकेवर स्वराज्यतोरण बांधायला कितीसा वेळ लागेल?

---

**अंक तिसरा समाप्त.**

# अंक चौथा.

## प्रवेश पहिला.

( भुयार—यती वेषांत संताजी बसलेला आहे. )

**संताजी**:—चालता काळ असेपर्यंत काळसुद्धां फिक्का पडतो असं म्हणतात, त्याचा अनुभव मला प्रत्यहीं येतो आहे. धनीसाहेबांच्या खुनाबद्दलच्या सुडाच्या कारस्थानांत प्रत्येक वेळीं ताईसाहेबांकडून आत्मघातकीपणा होत गेल्यामुळं आज तीन वर्षं गुप्तपणं चालवलेलं कारस्थान चवाठ्यावर यायची पाळी आली. बरं झालं, ही घर सोडायला तरी तयार झाली. नाहींतर दोघां भावांप्रमाणं हीसुद्धां अंधार कोठडीची हवा खायला गेली असती. भोळा जीव! बायकांचं जात्या कोमल हृदय आणि परावलंबी स्वभाव केव्हांच दुसऱ्याच्या ताब्यांत जातो आणि शेवटीं गोत्यांत येतो. कुणाचा संसर्ग लागूं नये—मोहाची प्रत्येक वस्तु दृष्टीआड पडावी म्हणून या जंगलांत—या भुयारांतल्या भयाण एकांतांत तिला आणली आणि या जागेला हें असं भेसूर स्वरूप दिलं. या भेसूर जागेंत —काळ्या वातावरणांत भेसूर कृत्यांचे पाठ देऊन हा वेळपर्यंत माझं हें कारस्थान मी निर्वेध पार पाडीत आलों. आणखी आठ पंधरा दिवस असंच जपून वागलं कीं झालं काम. माझ्या कारस्थनांत बायकांचा हात नसल्यामुळं तें सिद्ध होण्याचीं चिन्हं दिसताहेत.

**मोहना**:—( कमळजेला घेऊन येते व तिचे डोळे सोडते. ) जय शंकर! बाई, ही पहा आमच्या गुरुजींची गुहा. गुरुदेव ब्रह्मज्ञानी आहेत. खोटं बोलाल—

**संताजी**:—बेटा! अरे काय केलंस हें! आम्हां योग्यांना पापी लोकांपासून दूर राहिलं पाहिजे; म्हणून आम्ही भूमातेच्या पोटांत असे एकांतांत बसतों. बेटा, ही स्त्री पाणिणी आहे. सारा भ्रष्टाकार, माझ्या तपश्चर्येचा सत्यानाश होणार. हां! पुढं आणूं नकोस. माझ्यावर हिची सावलीही पडतां कामा नये.

**कमळजा**:—गुरुदेव, साऱ्या जन्मांत देवभक्ति—देवप्रेम आणि देवमनन

याशिवाय ह्या जीवाला दुसरा ध्यासच नाहीं. आपण त्रिकालज्ञानी अहांत कुठं चुकत असेल तर सांगा आणि स्वर्गाचा मार्ग दाखवा. मी आपल्याला शरण आहे.

**संताजीः**—हां ! उत्तराला उत्तर देऊं नकोस. मला योगदृष्टीनं पाहूं देः तोपर्यंत हिला एकटीला एका दालनांत कोंडून ठेव. नंतर खात्री पटल्यास उपदेश देईन. पापी ठरेल तर माझ्या या स्थानाचा भ्रष्टाकार नाहींसा करण्याकरतां मला हिचा बळी द्यावा लागेल.

**मोहनाः**—ऐकलंस ! तरी मी सांगत होतों तुला कीं, माझ्याबरोबर येऊं नकोस म्हणून. वैराग्य घेऊन गळ्यांत माळा घालणं—अंगाला भस्म लावून भगवं होऊन भीक मागत फिरणं सोपं; पण असल्या गुरुजवळ सेवा करणं म्हणजे असिधारा व्रत आहे. जगांतलं पाप जाळण्याकरतां यांचा अवतार आहे.

**कमळजाः**--बुवा, मला कुठंहीं राहतां येईल. वैरागीण मी. परमेश्वर चिंतनांत काळ घालवायला भुयारांतला हा एकांतवासच योग्य आहे. मीसुद्धां जगाला कंटाळलें आहें. माझी कसोटी पहा, मला बळी द्या. मी ह्या पायांना मात्र सोडणार नाहीं.

**मोहनाः**—जा. त्या डाव्या बाजूच्या दालनांत बिऱ्हाड ठेवा. ( कमळजा जाते.) भोळा जीव दिसतो. गुरुदेव, हा जीव पापी नाहीं. ही निर्विकार मनाची स्त्री आहे.

**संताजीः**--(न्याहाळून) बेटा, तपस्सामर्थ्यानं पाहतां ही स्त्री या जन्मींची पापिणी नसली तरी मागील जन्मींचं पाप हिला असं भटकवतं आहे. ही माझ्या आज्ञेप्रमाणं वागेल तर पापमुक्त होईल. (जवळ जाऊन) ताईसाहेब, बतावणींत अंतर पडतां कामा नये, अझून विश्वास ठेवतां येत नाहीं. शिवाजीचे हेर जिवंत जाळले तरी मनाची समता सोडीत नाहींत. हिच्या या निर्विकार मनोवृत्तीवर फसतां नये. सारखं लक्ष ठेवलं पाहिजे. हिच्यावर जागता पहारा ठेवा जा. (मोहना जाते.) हिचा पाय भुयारांत खिळायला ही बेडी मिळाली हें ठीक झालं. ही बया शिवाजीचा हेर असो वा कुणी असो. आतां माझ्या मगरमिठींतून सुटत नाहीं. संशय येतांच पुरून टाकीन. आतां टेहेळणी करून यावं. (जातो.)

———

## प्रवेश दुसरा.

(निराशेनं बेभान झालेला मानाजी येतो.)

**मानाजीः**—माझं कारस्थान धुळीला मिळालं. ज्यांच्याकरतां मी एवढं जिवावरचं धाडस करायला तयार झालों; तें विजापूर सरकार—हा बेवकूब खान माझ्या शत्रूशीं तह करून कदाचित् माझा कडेलोट करील—अगर मला फांसावर लटकावील. शिवाजीबरोबर झुंझारला धुळीला मिळवायला गेलों तों माझीच धुळधाण होण्याची पाळी आली. काय करूं, कुठं जाऊं, कुठं लपून बसूं ! मोहनेच्या प्रेमाच्या सावलींत थारा मिळेल, म्हणून खानाच्या लोकांची नजरबंदी करून त्यांच्या पहाऱ्यांतून निसटलों; पण मोहना कुठं आहे ? ती जावळी सोडून कुठं गेली ? मोहनेला—जावळीकरांना देशोधडीला लावायला माझा मूर्खपणा तर कारण झाला नसेल ! मोहने, माझा मूर्खपणा तूं वारंवार दाखवलास; पण खानाच्या मर्जीच्या पोकळ धुंदींत मी तुझ्या उपदेशाचा धिःकार केला. तुम्हां सर्वांना देशोधडीला लावलं. माझा सत्यानाश करून घेतला. मी गुन्हेगाराप्रमाणं फांसावर लटकणार. मी फांसावर लटकणार, तो कां ? झुंझार-कमळजेचा छळ केला म्हणून ? झुंझार आदिलशाहीचा हितशत्रू—आदिलशाहीच्या हितशत्रूंनां जरब बसावी म्हणून त्याचा छळ केला; म्हणून माझी चौकशी करणार ! सरकारच्या न्यायीपणाच्या सत्यतेची साक्ष—इभ्रतीचं रक्षण करण्याकरतां माझा बळी—माझा कडेलोट—माझ्या मानेला फांस. आणि त्याला कारण ! तो कृष्णाजी—तो सावजी. अरेरे ! माझेच जातभाई; पण मी शत्रू कुणाचा ! शिवाजीचा—मराठ्यांचा ! मी कोण ! मराठा. माझा मीच आत्मघात करून घेतला. आत्मघात ! मग शत्रूकडून फांसावर लटकून कां ! तो माझा मलाच करतां येईल. बस्स ! आत्मघात ! सर्वतोपरी निराश झालेल्या जीवा—मनःसंतापानं तापलेल्या हृदया, तुला आशेच्या अमृतानं शांत करणं मला आतां अशक्य आहे. पश्चात्तापानं तुला आतां जास्त पिचत ठेवीत नाहीं. या जंबियाशीं संलग्न होऊन याच्या मगरमिठींत दबा धरून बैस; आणि आपल्या शत्रूचा सूड घेण्याकरतां तक्षकाप्रमाणं नव्या स्वरूपांत जन्म घे. ( जंबिया छातीवर रोखतो पण हात कांपूं लागतो.) नाहीं. नको हा भेसूर मृत्यू. माझं भेकड

मन—माझे हातपायसुद्धां माझ्यावर फिरले. माझं जीवित कवडीमोल झालं. माझी दिवाभितासारखी अवस्था व्हावी ऑ ! पण अज्ञातवास कदाचित् चांगले दिवस दाखवणार नाहीं कशावरून ? आतां लपून छपून मोहनेचा शोध करावा. अरे, हे आलेच माझ्या पाठीवर ! या सावजीनं तर माझा पिच्छाच पुरवला आहे. (पळतो. नेताजी व दाऊद येतात.)

**नेताजी**:—भाईसाहेब याला पकडलाच पाहिजे.

**दाऊद**:—कशाला ? त्याचं डोकं फिरल्यासारखं दिसतंय. मरेल कुठंतरी जीव देऊन.

**नेताजी**:—हें वेड नाहीं. हें भयंकर कृत्यांचं लक्षण आहे. मी त्याचा पाठलाग करणार.

**दाऊद**:—जाना देव. अरे, हा काय करतो ?

**नेताजी**:—तेंच पाहिलं पाहिजे. हा कसल्या तरी शोधांत आहे. पहा कसा टेहेळतो आहे तो. कदाचित् नाहींशा झालेल्या मोहनेच्या कारस्थानाचा याला सुगावा लागला असावा. मानाजीच्या मागं लागलं तर कसलं तरी कारस्थान उघडकीस येण्याचा संभव आहे.

**दाऊद**:—जाऊं दे रे.

**नेताजी**:—भाईसाहेब, माझं ऐका. याला पकडतां आलं तर आपलाच पराक्रम वाढेल. चला.

**दाऊद**:—बरं बुवा. पराक्रमाकरतां म्हणून येतों. चला. (जातात.)

---

## प्रवेश तिसरा.

(सभामंडपाकडील रस्ता—खान व पंडित येतात.)

**अफझुलखान**:—पंडितजी, शिवाजी एवढा राजनिष्ठ असेल असं मला वाटलं नव्हतं. मी ठरवलं आहे कीं, त्यालाच महाराष्ट्राचा सुभेदार करावा. त्यानं काबीज केलेले सारे किल्ले व मुलूख, जहागिरी म्हणून आदिलशाहीनं त्याला बहाल करावा.

**पंडितजी**:—(स्वगत) आतां हें मानभावी बोलणं महाराष्ट्रांतलं पोरसुद्धां ओळखील; पण आपण तरी कशाला लुडबुडा. मृत्यूच्या दारीं आलेला कृपणाचा अर्कसुद्धां औदार्याच्या गोष्टी बोलूं लागतो. असलीं फोल आश्वासनं ऐकण्यापेक्षां विषयच बदलावा हें बरं.

**अफझुलखान**:—कां ? विचारांतसे पडलांत ? शिवाजीच्या सच्चेपणाबद्दल आतां माझी खात्री पटली.

**पंडितजी**:—तशीच आमच्या फितुरीचीही फिटली असेलच. खानसाहेब, या परिस्थितींत काय बोलावं हेंच सुचत नाहीं. आम्ही सरकारची सेवा इमानानं बजावण्याकरतां रक्ताचं पाणी करतों; पण आपण त्याचा विपर्यास करतां. सांप्रत आम्हीं राजनिष्ठ जगांत त्रिशंकूसारखं मध्येंच लोंबकळत आहों.

**अफझुलखान**:—नाहीं. मराठ्यांच्या राजनिष्ठेची कसोटी शिवाजीच्या राजनिष्ठेनं लावली आहे. पंडितजी, झुंझाररावाबद्दल मला फार वाईट वाटतं. खरा स्वामिभक्त ! शाबास ! आमच्या दरबारांत असलीं माणसं आहेत म्हणून आम्हीं कुणाचीच कदर करीत नाहीं. झालं तें होऊन गेलं; त्याचा मी पूर्ण बंदोबस्त केला आहे. मानाजीला स्वस्थ बसवला. अत्याचारी जावळीकरही परागंदा झाले. या मोहिमेचा निकाल सलोख्यानं पार पडला कीं, साऱ्या गुन्हे-गारांची चौकशी करायला आपल्याला अवसर मिळेल. पंडितजी, आपल्या निष्ठेबद्दल संशय उत्पन्न केला गेला ही गोष्ट खरोखरच गैर झाली. वेळींच त्याचा स्फोट झाला हें बरं झालं.

**पंडितजी**:—पण त्याचा परिणाम काय झाला ! शिवाजीची बाजू तितकी बळकट झाली. आपली लंगडी बाजू छपवण्याकरतां तहांत कांहीं कलमं सैल सोडावीं लागतील. शिवाजी साऱ्या अत्याचारांचा दोष आदिलशाहीच्या माथीं मारील.

**अफझुलखान**:—पण शिवाजीशीं सख्य केल्यावर तोही या गोष्टी विसरेल. तो आदिलशाहीचा बंदा होईल असाच मी तह करीन. शिवाजीसारखा स्नेही आज आदिलशाहीचं केवढं कार्य करील ! दक्षिण सुरक्षित होईल; आणि मोंगलांच्या डोळ्यांत झणझणीत अंजन पडून तेही आमचा पिच्छा सोडतील.

**पंडितजी**:—हें सारं ठीक आहे; पण या गोष्टी दरबारला पटतील तव्हांना ?

**अफझुलखान**:—या गोष्टी मला पटल्या आहेत. त्या दरबारला पटवून

देण्याची मी खटपट करीन. आतां शिवाजीची भेट झाली म्हणजे मी कसा वागतों तें पहा. पंडितजी, अधिकाऱ्यांकडून हुकमाच्या अंमलबजावणींत परिस्थितीच्या मानानं केव्हां केव्हां अतिक्रम होत असतो; पण तो परिस्थितीचा दोष आहे. हें शिवाजीलासुद्धां कबूल करावं लागेल. मागील गोष्टी विसरून सलोखा वाढवण्याचा आज सर्वांनीं उपक्रम केला पाहिजे.

**पंडितजी**:—(स्वगत) कसं काळकूट लपवतो आहे; पण दिव्य दृष्टीच्या शिवबाराजापुढं तें लपणं अशक्य आहे.

**अफझुलखान**:—पंडितजी, शिवाजीनं आमच्या स्वागताची तयारी मोठ्या इतमामाची चालवली आहे. हा रस्ता किती चोख केला आहे. यावरून त्याच्या मनांत कपट नाहीं हें स्पष्टच दिसतं. शाबास !

**पंडितजी**:—(स्वगत) पण तुझं कपट मला स्पष्ट दिसतं आहे. (उघड) हो, कां नाहीं करणार ? शिवाजीला हें सारं करणं भागच आहे. शिवाजीचं हें करणं कपट दाखवीत नाहीं; पण कपट दिसल्यास ही तयारीच आपल्याला खाईल.

**अफझुलखान**:—पंडितजी, तुम्ही फारच संशयी दिसतां मी सांगतोंना कीं, माझ्या मनांत कपट नाहीं.

**पंडितजी**:—पण आमच्या हृदयांत संशयाचं बीज पेरणारे आपणच.

**अफझुलखान**:-जाऊं द्या; पण झुंझाररावाच्या कुटुंबाचा तपास लागला का ?

**पंडितजी**:—नाहीं. झुंझाररावाला शिवाजीच्या लोकांनीं नेल्यावर ती एका वैराग्याला भेटली होती. त्यानं शिवाजीकड जाण्याबद्दल तिची पुष्कळ समजूत केली; पण शत्रूकड जाण्याचा तिनं इनकार केला व ती अरण्यांत शिरली.

**अफझुलखान**:—शाबास ! अशी स्वामिभक्ति असावी. पंडितजी, तिच्या शोधाकरतां आजच्या आज चारी दिशेला विश्वासाचीं माणसं पाठवा.

**पंडितजी**:—(स्वगत) अशी स्वामिभक्ति असावी, आणि तुम्हीं ती मातींत मिळवावी.

**अफझुलखान**:—चला आतां सभामंडपाची पाहणी करूं. (जातात.)

———

# प्रवेश चौथा.

( अरण्य–बैरागी वेषांत झुंझारराव येतो. )

**झुंझारराव**:--स्वराज्य-शिवबा राजाचं स्वराज्य-मराठ्यांचं स्वराज्य ! अहाहा ! किती मधूर कल्पना--किती सुखासमाधानाचं जीवन ! पराक्रमाला व उद्योगाला स्वैर वावरायला केवढं अफाट क्षेत्र ! यःकश्चित् हेरापासून प्रत्यक्ष शिवबाराजांपर्यंत आपलेपणाची कोण अहमहमिका ! प्रत्येकाला महाराष्ट्राचा राजा आपण–कर्ता पुरुष आपण, असं वाटूं लागतं. या आपलेपणाच्या स्वयंस्फूर्तींत महाराष्ट्रांतील प्रत्येक जीव देहभान विसरून शत्रूच्या अंतरंगांत स्वैर संचार करूं लागतो. शत्रूचं मर्मस्थान गांठून एकादा साधा माणूससुद्धां मी मी म्हणणारांना चीत करतो. नेताजी यःकश्चित् हेर; पण या मोहिमेचा सूत्रधार झाला आहे. त्यानं आदिलशाहीच्या अत्याचाराचं माप खानाच्या पदरांत कसं तंतोतंत घातलं. स्वतः शिवबा राजे माणसाचं अंतःकरण कसं तेव्हांच ओळखतात. अहाहा ! धन्य शिवबा राजे ! धन्य महाराष्ट्र ! धन्य मराठी स्वराज्य ! माझा पतित आत्मासुद्धां आपल्या दर्शनानं—संगतीनं पुनीत होईल; इतकंच नव्हे तर मी स्वतःलाच विसरून गेलों आहें. मी कोण, कुठं जातों, याचंही भान नाहींसं झालं. हा प्रदेश संपेपर्यंत मी असाच बरळत राहणार का ? मी आदिलशाहीचा नोकर; पण शिवबाचा मराठा--स्वराज्यासाठीं तळमळणाऱ्या मराठ्यांचा भाइबंद. माझी देशभक्ति, नाहीं माझी स्वामिभक्ति मावळत चालली का ! वनदेवते, तूं तरी मला यावेळीं हात दे; माझा अधःपात होऊं देऊं नकोस.

**कमळजा**:—(प्रवेश करून) पश्चात्तापानं शुद्ध झालेल्या जीवाचा अधःपात परमेश्वर कधींच होऊं देत नाहीं. अधःपातासनिध ठेपलेल्या अभागी जीवाला पश्चात्ताप हीच एक शुद्धि. माया मोहांत फसलेल्या जीवांनां आत्मवृत्तीच्या मार्गानं परमेश्वरी हेतूंची जाणीव करून देणारा एक पश्चात्ताप. कोण आपण ? मायामोहाला पळवून लावणाऱ्या या भगव्या वेषांत असा मनःक्षोभ !

**झुंझारराव**:—अहाहा ! अमृताचा वर्षाव करणारी वनदेवता माझ्या गृहलक्ष्मीच्या रूपानं माझ्या मदतीला धांवून आली. अहाहा ! लाडके कमळजे. ( मिठी मारायला जातो; पण कमळजा झिडकारते.)

**कमळजा:**—हां! हां! महाराज, आपल्या वेषाकड पहा. या वेषाला असलं वर्तन शोभणार नाहीं. महाराज, मी व्रतस्थ आहें. मी आज जगाला विसरून माझं मन फक्त एकाच गोष्टीकड—एका पुण्य कार्याकड लावलं आहे. तें कार्य पार पडून मला यश मिळेपर्यंत मी झुंझाररावांची लाडकी कमळजा नाहीं. मी स्वतःची—या देहाची नाहीं—मी त्या पुण्य कार्याची आहें. महाराज, आपण या वेषांत कां? हा वेष केवळ पुण्य संपादन करण्याकरतां—अधःपात टाळण्याकरतां असतो. सांगा हा वेष कशाकरतां आहे?

**झुंझारराव:**—हा वेष पुण्य कार्यासाठीं—अधःपात टाळण्यासाठीं खास आहे. माझ्या कीर्तीला फितुरीचं काळं फांसणाऱ्याचं काळं केल्याशिवाय—त्या अधमाधमाला नाहींसा केल्याशिवाय मी स्वस्थ कसा बसूं? आदिलशाहींत स्वामिभक्त म्हणून तोंड कसं दाखवूं? मानाजीला गांठून त्याचा नायनाट करणार आणि मग खानाकड जाणार.

**कमळजा:**—मग आपल्या या शत्रूला शिवाजी महाराजांनीं मोकळा कसा सोडला? का कैदेतून—

**झुंझारराव:**—नाहीं. इतका अधम मी झालों नाहीं. मी शिवाजी महाराजांचा कैदी नसल्यामुळं मला त्यांनीं सोडलं. कमळजे, शिवाजी राजांच्या मदतीशिवाय आज मी वांचलों नसतों; आणि माझी अब्रू साफ करण्याची मला संधीही मिळाली नसती.

**कमळजा:**—पण त्या उपकाराची फेड त्यांच्या शत्रूला मदत करून—त्यांच्या शत्रूची नोकरी करून—स्वामिभक्तीवर उपकार कर्त्याच्या रक्ताचा अभिषेक करूनच करणार ना?

**झुंझारराव:**—कमळजे, स्वजातियांशीं विरोध केल्यामुळं मला स्वजनांचा कठोर निषेध सहन करण्याचा कटु अनुभव प्रत्यक्ष मिळाला आहे. आजन्म कैदखान्यांतील भयंकर यमयातना या निषेधापेक्षां किती तरी सौम्य ठरतील. पण माझ्या बाण्याकरतां—एक वेळ पत्करलेल्या स्वामिसेवेकरतां—

**कमळजा:**—पण तिचं फळ काय मिळतंय? फितुरीचा शिक्काचना? आपल्या स्वामिभक्तीचं जिथं चीज नाहीं, ज्या सेवेचं बक्षिस बेअब्रू आणि जुलूम ती सेवा कां करायची? महाराज, मला क्षमा करा. मी आपल्याशीं तुटक वागतें

पण त्याला कारण परिस्थिति. शिवाजी महाराजांच्या—स्वजनांच्या उपकाराच्या ऋणांतून मोकळं होण्याकरतां कांहीं काळ मला हे पाय दूर सारावे लागत आहेत. ( पाय धरते. )

**झुंझारराव**:—हें काय ? देवते ! या परिस्थितीच्या गुलामाचे पाय कशाला धरतेस ? कमळ, तूं कुठं जातेस ? मी येऊं का मदतीला ? (तिला उठवतो.)

**कमळजा**:—नको. महाराज, माझं कार्य मला एकटीलाच केलं पाहिजे. मदत माझीच रक्षा करील. नाथ, माझ्या व्रताचा स्फोट मला आजच करतां येत नाहीं. मात्र एवढंच सांगतें कीं, याच जंगलांत आसपास असायचं, कुठं अत्याचार दिसल्यास मदतीला धांवून यायचं; तिथंच आपला शत्रूही गांठतां येईल. नाथ, जातें मी आतां. (कमळजा जाते, मागून झुंझार जाऊं लागतो.)

**झुंझारराव**:—कमळ, केवढा फरक झाला हा तुझ्या वृत्तींत !

**कमळजा**:—नाथ, असे विस्मित होऊं नका. महाराष्ट्रांत एवढा फरक घडवून आणणाऱ्या व्यक्तीच्या पुण्यपावन दर्शनानं शुद्धांतःकरणांत फरक झाल्यावांचून कसा राहील ? नाथ, माझ्यामागून येऊन जगाला धोक्यांत टाकूं नका. जा, जा. दुसऱ्या कुठं तरी जा. (जाते.)

**झुंझारराव**:—दुसऱ्या कुठं तरी जा ! गृहलक्ष्मीनं झिडकारल्यावर दुसरा कुठं आधार ! अरण्य—जंगल. अरेरे ! गुलामगिरी—दास्यवृत्ती, केवढं पाप हें. झिडकार ! धिःकार ! जिथं तिथं छीः थू ! शिवाजी महाराजांच्या पुण्यपावन दर्शनानं शुद्धांतःकरणांत एवढा फरक झाला, मग माझ्यांत तो कां होऊं नये ? दास्यवृत्तींत अंतःकरणाचा शुद्धपणा नष्ट होतो काय ? असंच कमळजा म्हणाली. माझ्या मागून येऊन जगाला धोक्यांत टाकूं नका. अत्याचार तिथंच मानाजी, का अत्याचार हाच माझा शत्रू ? बस्स ! हिच्या सूचनेप्रमाणं या अरण्यांत दबा धरून माझा शत्रू गांठतों; आणि मग पुढचा विचार. (जातो.)

———

## प्रवेश पांचवा.

(प्रतापगड–भवानीचं मंदीर—एका बाजूला मंत्री तानाजी, वगैरे–दुसऱ्या बाजूला जिजाबाई, कृष्णाजी भास्कर वगैरे.)

**जिजाबाई:**—पंडितजी, आजपर्यंत मराठ्यांच्या हातून--माझ्या शिवबाच्या हातून कोणत्याही महंमदीय सरकारचं नुकसान झालं असेल तर तें केवळ राष्ट्र-कल्याणाकरतां, गोब्राह्मणांच्या–हिंदुधर्माच्या रक्षणाकरतां मनुष्यमात्राला–जीव मात्राला आपलेपणा राखतां यावा, म्हणून झालं आहे. पंडितजी, यांत मराठे कुठं चुकताहेत का? मराठे खऱ्या क्षात्रधर्माला जागतात हें आपल्याला दिसतंच आहे. मग सांगा, मराठी स्वराज्याचा–त्याच्या उत्पादकाचा–माझ्या महाराष्ट्राचा—शिवबाचा घात व्हावा असं आपल्याला वाटतं का?

**पंडितजी:**—आईसाहेब, असं कसं बरं आम्हांला वाटेल? शिवाजी महाराज आमच्याचकरतां झगडताहेत ना? त्यांचा घात आम्हीं कसा बरं चिंतणार.

**जिजाबाई:**—पण तुमचा खान तो करूं पाहतो ना! पंडितजी, आपण आम्हांला देवाप्रमाणं पूज्य अहात. जगदंबेच्या पायांवर हात मारून खानाचा खरा खरा मनोदय आम्हांला सांगा.

**शिवाजी:**—(प्रवेश करून) आईसाहेब, पंडितजींनां संकटांत घालूं नका. गुलामगिरीला मान वांकवल्यामुळं त्यांना आज आपल्या शब्दाला मान देतां येणं शक्य नाहीं. आज ते तटस्थ राहूं पाहतात तसेच त्यांना राहूं देणं बरं. आई-साहेब, आपला मार्ग आणि कारभार कष्टाचा आणि स्वावलंबनाचा आहे. तो आम्हीं जाणून बुजून स्वीकारल्यामुळं हजारों जीवांच्या पुण्याईचं–श्रीसमर्थांच्या आशिर्वादाचं आणि भवानीच्या कृपेचं अभेद्य कवच आम्हांला लाभलं आहे. त्याच्या बळावर आम्हीं काळावर झडप घालूं—अग्नीच्या जळत्या खाईत सुखानं राहूं. आईसाहेब, या पंडितजींनीं खरं खरं सांगितलं, खानाचं कपट आम्हांला कळलं तरी आम्ही माघार थोडीच घेणार आहों. स्वराज्याकरतां प्रत्येक परिस्थितीला आम्हांला तोंड दिलंच पाहिजे; आणि आम्हीं तें देणार. आईसाहेब, मला मायदेशाच्या पायांवर घालून सर्व महाराष्ट्राच्या मातृपदाचा आपण स्वीकार केला आहे. आपली पुण्याई—आपली शिकवणूक महाराष्ट्रांतील

प्रत्येक मनुष्यांत शिवाजी निर्माण करील—सर्व महाराष्ट्र शिवाजीमय करील. मग हा एक शिवाजी स्वदेशाकरतां—स्वधर्माकरतां—हजारों लोकांच्या जीवाकरतां खानाच्या कपटाला बळी पडला तर काय होणार आहे? माझं रक्त महाराष्ट्र भूमींत मिसळलं तर ही महाराष्ट्र भूमाता महाराष्ट्राच्या शत्रूंना खाऊन टाकील. माझी प्राणज्योत महाराष्ट्राच्या वातावरणांत मिळून महाराष्ट्राचं वातावरण सवाई शिवाजीमय करील. मी एकटा बळी पडलों तरी दुःख करण्याची जरूर नाहीं.

**जिजाबाई**:—(स्फुंदून) बाळ शिवबा, या असल्या अभद्र बोलण्यानं माझं—साऱ्या महाराष्ट्राचं हृदय भडभडून त्याला पीळ पडतो आहे. बाळ शिवबा, तूं असलं जीवावरचं धाडस करून महाराष्ट्राला—

**शिवाजी**:—माझ्या महाराष्ट्राच्या जीवावरील संकट निवारण्याकरतां मला हें जीवावरचं धाडस केलंच पाहिजे. आईसाहेब. हृदयाला पीळ पडल्याशिवाय जनतेच्या दुःखाची—मनाच्या जाचणीची कल्पनाच होणार नाहीं. महाराष्ट्राचं हृदय पिळवटल्याशिवाय महाराष्ट्राची मुक्तता होणंच शक्य नाहीं. माझ्या नुसत्या मरणानं ती होत असेल तर मी आनंदानं मरायला तयार आहें. आईसाहेब, स्वराज्याच्या संपादणीकरतां आजपर्यंत हजारों जीवांनीं रणयज्ञांत आत्माहुती दिल्यामुळं स्वदेश सेवेची दिव्यस्फूर्ति महाराष्ट्रांत स्वैरसंचार करते आहे. आज माझ्या आहुतीनं कदाचित् तिला जास्त जोम येईल.

**जिजाबाई**:-शिवबा, अरे माझं मन का पहातोस तू हें? बाळ प्रसंगीं धीराचा जीवसुद्धां घोंटाळतो; पण तो कार्य पराङ्मुख होत नाहीं. शिवबा, मी तुला मायदेशाच्या—हिंदुधर्माच्या—जनताजनार्दनाच्या चरणीं वाहिला आहे. तूं कार्य पराङ्मुख व्हावेंस, मायदेशाच्या आणीबाणीच्या वेळीं तूं माघार घ्यावींस असं मला कसं वाटेल? तूं प्रत्येक संकटांत उडी टाकून मायदेशाला, हिंदुधर्माला उज्वल करावेंस असंच मला वाटतं. पण आजचा प्रसंग निराळा आहे. आजचा प्रसंग कपटाचा आहे. या कपटजालांत माझा सिंह अडकला जातां कामा नये. बाळ, स्वराज्याची घडी बसायला आज तुझी फार जरूर आहे; म्हणून म्हणतें आजच कांहीं बरं वाईट झालं तर—

**शिवाजी**:—तर काय? या बऱ्या वाईटांतूनच महाराष्ट्रांत दिव्य तेजाचा संचार सर्व हृदयांत होईल. आईसाहेब, आपल्या आणि समर्थांच्या शिकवणुकी-

प्रमाणें मी आजपर्यंत महाराष्ट्रांत जागृतीची चळवळ केली. आतां माझा महाराष्ट्र जागा झाला आहे. या मोहिमेंत यश संपादून या प्रतागडावर स्वराज्य-तोरण उभारायचं आणि स्वराज्याच्या इमारतीला सुरुवात करायची. त्या कार्याला माझे मराठे लायक आहेतच. अडचणीच्या प्रसंगीं योग्य सल्ला द्यायला आपण आणि महाराष्ट्राचे राजगुरु समर्थ आहेत. या प्रसंगीं आत्महवन आत्मसमर्पण करून राष्ट्र राखलं पाहिजे.

**तानाजी**:—आईसाहेब, महाराष्ट्रा! तूं निर्धास्त रहा. या तानाजीच्या देहांत जीव असेपर्यंत महाराजांच्या केंसालाही धक्का लागणार नाहीं. खानाचं कपट दिसल्यास मी एकटा आपल्या शरिराची ढाल करून महाराजांना सुरक्षित आणून तुमच्या स्वाधीन करीन. मी तमाम महाराष्ट्राला ग्वाही देतों कीं, या मोहिमेंत आम्ही विजय मिळवणार. शत्रूचं कपट मातींत मिळवून या प्रताप-गडावर हिंदुपत पातशाहीचं प्रतापशाली स्वराज्य-तोरण आम्हीं बांधणार. आई-साहेब, शांत मनानं आम्हांला आशिर्वाद द्या.

**पंडितजी**:—(स्वगत) हा देखावा पाहून प्रत्यक्ष खानसुद्धां आपलं कपट ओकला असता. खानाचं कपट माझ्या अगदीं गळ्यापर्यंत आलं आहे. करुण-रसाचे आणखी एकदोनच वळसे तें ओकायला लावील. (उघड) राजे, आतां निघायची वेळ झाली. खान मंडपांत येऊन आपली वाट पहात बसले असतील.


**शिवाजी**:—आमची तयारी आहे. भवानीनं कौल दिला कीं, आम्हीं निघाल्याची प्रस्थानची तोफ होईल. काय हो पंडितजी, खान आमच्या व्यवस्थे-वर खुष झाले आहेत असं ऐकतों. या खुषींत ते काय करतील आणि काय करणार नाहींत तें तुम्हांला सांगतां येणार नाहींच. बाकी या मोहिमेंतील कपटी कारस्थानाच्या दर्यांत हें खुषीचं होडकं बरेच हलकावे खात असलं पाहिजे. याची साक्ष आपलं हेलकावे खात असलेलं मन इथंच देत आहे. कारस्थानाचा विषारी लोंढा तुमच्या कंठांत घुटमळतो आहे.

**पंडितजी**:—शिवबाराजे, आपल्यापुढं—परहृदय जाणणाऱ्या दैवी शक्ती-पुढं कपट टिकाव कसं धरील? खानाला पाहतांच खानाचे मनतरंग आपण तेव्हांच ओळखाल, ही माझी खात्री आहे. मग माझ्या तोंडून तें ओकवण्यांत काय अर्थ आहे? आजपर्यंत मला आपली ही चळवळ आणि कार्य पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणं क्षणभंगूर आहे; मोंगल अगर आदिलशाही नुसत्या फुंकरानं ती

जागच्या जागीं गारद करील असं वाटलं होतं; पण आतां माझी खात्री झाली आहे कीं, कपट—कारस्थान अगर अफाट सेना यांना महाराष्ट्र दाद देणार नाहीं. स्वराज्य-वृक्षाला हात लावायची कुणाचीच प्राज्ञा नाहीं. कृपा करा आणि माझ्या तोंडून जास्त वदवूं नका.

**तानाजीः**—कां वदवूं नका? पंडितजी, आपण मराठे अहांत, इतकंच नव्हे तर मराठ्यांत श्रेष्ठ अहांत, मराठ्यांची अब्रू, धर्म आणि स्वराज्य यांचं रक्षण करणं हें आपलं कर्तव्य आहे. तें तुम्हीं करायचं टाळूं लागलांत तर ते तुम्हांला करायला भाग पाडणं हा आमचा—सर्व मराठ्यांचा हक्क आहे. पंडितजी, आजपर्यंत शत्रुसेवा करून आत्मद्रोह जोडलांत आणि पापाचे डोंगर डोक्यावर वाहलेत. आज त्या पापांचं क्षालन करायची ही महापर्वणी आहे. आतां खानाचं कपट ओकलांत तर मागचं किल्मिष जाऊन महाराष्ट्रगंगेच्या धन्यवादाच्या प्रवाहांत शुद्ध व्हाल. मराठी स्वराज्याला जाळूं पाहणारं खानाच्या मनांतील कालकूट आम्हीं इथून पार करायचा प्रयत्न करूं.

**शिवाजीः**—तानाजी थांब, पंडितजींना संकटांत पाडण्याची जरूर नाहीं. मीच सांगतों, पंडितजींच्या या चर्येवरून त्यांच्या अंतःकरणाची ओळख तुम्हां सर्वांना पटलीच आहे. यांची ही चर्या खान कपट करणार याची साक्ष देत आहे. कांहीं हरकत नाहीं. ही वेळ महाराष्ट्राच्या कसोटीची आहे. यावेळीं महाराष्ट्रानं स्वराज्याकरतां सर्वस्वाची होळी करायला तयार असलं पाहिजे. यावेळीं एक स्वराज्य—नाहीतर देवाकरतां—धर्माकरतां रणयज्ञांत आत्मसमर्पण, हेंच महाराष्ट्राला इष्ट आहे. आईसाहेब, स्वराज्याचा श्रीगणेशा आम्हांला घालून देऊन स्वराज्याकरतां—महाराष्ट्राकरतां—स्वधर्माकरतां गणगोत पतित्याग करून महाराष्ट्राला स्वार्थत्यागाचा धडा शिकवलात. आपल्या स्वार्थत्यागाला अनुसरून माझ्या महाराष्ट्रांतल्या बंधुभगिनींनी स्वराज्यांत तन्मय होऊन सर्वस्वाचा यज्ञ केला आहे. सहस्रावधि पतिव्रतांनीं महाराष्ट्राकरतां आपल्या सौभाग्याची रणयज्ञांत आहुति देऊन महाराष्ट्राचं सौभाग्य राखलं आहे. प्रेमळ आर्यमातांनीं आपलीं अपत्यं बळी देऊन महाराष्ट्र देवतेला सुखी केलं; आणि स्वराज्य हेंच आपलं अपत्य—हाच आपला मुलगा असं मानून महाराष्ट्राला महाराष्ट्रीयत्व दिलं. आणि आमच्या शत्रूंनां हतवीर्य करून त्यांना कपटाच्या भिकार मार्गाचा अवलंब करणं भाग पडलं. आईसाहेब, महाराष्ट्राला स्वराज्याचं




शिवाजी:—महाराष्ट्र सावध आहे; तो कधींच गैरसावध राहणार नाहीं. (पान ९५)

बाळकडू पाजणाऱ्या महाराष्ट्र माते, आज आपल्या कसोटीची वेळ आली आहे. आजच्या आपल्या पुत्रयज्ञांत शत्रूचं कपट जळून महाराष्ट्राच्या शत्रूहृदयांत सामदामाच्या सात्विक मनोवृत्तींचा उदय होऊन महाराष्ट्राचं स्वराज्य उज्वल होणार आहे. यांवेळीं आपण अपत्यस्नेहाच्या लोभाला बळी पडलांत तर आजपर्यंतची पुण्याई संपून सारा महाराष्ट्र संपुष्टांत येईल. आपली राजतपश्चर्या भंग पावून त्या पापाच्या डोंबांत सारा महाराष्ट्र जळून जाईल. सांगा, आईसाहेब, यावेळीं मी कसा वागूं तें सांगा. (शिवाजी पाय धरतो. जिजाबाई त्याला उठवते.)

**जिजाबाई**:—अहाहा! बाळ शिवबा, अरे मी माघार घेईन असं का तुला वाटतं? या तेजाचा माझ्या उदरांत उदय झाला तेव्हांपासूनच मला स्वराज्याची तळमळ लागली आहे. बाळ, महाराष्ट्राच्या स्वार्थत्यागाची—आत्मत्यागाची मला पूर्ण जाणीव आहे. आणि मी तरी अशी हिणकस कशी होईन; पण शिवबा, मातेचं स्वाभाविक अपत्यप्रेम कोणत्याही मातेला असं तीन पावलं मागं जायला लावील; सत्वाकरतां सत्वशील माता कसलीही आहुति द्यायला माघार घेणार नाहीं. बाळ, तुझ्यावर आतां माझा हक्कच नाहीं. महाराष्ट्र-जनता हीच तुझी माता. तिनं आज्ञा दिली तर तूं खुशाल जा. माझा तुला आशिर्वाद आहे. शिवबा, पहा, या महाराष्ट्र जनतेकडे पहा. आजपर्यंत स्वार्थत्याग—आत्मत्याग यांत निर्ढावलेली महाराष्ट्र-जनता आज अधोमुख आहे; यावरून मी काय समजूं? बाळ, मी दिङ्मूढ झाल्यें, यांत नवल काय?

**पंडितजी**:—नाहीं, आतां आपल्याला धीर निघत नाहीं. ऐक! महाराष्ट्रा, ऐक! खान कपटाचा अवलंब करून, तुझ्या प्राणाचा अपहार करायला टपला आहे, सावध रहा! (शिवाजीचे पाय धरतो. शिवाजी त्याला उठवतो.)

**शिवाजी**:—महाराष्ट्र सावध आहे; तो कधींच गैरसावध राहणार नाहीं. पण हें काय? पंडितजी, माझे पाय धरून मला पापांत टाकूं नका. मीच तुमचे पाय धरले पाहिजेत. सर्व सरदार आणि मंत्री हो, असे दिङ्मूढ होऊं नका. स्वराज्याची उभारणी तुमच्या जिवावर आहे. मी निमित्तमात्र आहें. या संकटांत खानाच्या भेटींत कांहीं बरं वाईट झालं तर ठरल्याप्रमाणं स्वराज्याची व्यवस्था करा. आईसाहेब व श्रीसमर्थ तुम्हांला माझ्या जागीं आहेतच. डगमगून आपलं ध्येय सोडूं नका. सर्वांनीं सज्ज असा. खानाची सेना अफाट आहे; पण महाराष्ट्राच्या—या जावळीच्या अभेद्य भूप्रदेशाच्या मदतीनं आत्मबचावाला आपली

गेना पुरेशी आहे. आईसाहेब, मानवी वाचा मुग्धता धरते तेव्हां देवतेच्या कौलावरच अवलंबून रहावं लागतं. आतां सर्वांनीं भवानी मातेची प्रार्थना करून तिचा कौल मागूं. ( ध्यान धरून ) माते, आजपर्यंत तुझ्या प्रेरणेप्रमाणं आम्हीं वागलों त्यांत आम्हांला यशच आलं. माझ्यावरील प्रेमानं आणि श्रद्धेनं दिङ्मूढ झाल्यामुळं तुझी प्रेरणा ग्रहण करण्याच्या स्थितीत आज महाराष्ट्र नाहीं. खानानं कपटाचा अवलंब केल्यामुळं मानवी मनावर स्नेहभावाचं वर्चस्व वाढून आज सारा महाराष्ट्र पेंचांत आहे. माते, हा पेंच दूर करून आम्हीं या प्रसंगीं कसं वागावं हें सांगून कौल दे. ( सर्व प्रार्थना करतात. देवीच्या गळ्यांतील हार सरळ होऊन त्याचं तोरण होतं. पुजारी शिंग वाजवतो. सर्व उठतात.) अहाहा ! देवीनं तोरण बांधलं. ( तोफ होते. )

**तानाजी**:—देवीनं तोरण बांधलं ! देवीनं स्वराज्य तोरण बांधलं. हरहर महादेव !

---

**अंक चवथा समाप्त.**

# अंक पांचवा.

## प्रवेश पहिला.

( सभामंडप—अफझुलखान बसलेला आहे. )

**अफझुलखानः**—आजचा भाग्यशाली दिवस आदिलशाहीच्या इतिहासांत सोन्याच्या अक्षरांनीं लिहिला जाईल. आजच्या सोन्याच्या दिवसाचा, सर्व जगाला आपल्या सुवर्ण किरणांनीं दिपवणारा भाग्यशाली रवि, हा अफझुलखान. आजपर्यंत महंमदीय इतिहासांत पुष्कळ मुत्सद्दी आणि योद्धे नमूद केले गेले असतील; माझ्यासारखं भाग्य कुणाच्याच नशिबीं आलं नसेल. हा अफझुलखान, आज असा भाग्यशाली ठरून आदिलशाहीला राज्यलयाच्या भीतीपासून सोडवणारा—तमाम आदिलशाहीचा त्राता आपल्या मुत्सद्देगिरीच्या बळावर आपल्या अजिंक्य शत्रूला नामशेष करणारा ठरेल, असं भाकीत चार दोन महिन्यापूर्वी कुणी केलं असतं, तर तें कुणालाही खरं वाटलं नसतं; फार काय मला स्वतांलाच तें खोटं आणि अशक्य वाटलं असतं. काय आजचा दिवस ! आणि आठ दहा दिवसांनंतर विजापुरांत उगवणारा माझ्या सन्मानाचा दिवस यांचं वर्णन कोण करूं शकेल ? वहावा ! पण शिवाजी अजून कसा येत नाहीं ? तोफ होऊन किती तरी वेळ झाला. शिवाजी महामुत्सद्दी असा मी त्याचा लौकिक ऐकत होतों; मग हा असा यायला तयार कसा झाला ? पंडितजींनीं त्याला झुलवला खास. त्याला केव्हां पाहीन असं मला झालं आहे. तो येथपर्यंत तर येऊं दे. मीहीं त्याला असा झुलवतों कीं, तो स्वखुशीनं आमच्याबरोबर विजापुरास आला पाहिजे. आणि तो न वळेल तर ! तर काय ! शिवाजीला मी नुसता बगलेंत चिरडून टाकीन. शिवाजी वस्ताद तर खराच. सैतानानं आम्हांला कसं पेंचांत टाकलं आहे, पण या पेंचाला मी थोडीच भीक घालतों शिवाजीचीं हाडं मी एकट्यानं पिचून टाकलीं कीं, हा पेंच सुटला. बस्स ! तो एकदांचा समोर आला पाहिजे. भेट झाली कीं त्याला असा दमांत ठेवतों कीं, त्यानं आजपर्यंत केलेल्या पुंडाईबद्दल माझी क्षमाच मागितली पाहिजे. पण हा अझून कसा येत नाहीं ? पंडितजीसुद्धां कसे आले नाहींत ? ते त्याला फितूर तर नाहीं झाले !

**पंडितजी**:—हा पहा फितूर वेळींच हजर आहे. खानसाहेब, शिवाजी आला. सांभाळून वागा. जरा मनाची चलबिचल दिसल्यास शिवाजी आपला मनोदय तेव्हांच ओळखील. हें माझं फितुराचं सांगणं आहे, पटल्यास माना.

**अफझुलखान**:—पंडितजी, आतां पहा तर खरा मी कसा वागतों तो. शिवाजीला असा झुलवतों, वरं पण शिवाजी आणि गडावरची सारी मंडळी अगदीं भेदरून गेली असेल नाहीं ?

**पंडितजी**:—तें कांहीं विचारूंच नका. निघतेवेळीं एकच गोंधळ झाला. मीसुद्धां रडलों.

**अफझुलखान**:—मग आतां हंसा. पंडितजी, तुम्हीं इथंच रहा.

**पंडितजी**:—भेटीच्या शर्तीप्रमाणं मला इथं राहतां येणं शक्य नाहीं. हा आलाच शिवाजी.

**अफझुलखान**:—हा शिवाजी ! किती बावळा माणूस आहे हा !

**पंडितजी**:—( स्वगत ) पण कोथळा काढील तेव्हां समजेल.

**अफझुलखान**:—किती भ्याला आहे हा ! माझ्यासमोर याच्या तोंडून एक शब्दसुद्धां निघणार नाहीं. असलीं मशकं मी टिचकीसरशीं उडवीन. पंडितजी, हाच खरा शिवाजी का कुणी तोतया ? मला फसवीत तर नाहीं तुम्हीं ?

**पंडितजी**:—हाच शिवाजी, मी सामोरा जातों. कपट करूं नका; फसाल.

**अफझुलखान**:—काय सोंग आहे ! पण यालाच आम्हीं डरत होतों ना ? अरे, पण हा आलाच. आईये जनाब ! आईये जनाब ! ( शिवाजी व खान भेटतात भेटींत शिवाजीची मान आपल्या बगलेंत धरतो. ) शिवाजी, तुला आणि तुझ्या स्वराज्याला असं चिरडून टाकण्याचें सामर्थ्य माझ्या अंगीं असतां तुझ्याशीं तह कोण करणार ? ( प्रहार करायला लागतो. शिवाजी वाघनखं खुपसतो. ) या अल्ला ! दगा ! दगा ! (खान मरतो. पडद्यांत हरहर महादेव आणि दीन दीन अशी आरोळी होते. )

---



## प्रवेश दुसरा.

( मोहना व कमळजा. मोहना पेटलेला कांकडा घेऊन येते. शंखनाद होतो. )

**मोहनाः**—बाई, ऐकलात हा शंखनाद. हीच आमच्या गुरुजींची ईषारत. आतां ही गुहा उडवून देऊन दुसरीकड जायचं. ज्या कार्याकरतां गुरुजी तपश्चर्या करीत होते तें पूर्ण झालं. आपली ही यशस्वी–पुण्यशील जागा विटाळली जाऊं नये, म्हणून ही गुहा उडवून द्यायची. हा घे कांकडा—

**कमळजाः**—बुवा, आपण काय म्हणतां तें मला समजलं नाहीं. या भुयाराच्या वर खानाच्या भेटीकरतां तयार केलेला सभामंडप आहे: तो काय म्हणून तुम्हीं उडवणार? बुवा, मी विजापुरची आहे. या स्फोटानं विजापुरच्या सैन्याचा आणि खानाचा चुराडा होईल. हें अघोर कृत्य मी करूं देणार नाहीं.

**मोहनाः**—तूं विजापुरची ना? आदिलशाहीची अभिमानी ना? मग हा शंखनाद शिवाजीनं कपट करून खानाला दगा केल्याचं सुचवतो. खानाच्या खुनी सैतानाला गाडण्याकरतांच ही तयारी आहे. पहात्येस काय? लाव आग आणि घे सूड आपल्या शत्रूचा. ( कमळजा कांकडा घेते. )

**कमळजाः**—अस्सं! हा शंखनाद शिवप्रभूचा नाश करायचा इषारा देतो. तुम्हीं साधु नसून खुनी–अत्याचारी भोंदू–शिवप्रभूचे शत्रू. तूं मोऱ्यांची मोहना, व तुझा गुरु तुझा साथीदार. आतां ही कमळजा—वीर झुंझाररावांची अर्धांगी तुम्हांला जन्मभर शंख करायला लावणार. मोहने, हा नाद सोड. देवाच्या नांवावर असलीं अघोर कर्मं करणारीं तुम्हीं माणसं का राक्षस?

**मोहनाः**—चांडाळणी आश्रय घेऊन अशी बेईमान होत्येस? पण मी माझ्या शत्रूचा सूड घेतल्याशिवाय कशी राहीन! ही पहा मीच लावतें आग. ( कांकडा ओढून घेते. कमळजा मिठी मारते. )

**कमळजाः**—पण मी ती लावूं देईन तेव्हां ना? देवा, या चांडाळांना पापापासून परावृत्त कर.

**मोहनाः**—चांडाळणी, तुला अशी झिडकारून—

**कमळजाः**—पापी माणसं प्रसंगीं अशींच हतबल ठरतात. सत्याचं बळ पापाला असं डांबून ठेवतं.

**मोहना**:—अवदसे सोड मला. हिला इतकं बळ कुठून आलं ?

**कमळजा**:—कुठून आलं ? सत्यानं दिलं. सत्याच्या पाठीराख्या परमेश्वरानं दिलं. महाराष्ट्राच्या आत्मत्यागानं दिलं. मोहने हा अघोर मार्ग सोड. मी अवदसा ! मोहने, तुझ्यासारख्या–महाराष्ट्राला आग लावणाऱ्या–स्वाभिमानाला आणि स्वधर्माला तिलांजली देणाऱ्या–देशाच्या साडेसातीला–या अक्काबाईला डांबून ठेवणारी मी अवदसा कशी ? मोहने, वाई झालं तें झालं.

( संताजी येतो. )

**संताजी**:—घात झाला. ताईसाहेब, अझून बार उडाला नाहीं. शिवाजी सुटून चालला.

**मोहना**:—या अवदसेनं घात केला. पहा कशी मला डांबून टाकली आहे ती ! संताजी, जा. जा बाबा. तूं तरी पेटव ती दारू. पहा सांपडला तर.

( संताजी कांकडा घेऊन जातो. )

**कमळजा**:—जा. तुम्ही दारू पेटवीपर्यंत महाराज गडावर पोंचतीलही.

( मोहनेला सोडते. )

**संताजी**:—( आंतून ) घात झाला. सगळी दारू भिजवली गेली.

**मोहना**:–पुरा सत्यानाश केलास ग बाई. अक्काबाईचा फेरा लावून घेतला मी.

**कमळजा**:—अग मी सत्यानाश टाळला. असत्याचा नाश मात्र आतां होईल.

( बार उडतो. )

**मोहना**:—पहा. पहा हा भडका. यांत शिवाजी सांपडलाच पाहिजे.

**कमळजा**:—नाहीं. पापी संताजीच सांपडला. ( मानाजी येतो. )

**मानाजी**:—हा स्फोट मोहना इथंच आहे असं सांगतो. अरे वः ! ही तर इथंच. मोहने, बार थोडक्यांत चुकला. शिवाजी सुटून गेला. ( तोफ होते. ) एक गडावर पोंचल्याची ही तोफ ऐक. मोहने, आपलं कारस्थान फसलं. संताजी बरोबर—खानाबरोबर मातींत मिळालं. मोहने चल. आपण निसटून जाऊन आपले प्राण वांचवूं. नव्या हवेंत नवें कारस्थान करूं. चल, पळ.

**मोहना**:—मानाजीराव आतां कुठं पळणार ? माझं कारस्थान गेलं. आतां माझा प्राणही गेलाच पाहिजे. आतां काळाच्या उदरांत—या जळत्या डोहांत लपून बसलं पाहिजे. दगेबाज जगा ! तुला माझा हा अखेरचा प्रणाम. (जाऊन अग्नींत उडी घेते. मानाजी अडवायला जातो.)

**कमळजा**:—जा. चांडाळांनों, तुम्हीं कुठंही जा. तुमच्या कपाळीं शेवटीं हेंच. अहाहा ! धन्य आजचा दिवस ! शिवाजी महाराज ! अंशतः तरी आपली सेवा माझ्या हातून घडली, मनावरचं पुष्कळ ओझं हलकं झालं; पण येणं कसं नाहीं झालं अझून ? (मानाजी येतो.)

**मानाजी**:—गेली. मोहना जळून खाक झाली. माझा संसार बुडाला. मोहने बरोबर त्याची रक्षा झाली. आतां मला तरी जगून काय करायचं आहे !

**कमळजा**:—पापाचा जाब द्यायचा आहे.

**मानाजी**:—कोण कमळजा ! कमळजे, माझा सत्यानाश करायला तुम्हीं कारण झालां.

**कमळजा**:—चुकतो आहेस. अझून पापाची धुंदी गेली नाहीं. बाबा सत्याचा नाश कधींच होत नसतो. सत्य अविनाशी आहे. सत्य नाशावर उठले-ल्यांचाच सत्यानाश होत असतो.

**मानाजी**:—कमळजे, तुला मागाच्या कृतीची साक्ष दाखवतों. माझ्या सुखाच्या होळीबरोबर तुझीही होळी करतों. एवढा तरी आनंद साधतों. कमळजे, तुला अशी खेचून—(कमळजेला धरायला जातो. इतक्यांत झुंझारराव येतो.)

**झुंझारराव**:—मानाजी, नीचा बरा सांपडलास. माझ्या स्वामिभक्तीला तूं फांसलेलं काजळ तूझ्याच रक्तानं धुवून टाकतों.

**मानाजी**:—वः ! झुंझार तूंही आलास ! फितूर, हरामखोर, तूं माझं रक्त सांडणार ! खानाच्या वधाचा सूड मी तुझ्यावर घेणार. तुम्हांला या जळत्या डोबांत फेंकून मी सूड उगवणार.

**नेताजी**:—(दाऊदसह मागून येतो. मानाजीच्या मानेला धरतो.) सूडाच्या गप्पा विसरा आतां.

**दाऊद**:—मानाजीराव, हा सावजी. शिवाजी महाराजांचा हेर आहे; याचं नांव नेताजीराव. मला खोटा पाडीत होतास नाहीं ?

**नेताजी**:—झुंझारराव, दाऊदखान, ए फितूर खंड्या ! तुम्हीं शिवाजी महा-राजांचे कैदी आहांत. हा मानाजी म्हणजे नीच देशद्रोही खंड्या खोपडा. हा नीचांचा अर्क आहे. यानं तुम्हां सर्वांचे अपराध केले आहेतच: पण स्वराज्य द्रोहापुढं याची सारीं पापं हलकीं ठरतील.

**दाऊद**:—पण सावजी—नाहीं नेताजीराव मी मुळींच पाप केलं नाहीं.

**नेताजी**:—भाईसाहेब, तुम्ही भिऊं नका. मी आपला पाठीराखा आहे. मी तुम्हांला सोडवीन.

**दाऊद**:—पण हो, मानाजीची धिंड राहिली. शिवाजीकडून याची गाढवावरून धिंड काढव.

**नेताजी**:—झुंझारराव, तुम्हां सर्वांना गडावर आलं पाहिजे.

**झुंझारराव**:—माझी तयारी आहे.

**दाऊद**:—मी ही तयार आहे. ए मानाजी ! चल हो पुढं. (जातात.)

---

## प्रवेश तिसरा.

(प्रतापगड-अफझूलखानाची कबर. मागें ध्वजस्तंभ. जवळ तानाजी उभा आहे. एका बाजूला प्रधान मंडळ दुसऱ्या बाजूला मानाजी, दाऊदखान, नेताजी, कृष्णाजी भास्कर, झुंझारराव.)

**तानाजी**:—पंडितजी, झुंझारराव, ए फितूर खंड्या पहा हा महाराजांचा न्यायीपणा. मराठी स्वराज्य आपल्या शत्रूचासुद्धां कसा सन्मान करतं तें नीट डोळे उघडून पहा; आणि मग आम्हांला दोष द्या. तुम्हांला शत्रूला मूठमाती तरी दिल्याचं स्मरतं का ?

**पंडितजी**:—तानाजीराव, स्वराज्याचं आणि तुमचं कौतुक करावं तेवढं थोडंच आहे. शिवाजी महाराज अलौकीक पुरुष आहेत. (शिवाजी, जिजाबाई, कमळजा येतात.)

**शिवाजी**:—पंडितजी, जनतेचा लौकीक पुढाऱ्याला मोठेपणाला चढवतो. तानाजी, खानाचा अंत्यविधी योग्य रितीनं-खऱ्या मुसलमानाला साजेसा झाला ना ? आतां क्षत्रियाला-वीराला योग्य असा खानाचा सन्मान झाला पाहिजे. खानाच्या या दर्ग्याला सर्व वीरांनीं-सर्व क्षात्रधर्माभिमान्यांनीं तीन वेळां प्रणाम करावा. नेताजी खानाला तीन तोफांची सलामी द्या. ( नेताजी जातो.

तीन तोफा होतात. शिवाजीसह सर्व तीन वेळ मुजरा करतात. शिवाजी दर्ग्यावर शेला घालतो.) आईसाहेब, खानाचा अंत्यविधी जातिवंत मुसलमानाला आणि वीराला साजेसा झाला ना ?

**जिजाबाई:**—शिवबा हें तुझं आणि महाराष्ट्राचं कर्तव्यच आहे. शिवबा, तरी पण खानाचं आणि तुमच्या या विजयाचं स्मारक यापेक्षां निराळ्या रितीनं झालं पाहिजे मला वाटतं या बुरुजाला आजपासून आपण अफझुल बुरुज असं नांव द्यावं.

**शिवाजी:**—ठीक आहे. आजपासून आम्हीं या बुरुजाला अफझुल बुरुज असंच म्हणूं.

**दाऊद:**—अरे! अरे! मी मेलों असतों तर दाऊद बुरुज तरी झाला असता.

**शिवाजी:**—आईसाहेब, या कमळजाबाईनीं या मोहिमेंत मोठी कामगिरी केली आहे. महाराष्ट्राला आणि आपल्याला पुत्रदान दिलं; आणि माझ्या काळाला डांवून त्याच्याकडून आत्मघात करवला. आईसाहेब अशा आर्यांनीं महाराष्ट्राला ओटींत घेतल्यावर महाराष्ट्राकड वांकड्या नजरेनं पहायची काळाची सुद्धां छाती नाहीं. कमळजाबाई, आज मला आयुर्दान देऊन आपण मला माझ्या मातृपदीं पोंचलां आहांत. या धर्मपुत्राचा हा घ्या प्रणाम.

**कमळजा:**—महाराज हें काय भलतंच ? आपण आमचे प्रभू भूदेव. आपली सेवा घडावी म्हणून महाराष्ट्रांतील प्रत्येक जीव तळमळतो आहे. माझ्या पुण्याईनं मला ही संधी मिळाली. माझं कर्तव्य मी केलं यांत जास्त काय केलं !

**शिवाजी:**—असलं कर्तव्य महाराष्ट्राला सर्व जगाचं स्वामित्व देईल.

**जिजाबाई:**—शाबास बाई कमळजे धन्य तूं ! (कवटाळते) झुंझार तुझा काय विचार ठरला.

**झुंझारराव:**—आईसाहेब, मला आतां विचार करण्याची शक्ती नाहीं. मी दिङ्मूढ झालों आहें. काय करावं हेंच समजत नाहीं. आईसाहेब, यावेळीं मी शिवाजी महाराजांचा कैदी आहें. ते करतील तो हुकूम मला मानणं भाग आहे.

**शिवाजी:**—नेताजी, या मंडळींत फाजलखान कुठं दिस[illegible]हीं

**नेताजी:**—त्याला या खंड्यानं पळवला.

**शिवाजी:**—खंडूजी, तुझं पाप इतकं भयंकर आहे कीं यापुढं तुला जिवंत ठेवला तर तूं सर्व जगाला आग लावशील. जा. याचा एकदम कडेलोट करा.

**दाऊद:**—(स्वगत) आतां आली आमची पाळी पुरी कंबख्ती आहे.

**शिवाजी**:—हे कोण ?

**दाऊद**:—मी दाऊदखान. या मेलेल्या खानसाहेबांच्या बायकोचा भाऊ मी कांहींसुद्धां केलं नाहीं. उलट मी या नेताजीरावांला मदतच केली आहे.

**नेताजी**:–हे खानाचे मेव्हणे बडे दाऊदखान. यांच्या वेडांत मला थारा मिळून खानाच्या हृदयाचा आणि मोहना मानाजीच्या कारस्थानाचा ठाव काढतां आला.

**शिवाजी**:—सर्व मुसलमान कैद्यांना त्यांच्या योग्यतेप्रमाणं पोषाख देऊन त्यांची त्यांच्या इतमामाप्रमाणं विजापुरास रवानगी करा. मराठ्यांना मात्र सोडूं नका. त्यांची चौकशी केली पाहिजे.

**नेताजी**:—भाईसाहेब, महाराजांना मुजरा करा.

**दाऊद**:—(शिवाजीला मुजरा करतो.) नेताजीराव तुम्ही माझं शीर सलामत राखलंत. हा घ्या तुम्हांला माझा सलाम.

**शिवाजी**:—पंडितजी, आपला काय विचार ठरला ?

**पंडितजी**:—आतां माझा विचार काय असणार ! आपल्या पायांची सेवा घडावी एवढीच इच्छा आहे.

**शिवाजी**:–स्वदेशाच्या सेवेला याचनेची जरूरच नाहीं. तो प्रत्येकाचा जन्मसिद्ध हक्कच आहे. झुंझारराव, तुमचा विचार आज महाराष्ट्रानं करायचा आहे. महाराष्ट्राला आपली अत्यंत जरूर आहे; आणि कमळजाबाईंची इच्छाही स्वदेशाची सेवा करायचीच आहे. आज त्यांच्याविरुद्ध जायला महाराष्ट्र तयार नाहीं.

**झुंझारराव**:—महाराज, आपण सर्व कांहीं जाणत आहां. आपल्या अलौकिक सामर्थ्यामुळं आपण दैवी पुरुष—अवतारी पुरुष असंच महाराष्ट्राला वाटतं. माझ्या पुण्याईनं आपला सहवास मला बाळपणीं घडला, मला वळण लागलं; पण अर्ध्यावरच पुण्य संपून मी गुलामगिरीच्या जाळ्यांत सांपडलों. महाराज, मला क्षमा करा. माझा बाणा न सोडतां माझ्या महाराष्ट्राचा सन्मान करायला मी केव्हांही तयार आहें.

**शिवाजी**:—महाराष्ट्राचा सन्मान स्वराज्याला मिळण्यानं होणार आहे. झुंझारराव, आपली इच्छा—इच्छा नसली तरी एकवार अंगावर घेतलेल्या कार्यापासून पराङमूख व्हायचं नाहीं. या आपल्या बाण्यामुळं तुम्हांला विजापुरास जावं असं वाटतं ना ? हाच बाणा महाराष्ट्राच्या कामीं येता तर आपल्या हातून केवढं कार्य झालं असतं ! स्वराज्याच्या इमारतीला विशेष जोर आला

असतो. झुंझारराव, आपला हा बाणा महाराष्ट्राच्या कामीं केव्हांतरी लागेल या विश्वासानं आपल्या इच्छेकरतां महाराष्ट्र तुम्हांला विजापुरास जायची नोकळीक देत आहे. महाराष्ट्राचा दोन दिवस पाहुणचार घ्या, आणि खुशाल विजापुराला जा.

**झुंझारराव**:—महाराष्ट्रा ! मला क्षमा कर. मी देहानं गुलाम असलों तरी मनानं तुझा दासानुदास आहें. (शिवाजीचे पाय धरतो. शिवाजी उठवतो.)

**शिवाजी**:—आईसाहेब, आजच्या विजयोत्सवांत सर्व गोष्टी आपल्या म्हणण्याप्रमाणं झाल्या ना? तानाजी, स्वराज्यतोरण बांधलंस म्हणजे तुझ्या मनासारखं होईल ना? माझ्या महाराष्ट्राची इच्छा पूर्ण झाली. मीच एकटा असंतुष्ट राहणार काय? (रामदास येतात.)

**श्रीसमर्थः**—जय जय रघुवीर समर्थ. शिवबा, तूं असंतुष्ट राहून महाराष्ट्र संतुष्ट कसा राहील? शिवबा, तुला पाहून मला—संन्याशाला—वैराग्याला संतोष होतो. तूंच मूर्तिमंत संतोष.

**शिवाजी**:—माझा संतोष—आनंद आणि स्फूर्ति हे पाय. या पायांचं दर्शन घडलं नाहीं म्हणून मी असंतुष्ट होतों. श्रीनीं दर्शन देऊन महाराष्ट्राप्रमाणं मलाही संतुष्ट केलं. महाराष्ट्राची कामगिरी श्रीचरणीं सादर आहेच. भवानीच्या कृपेनं आणि आपल्या आशिर्वादानं महाराष्ट्रानं आपल्या आज्ञेप्रमाणं वागून विजय मिळवला. भवानीच्या प्रेरणेप्रमाणं मी जुलमाचा प्रतिकार केला; पण—

**श्रीसमर्थ**:—खानाचा वध झाला असंच ना? पण शिवबा, हा तुझा दोष नाहीं. खान आपल्या कर्मानंच काळमुखीं पडला. तशीच परमेश्वराची योजना होती. या वधामुळं आदिलशाहींत—मोंगलाईत आणि भविष्यकाळीं इतिहासांत बरीच खळबळ उडेल; पण त्याला इलाज नाहीं. कदाचित् कांहीं लोक तुला दोष देतील; पण हा तुझा दोष नसून जगाच्या द्रोषी दृष्टीचा आहे. तुझ्या चारित्र्यावर आणि राजकारणावर हा वध प्रकाशही पाडील.

**शिवाजी**:—पण आपण तर मला दोष देत नाहीं ना? माझं करणं न्यायाचं—आत्मबचावाचं आणि धर्मरक्षणाचं होतं असं समर्थ वाणीनं सांगितलं तर माझ्यावर कुणीही कसलाच आरोप करूं शकणार नाहीं.

**श्रीसमर्थ**:-शिवबा, अरे तुझा जन्म अन्याय आणि जुलूम दूर करण्याकरतां आहे. शिवबा, असल्या आरोपांना तूं डरतोस? हे आरोप कोण करणार? मोंगलांच्या अगर विजापुरकरांच्या द्वारचीं श्वानंच ना? शिवबा, तूं आपल्या

नीतीनं महाराष्ट्राला या आर्यावर्ता उच्चपदीं बसवशील. मुत्सद्दीपणानं आणीबाणीच्या वेळीं, भारताला महाराष्ट्राच्या तोंडाकड पहायला लावशील. महाराष्ट्राला भारताचं पुढारीपण देशील.

**तानाजी**:—हा महाराष्ट्र, श्रीसमर्थांचा महाराष्ट्र, श्रीशिवाजी महाराजांचा महाराष्ट्र [illegible] चंद्र दिवाकरौ लोक गात राहतील.

**जि**[illegible] श्रींनी शिवबाला मात्र दूर लोटूं नये. आपल्या दर्शनाशिवा[illegible] स्थिर होत नाहीं.

**श्रीसमर्थ**:—जिजाऊ, आम्हांला दूर रहाणंच भाग आहे. आमच्या सहवासानं असले पुरुष आंगाला राख फांसूं लागले तर जगाचा आणि आमचा तरणोपाय काय? याला सहवास या (तानाजींकडे) अशा रणभक्तांचा पाहिजे: आणि तो पूर्णपणं आहेच. शिवबा, तानाजी, चढवा स्वराज्य तोरण आणि करा हिंदुपतपादशाहीचा पुकारा.

**जिजाबाई**:—पण त्याला आपला आशिर्वाद पाहिजे.

**श्रीसमर्थ**:—तो न देऊन चालणारच नाहीं. आम्हांला तो देणंच भाग आहे.

**शिवाजी**:—तानाजी, चढव स्वराज्य तोरण आणि कर हिंदुपत पादशाहीचा पुकारा.

**तानाजी**:—महाराष्ट्रा, एक हा समर्थांचा संदेश आणि स्वदेश सेवेंत दंग हो. जय भवानी! जय श्रीसमर्थ! जय श्री शिवाजी महाराज! जय मराठे स्वराज्य! जय महाराष्ट्र! हरहर महादेव!

१०३६ नारक.

समाप्त.